* नागपूर *
* वर्ष ५४ * अंक २१५ *
मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२४
किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-
एकूण किंमत रु. ३/-
पुरवणीसह पाने ८

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com





## प्रमुख संकल्प

1. **लाडक्या बहिणींना** दरमहा मिळणार **₹2,100**, म्हणजेच **वर्षाला ₹25,200**
2. शेतकऱ्यांना मिळणार **कर्जमाफी, शेतकरी सन्मान निधी 12,000 रुपयांवरुन 15,000** आणि **एमएसपीवर 20% भावांतर योजना**
3. प्रत्येक गरीबाचं स्वप्न पूर्ण होईल, **भाजपा अन्न सुरक्षा आणि हक्काचं घर देईल**
4. वृद्धांना मिळणारी **पेन्शन आता ₹1500 वरुन वाढवून ₹2100** केली जाणार
5. महागाई पासून मिळेल दिलासा, **राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती राहणार स्थिर**
6. **10 लाख विद्यार्थ्यांना मिळणार ₹10,000** विद्यावेतन आणि **25 लाख रोजगार निर्मिती** करणार
7. महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाला मिळणार नवी दिशा **45,000 गावांत पांदण रस्त्यांची बांधणी** होणार
8. अंगणवाडी आणि आशा सेविकांना **₹15,000 वेतन आणि विमा संरक्षण**
9. **वीज बिलात 30% कपात** होणार , सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देणार
10. 2028 पर्यंत महाराष्ट्र बनणार **1 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था**
11. सरकार स्थापनेनंतर 100 दिवसांच्या आत **'व्हिजन महाराष्ट्र @2029'** सादर करण्यात येईल.
12. **मेक इन महाराष्ट्र** बनवेल राज्याला फिनटेक आणि **AI ची राजधानी** नागपूर, पुणे, नाशिक सारखी शहरे बनणार एयरोस्पेस हब
13. खतांवरील SGST कर मिळणार परत **सोयबिनला प्रति क्विंटल किमान ₹6000** भाव देणार
14. 2027 पर्यंत **50 लाख महिलांना लखपती दिदी बनविणार**. 500 बचत गटांचे एक क्लस्टर आणि अशा कस्टर्ससाठी 100 कोटींचा फिरता निधी देणार
15. अक्षय अन्न योजनेद्वारे कमी उत्पन्न गटातील **कुटुंबांना मिळणार मोफत अन्नधान्य**
16. महारथी आणि अटल टिंकरिंग लॅब्स योजनेतून सर्व शासकीय **शाळांमध्ये रोबोटिक्स आणि AI** चे प्रशिक्षणाची संधी होईल उपलब्ध
17. महाराष्ट्रात होणार **कौशल्य जनगणना उद्योगांच्या** गरजेनुसार कुशल मनुष्यबळ निर्माण करणार
18. प्रत्येक जिल्ह्यात **छत्रपती शिवाजी महाराज आकांक्षा केंद्र** स्थापन करुन घडवणार **10 लाख उद्योजक**
19. SC, ST, OBC आणि VJNT समाजातून उद्योजक घडवण्यासाठी **15 लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज**
20. OBC, SEBC, EWS आणि VJNT विद्यार्थ्यांना **शिक्षण आणि परीक्षा शुल्काची संपूर्ण प्रतिपूर्ती मिळणार**
21. युवकांसाठी **स्वामी विवेकानंद युवा स्वास्थ्य कार्ड** आणि वार्षिक आरोग्य तपासणी
22. महाराष्ट्राच्या **गौरवशाली किल्ल्यांचे संवर्धन** आणि ऐतिहासिक वारशाचे जतन
23. ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्य धोरण **आधार-सक्षम सेवा** तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये स्वतंत्र ओपीडी
24. **सक्तीच्या धर्मांतरणाविरोधात कायदा** करणार फसव्या धर्मांतराला आळा बसणार
25. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने **मानव-वन्यजीव संघर्ष टाळणार** तसेच वन्यप्राण्यांपासून होणारी जीवितहानी रोखणार

शिवसेना

**भाजप-महायुती आहे, तर गती आहे**

**महाराष्ट्राची प्रगती आहे**

*Matter related to "Clock" symbol of the NCP is sub-judice in the Supreme Court

**भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र**

**भाजप-महायुतीला मतदान करा आणि विजयी करा**

Published By: Bharatiya Janata Party, Maharashtra | C.D.O Barrack No. 1, Nariman Point, Mumbai- 400020




## प्रमुख पक्षांमध्ये नाराजीनाट्य

**पालघरमधील वसई, नालासोपारा आणि बोईसर या तीन मतदारसंघांमध्ये बहुजन विकास आघाडीचे आमदार आहेत. पालघरमध्ये शिवसेनेचे श्रीनिवास वनगा, विक्रमगडमध्ये शरद पवार गटाचे सुनील भुसारा आणि डहाणू मतदारसंघामध्ये विनोद निकोले हे आमदार आहेत. स्थानिक पक्ष असूनही 'बविआ'ने या मतदारसंघांवर वरचष्मा ठेवला आहे; मात्र या मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीत हेमंत सावरा निवडून आल्याने भाजप समोरील आव्हान वाढले आहे; परंतु शिवसेनेच्या शिंदे आणि ठाकरे गटात नाराजी उफाळून आली. त्याचा फटका महाविकास आघाडी आणि महायुतीलाही बसण्याची शक्यता आहे.**

'बविआ'साठी ही अस्तित्वाची लढाई आहे, तर युती-आघाडी पालघर जिंकण्यासाठी जोर लावणार आहे. वसई हा जवळपास तीन लाख ५१ हजार मतदार असलेला मतदारसंघ मुख्यतः नायगावपासून वसई ते अर्नाळा असा पश्चिम पट्ट्यात पसरला आहे. या मतदारसंघामध्ये पूर्वीपासून राहणाऱ्या स्थानिक मतदारांची संख्या मोठी आहे. या भागात कोळी, आगरी, वाडवळ, भंडारी, ख्रिस्ती, मुस्लिम आणि गुजराती असे विविध जाती-धर्माचे मतदार असून त्यांची मते निर्णायक आहेत. वसई मतदारसंघ 'बविआ'चा बालेकिल्ला समजला जातो. या मतदारसंघामधून १९९० पासून पक्षाध्यक्ष तथा विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर निवडणूक लढवत आहेत. पक्षाने हा मतदारसंघ सातपैकी सहा वेळा हातात ठेवला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये विजय मिळाल्यानंतर, 'ही माझी शेवटची निवडणूक असेल', असे ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीआधी पुन्हा निवडणूक लढवणार असल्याचे सांगत ते रिंगणात उतरले आहेत. वसईतून महाविकास आघाडीने दिलेला उमेदवार पाहता त्यांनी बविआला पुढे चाल दिली आहे. शरद पवार आणि बाळासाहेब थोरात यांनी ठाकूर यांच्यांशी चर्चा केली होती. नालासोपारा जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे जवळपास पाच लाख ९८ हजार मतदार असलेला मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची वैतरणापासून ते बरफ पाडा, विरारमधील समेळपाडा, बोळींज, तुळींज, वलई पाडा, मनवेलपाडा अशी हद्द आहे. या मतदारसंघात सर्वाधिक म्हणजेच ४६ टक्के इतके परप्रांतीय मतदार आहेत. तेथील समस्यांवर 'बविआ'कडून तोडगा काढण्याचा नेहमी प्रयत्न केला जातो. शिवाय महापालिकेमध्ये सत्ता असल्यामुळे या भागातील प्रत्येक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जात असल्याने 'बविआ'ला मानणारा मोठा वर्ग आहे. पक्षाचे क्षितिज ठाकूर सलग तीन वेळा निवडून आले असून यंदाही ते रिंगणात आहेत. हा मतदारसंघ भाजपने शिवसेनेकडून पुन्हा मिळवला आहे. यामध्ये भाजपने महायुतीतर्फे राजन नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मनसेने विनोद मोरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे 'बविआ' हा गड राखणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




पालघर जिल्ह्यातील बोईसर विधानसभा मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. या मतदारसंघाचा निम्मा म्हणजेच ५० टक्के भाग वसई-विरार महापालिकेमध्ये, तर निम्मा भाग पालघर जिल्ह्यामध्ये मोडतो. या मतदारसंघामध्ये वसई पूर्वेच्या गोखिवरे, वालीव नालासोपारामधील संतोष भुवन, पेल्हारपासून मांडवीपर्यंतचा भाग, तर पालघरमधील सफाळे, मनोर आणि बोईसर शहरांचा समावेश होतो. यात उत्तर भारतीय मतदारांची संख्या २५ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. बोईसर हा औद्योगिक पट्टा आहे. येथील बहुतांश कामगार वर्ग उत्तर भारतीय आहे. तर मनोर, तारापूर हा मुस्लिमबहुल भाग आहे. या मतदारसंघामध्ये २००९पासून 'बविआ'चाच आमदार निवडून येत असून यंदाही पक्षातर्फे विद्यमान आमदार राजेश पाटील हे रिंगणात आहेत. २०१९च्या निवडणुकीत राजेश पाटील यांचा निसटता विजय झाला होता. यंदा महायुतीसोबत महाविकास आघाडीचेही आव्हान त्यांच्यापुढे असणार आहे. २०१९मध्ये सेना-भाजप युतीमधील शिवसेनेच्या विलास तरे यांचे आव्हान पाटील यांच्यासमोर होते; मात्र तेव्हा भाजपतर्फे तिकीट न मिळाल्याने संतोष जनाठे यांनी बंडखोरी केली. ही बंडखोरी 'बविआ'च्या पथ्यावर पडली. आता पुन्हा तरे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातून डॉ. विश्वास वळवी यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. डॉ. वळवी हे सामाजिक कार्यकर्ते असून विश्वास फाऊंडेशनच्या माध्मयातून त्यांचे काम चालू असते. या मतदारसंघामध्ये तिरंगी लढत बघायला मिळणार आहे. दुसरीकडे ठाकरे गटातर्फे येथे डॉ. वळवी यांचे नाव उमेदवार म्हणून जाहीर झाल्यानंतर पालघर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कमलाकर दळवी हे नाराज झाले आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अविभक्त शिवसेनेचे उमेदवार असलेले कमलाकर दळवी यांनी त्या निवडणुकीत सुमारे ५६ हजार मते मिळवली होती. पराभूत झाल्यानंतरही पक्ष संघटनेत कार्यरत राहून ग्रामीण भागात पक्ष वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु ठेवले होते. शिवसेना पक्षफुटी दरम्यान अनेक मातब्बर नेते शिंदे गटात सामील होत असताना,त्यांनी ठाकरे गटात राहून आपले काम सुरू ठेवले होते. लोकसभा निवडणुकीत पालघर लोकसभा मतदार संघाच्या ठाकरे गटाच्या उमेदवार भारती कामडी यासाठी प्रचंड मेहनत घेतली होती. या पार्श्वभूमीवर डॉ. वळवी हे बोईसर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाल्यामुळे ठाकरे गटातील अनेक जण नाराज झाले आहेत.

### रण तापले

पालघर हा एकेकाळी समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला असणारा मतदारसंघ. दोन वेळा काँग्रेस आणि त्यानंतर अविभाजित शिवसेनेकडे आला. त्यामुळे आत्तापर्यंत हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून, तब्बल पाच वेळा या पक्षाचे अविनाश सुतार, मनीषा निमकर, कृष्णा घोडा, अमित घोडा आणि श्रीनिवास वनगा हे प्रत्येक वेळी भरघोस मतांनी निवडून आले आहेत. या मतदारसंघातून शिवसेनेच्या ठाकरे गटाकडून जिल्हा परिषदेतील गटनेते जयंत दुबळा यांना उमेदवारी मिळाली आहे. या मतदारसंघामध्ये २०१९ ला श्रीनिवास वनगा निवडून आले; मात्र महाविकास आघाडीचे सरकार पडल्यानंतर ते शिवसेनेच्या शिंदे गटासोबत गेले. त्या वेळी शिंदे यांनी त्यांना विधानसभेत तिकीट देण्याची ग्वाही दिली होती; मात्र वनगा यांना उमेदवारी न देता ती भाजपतून राजेंद्र गावित याना आयात करून त्यांना देण्यात आली. त्यांनी शिंदे यांचा विश्वासघातकी असा उल्लेख करताना ठाकरे यांचे कौतुक केले.

विक्रमगड विधानसभा मतदारसंघातील राजकीय गणिते वेगाने बदलत आहेत. विधानसभेत खरी लढत दुहेरी होत असली तरी सध्या येथे सर्वच पक्षांची उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. शरद पवार गटाने विद्यमान आमदार सुनील भुसार यांना पुन्हा तिकीट दिले आहे, तर भाजपने हरिश्चंद्र भोये यांना उमेदवारी दिली आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम येथून इच्छुक होते. भाजपने लोकसभेला त्यांना थांबवून विधानसभेला विचार करू, असे सांगितले होते; परंतु शिवसेनेच्या शिंदे गटाला हा मतदारसंघ सुटला नाही. त्यामुळे निकम यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. विक्रमग-मोखडा या दोन तालुक्यांत शिंदे गटाची ताकद जास्त आहे. या मतदारसंघात कुपोषण, बेरोजगारी या मुद्द्यांवर निवडणूक लढवली जात असून, यात जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. भाजपला मागील निवडणुकीत पराभवाची धूळ चाखावी लागली असली तरी पराभूत उमेदवार हेमंत सवरा सध्या विद्यमान खासदार असून विक्रमगड विधानसभा क्षेत्रातून त्यांना घसघशीत मते मिळाली आहेत. जिजाऊ संघटना आपला उमेदवार उभा करण्याची चाचपणी करीत असून, निकम यांना त्यांची उमेदवारी मिळाली, तर तिरंगी लढतीत पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा फायदा होण्याची शक्यता आहे.

डहाणू विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. २००९ साली मतदारसंघ पुनर्रचनेत डहाणू आणि तलासरी तालुक्यांचा समावेश झाला. हा मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून माकपचे विद्यमान आमदार विनोद निकोले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुतीकडून हा मतदार संघ भाजपला सुटला आहे. वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद रस्त्याची दुरवस्था अशा अनेक प्रश्नांवर निकोले लढले आहेत. त्यांचा साधेपणा, विधानसभेत सर्वाधिक प्रश्न मांडणारा आमदार म्हणून ओळख या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. लोकसभा निवडणुकीत पालघर मतदारसंघामध्ये भाजपने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले, तरी सहापैकी डहाणू विधानसभा मतदारसंघात भाजपचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तेव्हापासून निकोले यांची विधानसभेसाठी उमेदवारी पक्की समजली गेली. माकपच्या राज्य समितीने त्यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीने पाठिंबा दिला.

■■■

## अजितदादांच्या खेळीमुळे निवडणूक अवघड

**आर. आर. पाटील यांचा मतदारसंघ ही तासगाव-कवठे महांकाळची ओळख. येथे आर. आर. पाटील यांच्या पत्नी सुमनताई आमदार आहेत. या वेळी त्यांचे पुत्र रोहित पाटील यांना येथून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्यासाठी निवडणूक अवघड नव्हती; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी खासदार संजयकाका पाटील यांना निवडणुकीत उतरवले आणि अजित घोरपडे-संजयकाकांचे मनोमिलन घडवून आणले. त्यामुळे रोहित यांच्यासमोर तगडे आव्हान उभे राहिले आहे.**

अजित पवार यांनी पुढाकार घेऊन तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात माजी खासदार संजय पाटील आणि माजी आमदार अजित घोरपडे यांच्यात समेट घडवून आणला आहे. पवारांच्या या खेळीमुळे दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील यांच्या समोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत संजयकाका यांचा पराभव झाला. त्यात त्यांचा स्वभाव तापट. कवठेमहांकाळमध्ये नुकत्याच झालेल्या एका मारामारी प्रकरणात ही ते अडकले. त्याविरोधात आमदार सुमनताई आणि रोहित यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला. रोहित सध्याच्या युवा पिढीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे वक्तृत्वही चांगले आहे. रोहित पाटील गेल्या तीन - चार वर्षांपासून विधानसभेची तयारी करत आहेत. त्यांचा जनसंपर्क चांगला आहे. प्रबळ विरोधक नसल्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक रोहित पाटीलांसाठी काहीशी सोपी जाईल, असे वाटत होते; पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पडलेल्या फुटीमुळे रोहित पाटील त्यांची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून रोहित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. दुसरीकडे महायुतीच्या जागा वाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला गेली आहे. अजित पवारांनी ही जागा निवडून आणण्याचा चंग बांधला असून संजयकाका यांनाच उमेदवारी दिली आहे. रोहित पाटील यांचे पारडे काहीसे जड दिसत होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघामध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील पिछाडीवर होते. त्यामुळेच अजित पवार यांनी पुढाकार घेऊन माजी आमदार अजित घोरपडे आणि संजय पाटील यांच्यातील वाद मिटवून समेट घडवून आणला आहे. घोरपडे- पाटील यांच्यात झालेल्या समेटामुळे रोहित पाटील यांच्यासमोर तगडे आव्हान निर्माण झाले आहे. प्रारंभी रोहित पाटील यांच्यासाठी सोपी वाटणारी निवडणूक आता चुरशीची होणार आहे. १९९० पासून तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघावर दिवंगत आर. आर. पाटील कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. आर. आर. पाटील यांनी तासगाव विधानसभा मतदारसंघातून १९९०, १९९५, १९९९ आणि २००४ ची निवडणूक जिंकली होती. मतदारसंघांच्या फेररचनेनंतर तासगाव - कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघातून २००९ आणि २०१४ ची निवडणूकही पाटील यांनी जिंकली होती. त्यांच्या निधनानंतर झालेली पोटनिवडणूक आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक पाटील यांच्या पत्नी सुमन पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने जिंकली होती. त्यामुळे या मतदारसंघात रोहित पाटील यांचा पराभव करून विजय खेचून आणणे संजयकाका पाटील यांच्यासाठी फारसे सोपे असणार नाही. आर. आर. पाटील - संजय पाटील यांच्यातील चुरशीच्या लढती राज्याने पाहिल्या आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे उमेदवार असलेले संजय पाटील यांच्या विरोधात अजित घोरपडे यांनी खासदार विशाल पाटील यांचा प्रचार केला होता. जाहीर सभांमधून जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले होते. संजय पाटील ही जिल्ह्याला लागलेली कीड आहे, अशी जहरी टीका करणारे अजित घोरपडे आता विधानसभा निवडणुकीत त्यांचाच प्रचार करणार आहेत. वरिष्ठ पातळीवरील तडजोडीतून समेट झाला खरा; पण नेत्यांमध्ये झालेले मनोमिलन कार्यकर्त्यांच्या पचनी पडेल का, कार्यकर्ते एकजुटीने काम करणार का, हे लवकरच दिसून येणार आहे.

### लक्षवेधी लढत

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय संजयकाका पाटील यांनी जाहीर केला. याचवेळी माजी राज्यमंत्री अजित घोरपडे यांनीही संजय पाटील यांना साथ देण्याची भूमिका जाहीर केली. जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात हा निर्णय धक्कादायक आणि अनपेक्षित मानला जात आहे. तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघ महायुतीत कोणत्या पक्षाला जाणार आणि उमेदवार कोण असणार, याबाबत सातत्याने चर्चा होत होती. या चर्चेवर पडदा पडला. हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला जाणार असल्याचे शिक्कामोर्तब झाल्यानंतर राष्ट्रवादी पक्षातून भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांना विधानसभेच्या आखाड्यात उतरविण्याचा निर्णय झाला. तासगाव तालुक्यात तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील आणि संजयकाका पाटील यांचे २००८ साली मनोमिलन झाले होते. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजयकाका सहा वर्षे विधान परिषद सदस्य होते. २०१४ ला त्यांनी राष्ट्रवादीपासून फारकत घेत भाजपमध्ये प्रवेश केला. तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्यामुळे संजयकाकांचे एक राजकीय वर्तुळ पूर्ण झाले आहे.

■■■

रोहित पाटील | संजयकाका पाटील



## वरळीच्या 'हॉट सीट'वर काय होणार?

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्याविरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार मिलिंद देवरा यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. उद्धव यांच्यापेक्षाही आदित्य यांनी शिवसेनेतील बंडानंतर शिंदे यांच्यावर अधिक कडवी टीका केली होती. आदित्य यांच्या पराभवासाठी शिंदे यांनी आता मिलिंद यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले असले, तरी त्यांचा हा डाव मुंबईकर किती यशस्वी होऊ देतात, हा प्रश्नच आहे.**

आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. गेल्या वेळीही ते याच जागेवरून निवडून आले होते; मात्र या वेळी त्यांचा मार्ग गेल्या वेळेइतका सोपा दिसत नाही. त्यांच्या विरोधात शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. वरळी मतदारसंघ्घ ही 'हाय प्रोफाईल' जागा आहे. २०१९ मध्ये आदित्य या जागेवरून विजयी झाले होते. त्या वेळी शिवसेना एक होती आणि शिवसेनेची भाजपशी युती होती. त्यांना ८९,२४८ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुरेश माने २१,८२१ मतांनी दुसऱ्या क्रमांकावर राहिले. आदित्य जवळपास ६७ हजार मतांनी विजयी झाले होते. त्यानंतर राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेत दोन गट पडले आहेत. वरळी विधानसभेची जागा मुंबई दक्षिण लोकसभेत येते. हा परिसर देवरा घराण्याचा गड मानला जातो. आदित्य यांना कोंडीत पकडण्यासाठी शिंदे यांनी देवरा यांच्यासारख्या तगड्या चेहऱ्याला रिंगणात उतरवले आहे. राष्ट्रीय राजकारणात मिलिंद यांचे उत्तम वजन आहे. शिवसेनेत येण्यापूर्वी ते काँग्रेसमध्ये होते. १४व्या आणि १५व्या लोकसभेतही त्यांनी मुंबई दक्षिण लोकसभेचे प्रतिनिधित्व केले आहे. आदित्य यांच्याविरोधात मिलिंद यांना उभे करून शिंदे यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे; मात्र मिलिंद आदित्य यांना पराभूत करू शकणार का, मिलिंद निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास आदित्यला वॉकओव्हर मिळेल का, असे प्रश्नही राजकीय वर्तुळात उपस्थित केले जात आहेत.







मिलिंद देवरा हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुरली देवरा यांचे चिरंजीव. गांधी घराण्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी यांच्यांशी संबंध असताना देवरा यांना दक्षिण मुंबईची जागा न सोडल्याने त्यांनी पक्षांतर केले. मिलिंद यांनी २००४ मध्ये राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना मुंबई दक्षिण मतदारसंघातून उमेदवारी दिली. २००४ आणि २००९ मध्ये या मतदारसंघामध्ये विजयी होऊन मिलिंद देवरा संसदेमध्ये पोहोचले. २०११ मध्ये मिलिंद यांना डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्ये राज्यमंत्री करण्यात आले. मिलिंद हे मुंबई काँग्रेसचे अध्यक्षही राहिले आहेत. तसेच ते राहुल गांधींच्या जवळचे मानले जात होते; मात्र २०२४ च्या निवडणुकीपूर्वी मिलिंद यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेने त्यांना राज्यसभेवर पाठवले. देवरा यांनी २००९, २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून लोकसभा निवडणूक लढवली होती. २००९ सोडल्यास, मिलिंद देवरा २०१४ आणि २०१९ मध्ये दक्षिण मुंबईतून पराभूत झाले.

### वलयांकित

मिलिंद यांना २००९ मध्ये वरळीतून ३९ हजार, २०१४ मध्ये ३५ हजार आणि २०१९ मध्ये ४१ हजार मते मिळाली होती. २००९ वगळता दोन्ही निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराला मिलिंद याच्यापेक्षा जवळपास दुप्पट मते मिळाली. लोकसभेच्या निवडणुकीत वरळीच्या जागेवर उद्धव यांच्या उमेदवाराला सात हजारांची आघाडी मिळाली होती. येथून अरविंद सावंत हे उद्धव यांचे उमेदवार होते. शिंदे यांच्या शिवसेनेने दक्षिण मुंबईतून यामिनी जाधव यांना उमेदवारी दिली होती.

२०१९ च्या आकडेवारीनुसार वरळीमध्ये सुमारे दोन लाख ७१ हजार मतदार आहेत. एके काळी येथे मनसेची स्थिती भक्कम होती; पण २०१९ मध्ये आदित्य रिंगणात आल्याने मनसेने येथे उमेदवार दिला नाही. जातीय समीकरणाबद्दल बोलायचे झाले तर वरळीमध्ये अकरा टक्के दलित आणि नऊ टक्के मुस्लिम आहेत. याशिवाय २.७ टक्के पाटील, दोन टक्के जाधव आणि दोन टक्के कांबळे असे मतदार या भागात आहेत. वरळीतील सर्व मतदार शहरी समाजातील आहेत. १९९० पासून शिवसेनेने फक्त एकदाच ही जागा गमावली आहे. २००९ मध्ये राष्ट्रवादीचे सचिन अहिर यांनी शिवसेनेच्या आशिष यांचा पराभव केला होता. मिलिंद यांचा ट्रॅक रेकॉर्ड खराब आहे. मिलिंद २०१४ पासून एकही निवडणूक जिंकू शकलेले नाहीत; मात्र त्यांच्यासाठी दिलासा देणारी एक बाब आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये या जागेवर शिंदे यांचे उमेदवार अवघ्या सहा हजार मतांनी मागे पडले. दुसरे म्हणजे उद्धव ठाकरे यांनी माहीमच्या जागेवर राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित यांच्याविरोधात उमेदवार उभा केला आहे. राज आदित्य यांच्याविरोधात प्रचार करू शकतात. या साठमारीमध्ये नक्की कोणाची सरशी होते हे पाहायचे.

■■■

मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ ❊ नागपूर ❊

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

## बेराळा फाट्याजवळ ॲपेचा अपघात; चालक ठार

**चिखली :** चिखली ते जालना रोडवरील बेराळा फाट्यानजीक खत घेऊन जाणारा ॲपे दुभाजकाला धडकल्याने जखमी झालेल्या चालकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना रविवार, दि. १० नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजेदरम्यान घडली. सध्या रब्बी पेरणीची सर्वत्र लगबग सुरू आहे. रब्बीच्या पेरणीसाठी तालुक्यातील मलगी येथे दुपारी १२.३०. वाजे दरम्यान रसायन खताच्या बॅग भरून घेऊन जात असताना चिखली ते जालना रोडवरील बेराळा फाट्या नजीक एमएच २८ आर २१६० क्रमांकाचे ॲपे दुभाजकाला धडकून पलटी झाला. त्यामध्ये ॲपे चालक आकाश तातेराव जाधव वय २४ वर्ष हा गंभीर जखमी झाला. सदर चालकाला चिखली येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असता दुपारी २ वाजेदरम्यान त्याचा मृत्यु झाला.

## गुजरातच्या पटेलांचे अमरावतीच्या निवडणुकीवर लक्ष!

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ११ :** गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल जर लोकसभा निवडणुकीच्या वेळी अमरावती मतदारसंघाचे प्रभारी असते, तर आपण नक्कीच लोकसभा निवडणूक जिंकली असती, असे वक्तव्य बडनेराचे आमदार रवी राणा यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या बैठकीत केल्यानंतर ऋषिकेश पटेल यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. भाजपचे अमरावती जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून ऋषिकेश पटेल हे सध्या जागोजागी कार्यकर्त्यांच्या बैठका घेत आहेत. त्यांच्या समवेत मध्यप्रदेशचे माजी आमदार आत्माराम पटेल देखील प्रचारकार्यात सहभागी झाले आहेत. या दोन पटेलांची चर्चा जिल्ह्यात आता सुरू झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील आठही मतदारसंघांमधील प्रचार व्यवस्थित सुरू आहे का, याची पाहणी ऋषिकेश पटेल आणि आत्माराम पटेल हे करीत आहेत.

# वणी येथील जगन्नाथबाबा संस्थानची जमीन विनापरवानगी विक्री; महाविकास आघाडीच्या उमेदवारावर माजी आमदारांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ, दि.११:** यवतमाळ : विधानसभा निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. आरोपप्रत्यारोपाने राजकीय वातावरण ढवळून निघत आहे. झरी तालुक्यातील रुईकोट परिसरातील संत जगन्नाथ महाराज संस्थेला पाच एकर जमीन दान मिळाली. ही संस्थेची जमीन धर्मदाय आयुक्तांची परवानगी न घेता सप्टेंबर २०२३ मध्ये संस्थेच्या सचिवांनी बी. एस. इस्पात कोळसा कंपनीला उत्खननासाठी ताब्यात दिली. या कंपनीने एक वर्षाच्या काळात या जमिनीतून ५० कोटी रुपयांपर्यंत कोळसा विकला, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे माजी जिल्हाप्रमुख, माजी आमदार विश्वास नांदेकर यांनी पत्रकार परिषदेत केला.



कृष्णराव मंदावार यांनी जगन्नाथ महाराज देवस्थानासाठी पाच एकर जमीन दान दिली होती; परंतु देवस्थानचे सचिव संजय देरकर यांनी बी. एस. इस्पात कोळसा कंपनीला सप्टेंबर २०२३ मध्ये कोणत्याही कार्यालयाची परवानगी न घेता जमीन उत्खननासाठी ताब्यात दिली, असे नांदेकर म्हणाले. या प्रकाराची तक्रार जगन्नाथ महाराजांचे भक्त बंडू देवाळकर यांनी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, सहायक धर्मदाय आयुक्तांकडे केली. त्यानंतर देरकर यांनी ऑक्टोबरला जमिनीची उधारीत विक्री केल्याचा आरोपही विश्वास नांदेकर यांनी केला

या अगोदर कंपनीच्या नावाने जमीन नसताना कंपनीने या जमिनीवर खोदकाम करून कोळसा काढला आहे. या प्रकरणाची तक्रार उच्च न्यायालयाच्या वकिलामार्फत चंद्रकांत घुगुल व गोविंदा निखाडे यांनी संबंधित विभागाला व देरकर यांना नोटीस दिल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून प्रशासनाने जमीन ताब्यात घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. याप्रकरणी मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून याला देरकर हेच जबाबदार असल्याचा नांदेकरांनी केला आहे. तसेच याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागून फौजदारी प्रक्रिया करण्यात येईल, असे नांदेकर म्हणाले. पत्रकार परिषदेला चंद्रकांत घुगुल, भाग्यश्री वैद्य आदी उपस्थित होते.

### प्रक्रिया नियमानुसार

जगन्नाथ महाराज संस्थानची जमीन वेकोलिने घेतली. ही संपूर्ण प्रक्रिया नियमानुसार, विविध विभागाच्या परवानगीने झाली आहे. मागील अनेक वर्षांपासून हे संस्थान कार्यरत आहे. आजपर्यंत असे कोणतेही आरोप संस्थानवर करण्यात आले नाहीत. अशा आरोपांमुळे संस्थानची बदनामी होत आहे. निवडणुकीमध्ये विरोधकांकडे कोणताही मुद्दा नसल्याने असे खोटे आरोप करून मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. याविरोधात संबंधितांविरुद्ध मानहानीचा दावा दाखल करणार असल्याची प्रतिक्रिया महाविकास आघाडीचे उमेदवार संजय देरकर यांनी दिली.

# अमरावतीत खेळणी दुकानाला भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ११:** अमरावती : जयस्तंभ चौक परिसरातील कोतवाली ठाण्यासमोर असलेल्या एका खेळणीच्या दुकानाला रविवारी १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत दुकानातील खेळणे व अन्य साहित्य जळून खाक झाले. त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. अथक परिश्रम करून अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली होती. काही काळ या मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. सुदैवाने या घटनेने कुठलीही जीवितहानी झाली नाही.



**अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले.**

रामपुरी कॅम्प परिसरातील कृष्णानगर येथील रहिवासी विजय बजाज यांचे जयस्तंभ चौक–श्याम चौक मार्गावर बजाज खिलोना सेंटर नावाचे खेळणी विक्रीचे दुकान आहे. रविवारी सायंकाळी त्यांच्यासह कर्मचारी आपापल्या कामात व्यस्त होते. त्याचवेळी दुकानातील वरच्या माळ्यावर अचानक आग लागली. ही बाब लक्षात येताच विजय बजाज यांच्यासह कर्मचारी दुकानाबाहेर पडले. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. त्याचवेळी आगीने रौद्ररुप धारण केले. दुकानाच्या वरच्या माळ्यावरून आग खालच्या माळ्यावर पसरली. त्यामुळे दुकानातून आगीचे प्रचंड लोळ निघू लागले. या प्रकाराने परिसरात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळ गाठून आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

अथक परिश्रमाअंती अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले. तोपर्यंत या आगीत दुकानातील खेळणे व अन्य साहित्य पूर्णत: जळून खाक झाले. त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या आगीची शेजारी असलेल्या इतर खेळणी विक्रेत्यांच्या दुकानांना काही प्रमाणात झळ बसली. या घटनेमुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरातील वीज पुरवठा खंडित करण्यात आला होता. आगीचे नेमके कारण कळू शकले नसले, तरी शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे.

# धामोरी शिवारात अजगराला जीवनदान

■ महासागर प्रतिनिधी,

**मूर्ति, दि.११:** तालुक्यातील धामोरी येथील शेतशिवारातील नाल्यानजीक ८ ते १० फूट असणाऱ्या अजगर जातीच्या सापाला सर्पमित्र यांनी सुखरूप पकडून जीवनदान दिले. गत वर्षांत तब्बल तीन अजगर जातीच्या सापाला जीवनदान दिल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. धामोरी आणि कार्ली गावाच्या मधातून वाहणाऱ्या नाल्यावर बंधारा असून, त्यावर मच्छीमार मासे पकडायला जातात. मासे पकडायला गेलेल्या मच्छीमारांच्या जाळ्याचे पाण्यातील वजन खूप वाढल्याने त्यांनी ती जाळी ओढून बाहेर काढली असता मोठा अजगर त्यांना दिसला. त्यांनी शेतात असणारे शेतकरी संकेत राऊत यांना माहिती दिली. त्यांनी विलंब न करता सर्पमित्र यांना पाचारण करून अजगर सापाला जीवनदान दिले. सर्पमित्र सौरभ व साहिल यांनी संबंधीत साप तथा विषारी बिनविषारी सापाविषयी सखोल माहिती देऊन अशा दुर्मिळ जातीच्या सापाला व इतर सापाला मारू नये.


## G. G. DANDEKAR PROPERTIES LIMITED

(FORMERLY KNOWN AS G. G. DANDEKAR MACHINE WORKS LIMITED)

**Regd Off:** 211/A, MIDC Butibori Industrial Area, Village Kinhi, Tal. Hingana, Dist. Nagpur - 441122

**CIN:** L70100MH1938PLC002869, **E-mail:** cs@ggdandekar.com, **Website:** www.ggdandekar.com, **Ph:** 07103-295109

### RESULT OF POSTAL BALLOT E-VOTING

Pursuant to provisions of Section 108 and 110 of the Companies Act, 2013 ('the Act') read with the Companies (Management and Administration) Rules, 2014, Regulation 44 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time and other applicable provisions and the General Circulars No(s) No. 14/2020 dated 8th April 2020, No. 17/2020 dated 13th April 2020, No. 22/2020 dated 15th June 2020, No. 33/2020 dated 28th September 2020, No. 39/2020 dated 31st December 2020, No. 10/2021 dated 23rd June 2021, No. 20/2021 dated 8th December 2021, No. 3/2022 dated 05th May 2022, No. 11/2022 dated 28th December 2022, General Circular No. 9/2023 dated 25th September 2023 and General Circular No. 09/2024 dated 19th September 2024 issued by the Ministry of Corporate Affairs ('MCA Circulars'), approval of the member of the Company was sought by means of Postal Ballot for ordinary resolution as detailed below. The Board of Directors had appointed Mr. Mahesh Athavale, Partner of Kanj & Co LLP, Practicing Company Secretaries, Pune as Scrutinizer for scrutinizing the Postal Ballot. Based on the Scrutinizer's Report dated 11 November 2024, the details of result of Postal Ballot declared on 11 November 2024, are as under:

| Item No. | Particulars | Type of Resolution | Total no of votes polled* | Total votes cast in favour | | Total votes cast against | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | No. of Shares | % of votes cast | No. of Shares | % of votes cast |
| 1 | To approve the material transaction with a related party of the Company. | Ordinary Resolution | 39,661 | 39,561 | 99.75 | 100 | 0.25 |

*Number of valid votes polled only.

The above Resolution as set out in the Postal Ballot Notice dated 08 October 2024, are passed by the members of the company with requisite majority. The result of the Postal Ballot is communicated to BSE Limited where the shares of the Company are listed and it is also posted on the website of the Company i.e., www.ggdandekar.com along with the Scrutinizers' Report.

By the Order of the Board of Directors
**For G. G. Dandekar Properties Limited**
**(formerly known as G. G. Dandekar Machine Works Limited)**
Sd/-
Pranav Deshpande
Executive Director
DIN: 06467549

Place: Pune
Date: 11.11.2024

CONCEPT



**यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India**
भारत सरकार का उपक्रम | A Government of India Undertaking

मालमत्ता पुनर्प्राप्ती व्यवस्थापन शाखा:
२१ वीणा चेंबर्स मेझानाईन मजला, दलाल स्ट्रीट,
बॉम्बे स्टॉक एक्सचेंज जवळ, फोर्ट, मुंबई–४०००२३.
ईमेल: ubin0553352@unionbankofindia.bank

### ई-लिलाव विक्री सूचना (सरफेसी कायद्यांतर्गत)

आर्थिक मालमत्तेच्या सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंमलबजावणी सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतूदीसह वाचा.

याद्वारे सर्वसाधारणपणे लोकांना आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, युनियन बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतलेला प्रतिकात्मक/भौतिक ताबा (सुरक्षित कर्जदार) जसे आहे तसे, जसे आहे तसे, जे काही आहे आणि आवश्यकता न घेता आधारावर दिनांक १३.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० ते सायं ५.०० वा. च्या दरम्यान खाली नमूद केल्याप्रमाणे, संबंधित कर्जदार आणि हमीदारांकडून युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित कर्जदार) देय संबंधित रकमेच्या वसुलीसाठी विकले जाईल. राखीव किंमत आणि बयाण रक्कम खाली नमूद केल्याप्रमाणे असेल, विक्रीच्या अटी आणि शर्तींच्या तपशीलांसाठी, कृपया युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित कर्जदार) वेबसाइटवर प्रदान केलेल्या दुव्याचा संदर्भ घ्या म्हणजे www.unionbankofindia.co.in. बोलीदार https://ebkray.in या वेबसाइटलाही भेट देऊ शकतात. संबंधित कर्जदारांच्या खात्यातील संबंधित रकमेसह व्याज आणि इतर खर्चाच्या वसुलीसाठी दिनांक १३.१२.२०२४ रोजी https://ebkray.in वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई–लिलावाद्वारे नमूद केलेल्या मालमत्तांची विक्री केली जाईल.

**वेबसाइटद्वारे ऑनलाइन ई-लिलाव: https://ebkray.in**
**लिलावाची तारीख आणि वेळ: १३.१२.२०२४ दुपारी १२.०० ते सायं ०५.०० वा.**

| लॉट क्र | अ) कर्जदाराचे नाव ब) शाखेचे नाव क) मालमत्तेचे वर्णन ड) मालकाचे नाव | अ) रुपयामध्ये राखीव किंमत ब) सर्वात जास्त पैसे जमा (ईएमडी) रुपयात | कर्ज थकीत संपर्क व्यक्ती आणि मोबाईल क्रमांक तपासणीची तारीख/वेळ | भाराचा ताबा: प्रतिकात्मक/शारीरिक |
|---|---|---|---|---|
| 1 | अ) किरण एजन्सीज<br>ब) मालमत्ता पुनर्प्राप्ती व्यवस्थापन शाखा.<br>क) लॉट नं. १ फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, जुन्या टाटा प्रेस रोड येथे विकी अपार्टमेंट, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथे स्थित, टीपीएस ४ आणि माहीम विभागाच्या कॅडेस्ट्रल सर्व्हेक्रमांक १/४३ असलेल्या ५७८ चौ. फूट. अभिनव के. सोमलवार आणि वंदना के. सोमलवार यांच्या नावाने बांधलेला भूखंडावर आहे.<br>ड) अभिनव के. सोमलवार आणि वंदना के. सोमलवार. | a) Rs.1,64,00,000.00<br>b) Rs.16,40,000.00 | रु. १६,७६,२६,२१३.०० (रुपये सोळा कोटी, छ्यात्तर लाख, छवीस हजार, दोनशे तेरा फक्त) ०१.०९.२०१८ रोजी सुधारित सूचनेनुसार (२९.०६.२०१८ रोजी अतिरिक्त अंमलबजावणी सुरक्षा व्याज कारवाई सूचनेच्या संदर्भात जारी दिनांक १९.०६.२०१८ च्या २०१७ च्या एसए क्रमांक ११४ मध्ये २०१७ च्या आयए क्रमांक ३५० मध्ये डीआरटी आदेशानुसार) आणि व्याज खर्च, शुल्क आणि त्यानंतरचा आजपर्यंतचा खर्च.<br>जी.के. देशपांडे (९९७५०३८३८९)<br>पी.एस. मुळीक (९७६९९७२०९०) | एओ ला माहिती नाही प्रतिकात्मक ताबा कलम १४ प्रक्रियेत आहे |
| 2 | अ) किरण एजन्सीज<br>ब) मालमत्ता पुनर्प्राप्ती व्यवस्थापन शाखा.<br>क) लॉट नंबर–२–फ्लॅट क्रमांक १०२, पहिला मजला, जुन्या टाटा प्रेस रोड येथे विकी अपार्टमेंट, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथे स्थित, माहीम विभागातील टीपीएस ४ आणि कॅडेस्ट्रल सर्व्हेक्रमांक १/४३ असलेल्या ५०८ चौ. फूट. विजय सोमलवार, किरण सोमलवार, अचला व्ही. सोमलवार आणि वंदना के. सोमलवार यांच्या नावाने बांधलेला भूखंडावर आहे.<br>ड) विजय सोमलवार, किरण सोमलवार, अचला व्ही. सोमलवार आणि वंदना के. सोमलवार. | a) Rs.2,30,00,000.00<br>b) Rs.23,00,000.00 | रु. १६,७६,२६,२१३.०० (रुपये सोळा कोटी, छ्यात्तर लाख, छवीस हजार, दोनशे तेरा फक्त) ०१.०९.२०१८ रोजी सुधारित सूचनेनुसार (२९.०६.२०१८ रोजी अतिरिक्त अंमलबजावणी सुरक्षा व्याज कारवाई सूचनेच्या संदर्भात जारी दिनांक १९.०६.२०१८ च्या २०१७ च्या एसए क्रमांक ११४ मध्ये २०१७ च्या आयए क्रमांक ३५० मध्ये डीआरटी आदेशानुसार) आणि व्याज खर्च, शुल्क आणि त्यानंतरचा आजपर्यंतचा खर्च.<br>जी.के. देशपांडे (९९७५०३८३८९)<br>पी. एस मुळीक (९७६९९७२०९०) | एओ ला माहिती नाही प्रतिकात्मक ताबा कलम १४ प्रक्रियेत आहे |

ई–लिलावाच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी बोलीदारांनी बँकेच्या www.unionbankofindia.co.in वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली आहे ई–लिलाव बिडरमध्ये भाग घेण्यासाठी बिड सबमिट करण्यापूर्वी आणि इतर तपशील, सेवा प्रदात्याच्या https://ebkray.in च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकतात इंडियन बँक्स लिलाव गुणधर्म माहिती e-BKray पोर्टल वर भेट भेट देऊ शकता.

ऑनलाइन लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांकडे वैध ई–मेल आयडी असणे आवश्यक आहे. विक्रीच्या अटी व शर्ती सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या तरतुदींनुसार काटेकोरपणे असतील.

सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अंतर्गत वैधानिक ३० दिवसांची विक्री सूचना
याला नियम ८(६)/नियम ९(१ मधील सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वर नमूद केलेली तारीख वर नोटीस म्हणून देखील मानले जाऊ शकते
विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या जसे की www.unionbankofindia.co.in किंवा https://ebkray.in

ठिकाण मुंबई
तारीख: १२.११.२०२४

एसडी/–
अधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया


## Format C-1

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

| | | |
|---|---|---|
| **Name and address of candidate** | : | **KRUSHNAJI PANCHAMJI KHOPDE**<br>**Satranjipura, Telipura, Near Hanuman Mandir, Nagpur** |
| **Name of political party** | : | **Bharatiya Janata Party** |
| **Name of Election** | : | **Maharashtra Legislative Assembly-2024** |
| **Name of Constituency** | : | **54 Nagpur East Legislative Assembly** |

**I KRUSHNAJI PANCHAMJI KHOPDE,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | JMF.C. Court No.03 | SCC/4899/2023 FIR No.111/22 Lakadganj Police Station | Pending | 143,188 of IPC with 135 of Maharashtra Police Act. Violation of the Covid Guidelines during Covid pandemic Period |
| 2. | JMF.C. Court No.03 | SCC/5687/2022 FIR No. 42/2022 Lakadganj Police Station | Pending | Section 188, 270 of IPC & Section 135 of Maharashtra Police Act Violation of the Covid Guidelines during Covid pandemic Period. |
| 3. | JMF.C. Court No.02 | SCC/19443/2021 FIR No. 504/2020 Nandanvan Police Station | Pending | Section 188, 270 of IPC & Section 135 of Maharashtra Police Act. Matter is withdrawn & acquitted on 30/06/2023 |
| 4. | JMF.C. Court No.03 | RCC/30563/ 2005 FIR No. 22/2004 Lakadganj Police Station | Pending | Section 295,143, 435, 427 of IPC & Section 135 of Maharashtra Police Act. Matter is Acquitted on 06/12/2013 |
| 5. | JMF.C. Court No.03 | CC/384/1997 FIR No. 397/1996 Lakadganj Police Station | Pending | Section 174 of Indian Railway Act Pending/Not Tracible |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |
| 2. | Nil | Nil | Nil |
| 3. | Nil | Nil | Nil |
| 4. | Nil | Nil | Nil |
| 5. | Nil | Nil | Nil |

**Name & Signature of Candidate**
**(KRUSHNAJI PANCHAMJI KHOPDE)**

# रेवड्यांची उधळण..

**राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुती (भाजपा, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस अप) आणि महाआघाडी (काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शप, उबाठा सेना) एकमेकांच्या विरोधात दंड थोपटून प्रचार करीत आहेत. सहा राजकीय पक्षांमध्ये वर्चस्वाची आणि अस्तित्वाची लढाई आहेच, पण ही निवडणूक मोदी जिंकणार की, राहुल गांधी असा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या सभांनी निवडणुकीतील चुरस वाढली आहे.**

-----------------

भाजपा विरुद्ध काँग्रेस, महायुती विरुद्ध महाआघाडी अशा लढाईत एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. या दोन आजी-माजी मुख्यमंत्र्यांची रणनिती आणि मुत्सद्देगिरी यांची या निवडणुकीत मोठी परीक्षा आहे. महायुती आणि महाआघाडीकडून विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने निवडणूक जाहीरनामे घोषित झाले.

युती आणि आघाडीतील नेत्यांनी मोठा गाजावाजा करीत, आम्हाला सत्ता मिळाली तर मतदारांसाठी आम्ही काय काय करणार याची मोठी जंत्री सादर केली. युती आणि आघाडीने मोफत कल्याणकारी योजना आणि सवलतींचा वर्षाव करून मतदारांना आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न केला. दिलेल्या फुकटच्या योजना आपण खरोखरच देऊ शकतो का, सरकारी तिजोरीवर किती बोजा पडू शकतो, निधी कोठून आणणार, किती काळ आपण मोफत रेवड्यांचा वर्षाव करू शकतो याचे भान न ठेवता दोन्ही बाजूंनी जाहीरनाम्याच्या नावाखाली उधळण केली आहे.

सत्ता काबीज करण्यासाठी सरकारी खजिन्याची पर्वा न करता, वाट्टेल ते करण्याची तयारी महाआघाडी व महायुतीच्या नेत्यांची आहे, असे चित्र महाराष्ट्रातील जनतेला दिसले. महायुतीच्या सरकारकडून सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांतर्गत लाडक्या बहिणीला दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत.

आचारसंहिता सुरू होण्यापूर्वीच लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात तीन महिन्यांचे पैसे जमा झाले आहेत. शिवाय अनेकांना दिवाळी बोनसचा लाभ मिळाला आहे. राज्यात तब्बल २ कोटी ४० लाख लाडक्या बहिणी लाभार्थी आहेत. जवळपास अडीच कोटींची लाडक्या बहिणींची व्होट बँक हा महायुतीचा या निवडणुकीत भक्कम आधार बनला आहे.

या योजनेला मिळालेला प्रतिसाद आणि बहिणींमध्ये निर्माण झालेला उत्साह यामुळे महायुती पुन्हा एकदा महाराष्ट्रात सत्तेवर येणार असे चित्र आहे. लाडकी बहीण योजनेचा गवगवा केवळ राज्यात नव्हे तर सर्व देशात झाला. लाडक्या बहिणींच्या व्होट बँकेने महाआघाडीतील तिन्ही प्रमुख पक्षांना अक्षरशः घाम फुटला.

लाडकी बहीण योजनेसाठी ९० हजार कोटी खर्च होणार आहेत. पुन्हा सत्तेवर आल्यानंतर लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने दिले आहे. त्याशिवाय २५ हजार महिला पोलिसांची भरती, वृद्ध व्यक्तींना दरमहा २१०० रुपये पेन्शन, शेतकऱ्यांना कर्जमाफी व वर्षाला १५ हजार रुपये, जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर, २५ लाख रोजगार निर्मिती, ४५ हजार गावांत रस्ते, अंगणवाडी व आशा सेविकांना दरमहा १५ हजार रुपये वेतन व विमा सुरक्षा, वीज बिलात ३० टक्के कपात, व्हिजन महाराष्ट्र २०२९ या प्रकल्पाचा आराखडा शंभर दिवसांत सादर करणार अशी सुंदर स्वप्न रंगवणारी आश्वासने दिली आहेत.

महाआघाडीनेही महायुतीच्या धर्तीवर रेवड्यांचा वर्षाव केला आहे. थोडीफार आकडेवारी वाढवून जणू काही महायुतीच्या निवडणूक जाहीरनाम्याची कॉपीपेस्ट महाआघाडीने सादर केली आहे.

सत्तेवर आल्यानंतर महिलांना दरमहा ३ हजार रुपये, महिला व मुलींना राज्यात एसटी व बेस्ट बसमधून मोफत प्रवास, मुंबईच्या लोकल ट्रेनमधून महिलांना मोफत प्रवास मिळावा म्हणून रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा, जातिनिहाय जनगणना व आरक्षणाची असणारी ५० टक्के मयार्दा हटवणार, २५ लाखांपर्यंत आरोग्यविमा व मोफत औषधे, शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये, बेरोजगार तरुणांना महिना ४ हजार रुपये, पाच जीवनावश्यक वस्तूंच्या पाच वर्षे किमती स्थिर, इत्यादी...

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांची बोलकी प्रतिक्रिया आहे. ते म्हणतात - महाआघाडीने निवडणूक जाहीरनाम्याच्या निमित्ताने पंचसूत्री जाहीर केली. महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ७५ हजार कोटींची तरतूद केली आहे.

महाआघाडीची पंचसूत्री राबवायचे म्हटले तर किमान तीन लाख कोटी लागतील. राज्याचे बजेट साडेसहा लाख कोटींचे आहे. मोफत योजनांवर एवढा मोठा निधी खर्च होऊ लागला तर कर्मचाऱ्यांच्या वेतनालाही पैसे उरणार नाहीत...

मुंबईच्या पूर्व उपनगरातील भाजपाच्या विद्यमान आमदार असलेल्या एका उमेदवाराने मतदारसंघातील ६६ हजार लाडक्या बहिणींचे फॉर्म भरून घेतले. त्यासाठी पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांची फौज मदतीला घेतली होती. या सर्व बहिणींच्या बँक खात्यात साडेचार हजार रुपये जमा झाले आहेत.

महायुतीचे सरकार नुसत्या घोषणा करीत नाही, दिलेला शब्द पाळते असा विश्वास या बहिणींमध्ये निर्माण झालाय. प्रत्येक मतदारसंघात हीच परिस्थिती आहे. बहिणींची व्होट बँक विधानसभा निवडणुकीत महाआघाडीला भारी पडणार असे भाजपा-शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत.

अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारने तेथील जनतेला वीज, पाणी, शिक्षण, आरोग्यसेवा, मोफत देऊ केली तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केजरीवाल सरकारच्या रेवडी कल्चरवर कडक शब्दांत टीका केली होती.

अशा रेवड्यांनी अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो असा इशारा दिला होता. पण विविध राज्यांनी निवडणुकीच्या काळात मोफत रेवड्यांचा वर्षाव सुरू केला. मतदारांना फुकट घेण्याची संवय लावण्यात सर्वच राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा सुरू झाली. आता कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, दिल्ली येथील रेवड्यांचे लोण महाराष्ट्रात पोहोचले आहे. मतांसाठी सारे राजकीय पक्ष मतदारांना फुकटे बनवू पाहात आहेत.

महाआघाडीचा जाहीरनामा म्हणजे महायुतीची मसुद्याची नक्कल किंवा कॉपीपेस्ट आहे. महायुतीपेक्षा आम्ही कसे जास्त उदार आहोत, हे महाआघाडी सांगत आहे. लाडक्या बहिणींना आम्ही जास्त पैसे देणार असे महाआघाडी ठसवत आहे. करदात्यांचे पैसे कोण कोणाला कोणी मागत नसताना देत सुटले आहोत, अशी महाराष्ट्रात अवस्था आहे.

महाआघाडीच्या विशेषतः उबाठा सेनेचे नेते लाडक्या बहिणींना दरमहा आम्ही तीन हजार रुपये देणार शिवाय भावांचीही आम्ही काळजी घेणार असे ठामपणे सांगत आहेत. महायुतीने केवळ मुलींना शिक्षण मोफत दिले, आम्ही सत्तेवर आल्यावर मुलांना मोफत उच्च शिक्षण देणार असे आघाडीचे नेते सांगत आहेत.

लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीत खडखडाट झाला असे अगोदर म्हणणारे स्वतःच रेवड्या वाटू लागले आहेत. मुलांना मोफत शिक्षण म्हणजे कुठे देणार, कोणाला देणार, सरकारी शाळांची संख्या सतत कमी होत आहे मग खासगी शाळेतील मुलांना मोफत शिक्षण देणार का?

काँग्रेस, उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस अनेक वर्षे सत्तेत होती मग तेव्हा त्यांनी मुलांना मोफत उच्च शिक्षण का नाही दिले? आघाडीचे नेते केवळ उद्योगपती अदाणींवर डूग धरून बोलत असतात. त्यांना दिलेले धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे कंत्राट रद्द करू असे सांगत असतात. ते कधी दुसऱ्या कोणत्या उद्योगपतीचे नावही घेत नाहीत. भूमिपुत्रांना घरे देऊ अशी घोषणा करतात. पण भूमिपुत्र म्हणजे कोण हे कधी ते बोलत नाहीत.

गिरणी कामगारांच्या संपानंतर चार दशके उलटली तरी अजूनही दीड लाख गिरणी कामगारांना घरे मिळाली नाहीत, यावर कोणी ब्र सुद्धा काढत नाहीत. मुंबईतून मराठी माणूस विरार, पालघर, पनवेल, बदलापूर, कर्जत, टिटवाळ्याला गेला तरी कोणाला चिंता नाही. मुंबईत मराठी भाषिकांची टक्केवारी लक्षणीय घटली आहे (अंदाजे वीस-बावीस टक्के) त्यावर कधी चर्चा होत नाही.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार असे सांगतात, पण अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहणार होते, त्याचे काय झाले त्यावर कोणी चकार शब्द बोलत नाही. महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नाची कोणाला आठवणही नाही.

गेल्या दशकभरात महाराष्ट्राची पिछेहाट झाली आहे, असे पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालातच म्हटले आहे. सकल उत्पन्नात राज्याचा वाटा घटला आहे. दरडोई उत्पन्नात गुजरातची प्रगती झाली आहे. तेलंगणा, गुजरात, कर्नाटक, हरियाणा, तामिळनाडू, पंजाब ही राज्ये पुढे सरकत आहेत. मात्र महाराष्ट्रात सारे राजकीय पक्ष रेवड्यांची उधळण करण्यात मशगूल आहेत.

●●●●●●●●●

# पक्ष्यांचा लळा

**सलीम अलींचा 12 नोव्हेंबर हा जन्मदिवस पक्षी दिन म्हणून जाहीर करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले होते. डॉ. सलीम अली हे भारतातील आद्य पक्षीशास्त्रज्ञ आणि पर्यावरणवादी होते. सलीम अली यांनी भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातील पक्ष्यांचा आढळ, त्यांच्या सवयी, पक्ष्यांच्या विविध जाती आणि जातींमधील वैविध्य यांचा बारकाईने अभ्यास केला. त्यांच्या ह्या कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा चालू झाली. भारतातील हे पक्षी निरीक्षक सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांना ह्यबर्डमॅन ऑफ इंडियाह्न असे ही संबोधले जाते.**

-----------------





डॉ. सलीम अली आपण पक्षी निरीक्षणाकडे कसे वळलो याचे वर्णन आपल्या आत्मचरित्रात करतात. मुंबईच्या खेतवाडीमध्ये मुस्लिम कुटुंबात अली यांचा जन्म झाला. लहानपणी भेटवस्तू म्हणून दिलेल्या छऱ्याच्या बंदुकीने लहान पक्षी टिपायचे हा त्यांचा छंद होता. एके दिवशी टिपलेल्या चिमण्यांमध्ये त्यांना वेगळी चिमणी मिळाली. हिच्या गळ्यापाशी पिवळा ठिपका होता. नेहेमीपेक्षा हा पक्षी वेगळा दिसल्याने त्यांची उत्सुकता चाळवली व त्यांनी मामांकडे हा पक्षी कोणता याची विचारणा केली.

मामा त्याला थेट बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीच्या संचालकांकडे घेऊन गेले. तेथे संचालकांनी छोट्या अलीला हा पक्षी कोणता हे सविस्तर सांगितले, तसेच भुसा भरलेल्या पक्ष्यांचा संग्रह दाखवला. भारावललेल्या सलीम अलींना पक्ष्यांची जी भुरळ पडली ती कायमचीच.



यानंतरच्या काळात सलीम अलींचा पक्षीछंद त्यांना टिपणे व नोंदी करणे यांपुरता मर्यादित राहिला. शालेय शिक्षणानंतर त्यांना प्राणी शास्त्रात पदवी घ्यायची होती परंतु शास्त्रातील अनेक अवघड विषयांमुळे माघार घ्यावी लागली. दरम्यान ते ब्रम्हदेशातील आपल्या बंधूंच्या धंद्याला मदत म्हणून रंगूनला गेले. तेथे धंद्यात मदतीसोबत त्यांनी ब्रम्हदेशातील जंगले फिरून पक्ष्यांना टिपून त्यांच्या नोंदी ठेवायचा छंद चालू ठेवला.

1918 मध्ये त्यांचा तेहमिना यांच्यांशी विवाह झाला. एका यशस्वी पुरुषामागे पत्नीचा हात असतो ही म्हण सलीम अलींच्या बाबतीत तंतोतंत लागू होते.



1924 मध्ये रंगून मधील धंद्यात अपयश आल्यानंतर अली भारतात परत आले. दरम्यान तेहमिना यांनी सलीम अलींचा पक्ष्यांबद्दलचा कल जाणून घेतला होता व ज्यात त्यांचा छंद जोपासला जाईल अशी नोकरी करण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. परंतु सलीम अलींचे शिक्षण अशी नोकरी मिळवण्यास एकदम जुजबी होते.

जवळच्या ओळखीने त्यांना बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी मध्ये गाईड लेक्चररची नोकरी मिळाली, परंतु अलींना ते पुरेसे नव्हते. त्यावेळेस भारतात पक्षीशास्त्र हा विषय अस्तित्वातच नव्हता. यासाठी त्यांनी जर्मनीमध्ये जाऊन पक्षीशास्त्राचे प्रशिक्षण घेतले व काही काळ इंग्लंडमध्ये काम केले.

भारतात आल्यानंतर या विषयात नोकरी मिळणे कठीण काम होते. सलीम अली अजूनही हौशी पक्षी निरीक्षकांसारखेच गणले जात. आर्थिक परिस्थिती खालावल्याने त्यांनी आपल्या पत्नीच्या मदतीने अलिबागजवळ किहीमजवळ आपला मुक्काम हलवला.

या मुक्कामात त्यांनी सुगरण पक्ष्याच्या वर्तनावर अतिशय बारकाईने अभ्यास केला व त्यावर बीएनएचएसच्या जर्नलमध्ये त्यांनी प्रदीर्घ शोधनिबंध लिहिला. हा निबंध त्यांना पक्षीशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळवून देण्यास जबाबदार ठरला. त्यांनी पक्ष्यांना केवळ टिपून त्यात भुसा भरून संग्रहालयात ठेवण्यासाठी पक्षिशास्त्र नाही हे जगाला दाखवून दिले व एकूणच पक्षीशास्त्रालाच वेगळी दिशा दिली.

यानंतर 1930 च्या सुरुवातीला सलीम अलींना ब्रिटिश सरकारपुरस्कृत तसेच संस्थाने पुरस्कृत पक्षी मोहिमांवर बोलवणे येऊ लागली. अलींनी या मोहिमांवर आपण नोंदी तसेच पक्ष्यांचा जीवनशैलींवर अभ्यास करणार असल्याचे स्पष्ट केले, केवळ पक्षी टिपून नोंदी ठेवण्यात आपल्याला रस नाही, ते काम कोणीही स्थानिक कामगार करू शकेल असे स्पष्ट केले.

आता सलीम अली सर्वमान्य पक्षी शास्त्रज्ञ झाल्यामुळे तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मंजूरी दिली व सलीम अलींचे पक्ष्यांचे खरेखुरे काम सुरू झाले. या नंतरच्या काळात भारताच्या मोठ्या भूभागावर त्यांनी पक्षी निरीक्षण मोहिमा आखल्या. देशाच्या वायव्य सरहद्दीपासून ते केरळच्या जंगलांपर्यंत तसेच कच्छच्या दलदलीपासून पूर्वेकडे सिक्कीम व अरुणाचलपर्यंत जाऊन त्यांनी पक्ष्यांच्या नोंदी केल्या. पक्ष्यांचे वर्तन, त्याच्यांत हवामानानुसार होणारे बदल, स्थलांतराच्या सवयी, विणीचे हंगाम यावर मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा केली.

सुरुवातीला या कामी त्यांची पत्नी तेहमिनाने खूप मदत केली. त्याच सलीम अलींच्या मोहिमांचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट बघत. 1939 मध्ये तेहमिनांचा मृत्यू झाल्यानंतर अली खूपच व्यथित झाले. त्यांच्या आयुष्यात खूप मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु त्यातून सावरून पुन्हा लग्न न करता त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे पक्ष्यांना वाहून देण्याचे ठरवले. आपला मुक्काम मुंबईला बहिणीच्या घरी हलवला व तेथूनच आपले उर्वरित आयुष्य घालवून भारतीय पक्षीशास्त्रासाठी अजरामर ठेवा निर्माण केला.

सलीम अलींचे पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मोठेपण कशात आहे तर त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके. भारतभर फिरून त्यांनी जी तपशीलवार माहिती गोळा केली होती, त्याचे त्यांनी केवळ रेकॉर्डसमध्ये स्थान न ठेवता ती माहिती सर्वसामान्यांना वापरता येईल अश्या शैलीत पुस्तके लिहिली. सुरुवातीच्या काळात त्यांचे लिखाण सुधारण्यातही त्यांना तेहमिनांनी मदत केली होती.

1943 मध्ये लिहिलेले द बुक ऑफ इंडियन बर्डस हे पुस्तक आजही पक्षी ओळखण्यासाठी पहिल्या पसंतीचे आहे आज हे पुस्तक 13 व्या आवृतीत असून पुस्तकातील पक्ष्यांची फारच थोडी चित्रे बदलण्यात आली आहेत. यावरून त्यांनी केलेल्या सूक्ष्म निरीक्षणांची अचूकता लक्षात येते. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ बर्डस ऑफ इंडिया अँड पाकिस्तान (पिक्टोरियल गाईड) या दहा खंडी पुस्तकाने त्यांना खऱ्या अर्थाने अजरामर केले. डॉ. सिडने डिलन रिप्ली यांच्या साथीदारीत त्यांनी अपार परिश्रम घेऊन भारतीय पक्ष्यांच्या 1200 जातींच्या व 2100 उपजातींच्या नोंदी, त्यांच्या सवयी वगैरे सर्वांगीण शास्त्रशुद्ध माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध केली.

1950 व 60 च्या दशकात जेव्हा भारतात पर्यावरण हा शब्द अस्तित्वातच नव्हता त्यावेळेस भरतपूरच्या केवलदेव घाना राष्ट्रीय उद्यान तसेच केरळमधील सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यानात होणारे पर्यावरणास हानीकारक प्रकल्पांना विरोध दर्शावला. त्यांचे वाक्य तत्कालीन पंतप्रधान चरणसिंग यांना चांगलेच झोंबले होते.

ताजमहाल नष्ट झाला तर पुन्हा बांधता येईल परंतु सायलंट व्हॅली सारखे जंगल एकदा नष्ट झाल्यावर पुन्हा उभारता येणार नाहीह्व. त्यांनी केलेल्या शास्त्रीय वादावर सरकारने नमते घेउन इंदिरा गांधी सरकारने हे प्रकल्प स्थगित केले तसेच अंततः त्यांना राष्ट्रीय उद्यानांचा दर्जा देउन कायमचे संरक्षित केले. तसेच अनेक दुर्मिळ प्राणी व पक्षी यांबाबत आपल्या पुस्तकांद्वारे, संस्थेद्वारे, शिष्यांमार्फत केलेले सरकार तसेच सामान्य नागरिकांमध्ये केलेले प्रबोधन भारतातील पर्यावरण चळवळीचा पाया ठरले. त्यामुळेच भारतातील आद्य पर्यावरणवाद्यांमध्ये डॉ. सलीम अली यांचा समावेश होतो. त्यांच्या जन्मदिनानिमित्त सर्वांना राष्ट्रीय पक्षी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

-------------

**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

●●●●●●●●●

## खोके आणि धोके...

**वाचक लिहितात**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रंगत वाढू लागली आहे. मतदानाला आठ ते नऊ दिवस शिल्लक असून, उमेदवारांच्या प्रचार सभांनाही वेग आला आहे. आपल्या पक्षाच्या, युतीच्या, आघाडीच्या उमेदवारांसाठी त्यांचे त्यांचे बडे नेते विमान, हेलीकॉप्टरमधून उडू लागले आहेत. एकाच दिवसात दोन ते तीन सभांचा धडाका सुरू आहे.

मोठ्या नेत्याची सभा म्हटले की शामियानापासून ते स्पीकर, खुर्च्या, वाहनांचा ताफा आणि भाड्याने आणले जाणारे महिला पुरूष, या सर्वांवरचा खर्च कोट्यवधीच्या घरात जात आहे. राजकीय पक्षांमध्ये कार्यकर्ते राहिले नाहीत, जो तो नेता झाला आहे. त्यामुळे पत्रक वाटणे, घरोघरी फिरणे यासाठी ५०० रूपये रोजी, जेवण, नाश्ता अशी सोय करणे उमेदवारांना क्रमप्राप्त आहे. अर्थात, सर्वच उमेदवार एवढा खर्च करू शकत नाही. मात्र, अनेक उमेदवारांची ही कोटीची उड्डाणे सुरू आहेत. हा इतका पैसा येतो कुठून?

मतदारांमध्ये खुली चर्चा आहे की, मधल्या काळात जे खोक्याचे व्यवहार झालेत, त्यातील पैसे आता बाहेर निघू लागले आहेत. निवडणुकीवर असा प्रचंड प्रमाणात पैसा ओतला जाणार असेल तर तो उमेदवार निवडून आल्यास मतदारसंघाचा विकास करेल की आधी आपले घर भरेल. खोके संस्कृती सर्वच दृष्टीकोनातून धोकादायक ठरू लागली आहे. मतदार आता जर सावध झाले नाही तर संपूर्ण लोकशाहीच संकटात येणार आहे, याचे भान बाळगले पाहिजे.

■ **विनायक राघोर्ते, नागपूर.**

# ॥ काकडत काकडत करावयाची आरती ॥

**काकड आरती म्हणजे हिंदू धर्मात देवाला उठवण्यासाठी पहाटेच्या वेळी केलेली आरती होय. या वेळी देवाच्या मूर्तीला काकडा- एक प्रकारच्या ज्योतीने ओवाळले जाते, म्हणून याला काकडारती असे म्हणतात. भारतातील अनेक मंदिरांमध्ये पहाटे काकड आरती केली जाते. महाराष्ट्रामध्ये बहुतांशी मंदिरातून नित्य किंवा काही विशिष्ट काळात, विशेषतः कार्तिक महिन्यात काकड आरती केली जाते.**

-----------------



कार्तिक महिन्याच्या शुक्ल एकादशीपासून त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत दररोज पहाटे देवाला जागविण्यासाठी मंदिरात काकडारती करण्याची पद्धत प्रचलित आहे. आरतीनंतर विविध भजने, अन्य आरती व स्तोत्रे म्हटली जातात. कृष्णाच्या लीला वर्णन करणारी गीतेही यामध्ये म्हटली जातात.

संत तुकाराम, संत रामदास, संत एकनाथ, संत सावतोबा, संत चोखोबा, आदी संतांनी काकड आरती रचल्या आहेत. त्यात त्यांचा व अभंगांचा समावेश असतो. काकड आरतीचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात विविध गावांमध्ये विविध उपक्रम केले जातात. काही ठिकाणी कार्तिक महिन्यात रथोत्सवासाठी गावकरी एकत्र जमतात आणि सोहळ्याचा आनंद घेतात. काही गांवी शेवटी गोपाळकाला करून सांगता केली जाते.

*भक्तिचिये पोटी बोध काकडा ज्योति*
*पंचप्राण जीवे-भावे ओवाळू आरती*
*ओवाळू आरती माज्या पंढरीनाथा*
*दोन्ही कर जोडोनि चरणी ठेविला माथा*

कोजागरी पौणिमेपासून काकड आरतीला सुरुवात होते आणि त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत काकड आरतीचा अखंड गजर सुरू असतो. वारकरी संप्रदायामध्ये काकड आरतीला फार पूर्वीपासून महत्त्व आहे. ग्रामीण व शहरी भागातील सर्वच मंदिरामध्ये पहाटेच्या काकड आरतीचा मधुर स्वर निनादतो.

एक महिना चालणारा उत्सव निद्रिस्त देवादिकांना जागविण्यासाठी केला जातो, अशी समजूत आहे. खरे तर शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी वर्ग थंडीमुळे आळशी बनू नये, सकाळी लवकर उठून नव्या जोमाने कामाला लागला पाहिजे, याच उद्देशाने काकड आरतीची परंपरा जोपासली जात आहे, असे कोणत्याही जाणकाराच्या श्रीमुखातून ऐकण्यास मिळेल, हेच खरे!

एकेकाळी सर्व गावकरी, परिसरातील लोक एकत्रित सामुहिकपणे काकडत काकडत काकडा आरती करीत. त्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात होते. परंतु अलिकडच्या काळामध्ये काकडा आरतीमधील गर्दी ओसरू लागली आणि काकडा आरतीमध्ये येणाऱ्या तरूणांची संख्याही कमी झाली. ही फारच चिंतेची बाब! आता केवळ गावातील ज्येष्ठ पुरूष, महिला मंदिरात एकत्र येऊन काकडा आरती करतात. गावांमध्ये काकडा आरतीमध्ये टाळ, मृदूंग, चिपड्यांच्या तालावर भजने सादर होतात.

*काय महिमा वर्णू आता सांगणे ते किती*
*कोटी ब्रह्महत्या मुख पाहता जाती*
*राही रखुमाबाई दोन्ही उभ्या दो बाही*
*मयुरपिच्छ चामरे ढाळीती ठाईच्या ठाई*

आताही अनेक गावांमध्ये ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. पहाटेच्या समयी घरातील ज्येष्ठ भाविक उठून, स्नान आटोपून मंदिरात जाऊन काकड आरती करतात. पहाटे उठून शुद्ध हवा मिळावी.

आरोग्य सुदृढ राहावे. असाही काकड आरतीमागील उद्देश असू शकतो. त्यामागे आरोग्यविषयक भावना निश्चितच दडलेली आहे. परंतु बहुतांश भाविक काकड आरतीकडे धार्मिक दृष्टीकोनातूनच पाहतात. मंदिरातील काकड आरती आटोपल्यानंतर भाविक जय जय रामकृष्ण हरी...! असा गजर करीत, टाळमृदूंगाच्या तालात नगराला प्रदक्षिणा घालतात.

चातुमार्सात देव- भगवान विष्णू म्हणजेच विठ्ठल हे निद्रेमध्ये असतात. त्यांना उठविण्यासाठी ही काकड आरतीची परंपरा असल्याचे बोलले जाते. आरती दरम्यान तीन मंगलाचरण, काकड आरतीचे अभंग, भूपाळ्याचे अभंग, पूजेची ओळ, सातवी मालिका, वासुदेव, आंधाळा पांगुळ, मुका, बहिरा, गौळणी आदींसह गणपतीची, भैरवनाथाची, विठ्ठलाची आरती होते. त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप होते. पांडूरंगाष्टक, कालभैरवाष्टक झाल्यानंतर काकड आरतीची समाप्ती होते. या काकड आरतीची त्रिपुरारी पौर्णिमेला सांगता होते.

*विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा*
*सत्त्व-रज-तमात्मक काकडा केला*
*भक्ति स्नेहे युक्त ज्ञानाग्नीवर चेतविला*

ही आपल्याकडे कित्येक हजारो वर्षांपासून सुरु असलेली पद्धत आहे. देवपूजा करताना आरती ही अगदी हमखास गायली जाते. आरती ही एक प्रकारे देवासाठी गायली जाणारी स्तुतिसुमने आहेत. जी आपण छान चाल लावून गातो. गणेशोत्सव, नवरात्र या काळात आरती ही अगदी हमखास गायली जाते. परंतु काकड आरतीचे एक वेगळेच महत्व आहे. कारण पहाटे जी गायली जाते, म्हणून तीला काकड आरती म्हणतात. कोणत्याही देवस्थानाला भेट देताना लोक पहाटेची काकड आरती अजिबात चुकवत नाहीत, हे विशेष!

*विटेसहित पाऊले जीवे भावे ओवाळू*
*कोटी रवी-शशी जैसे दिव्य उगवले हेळू*
*तुका म्हणे दीप घेऊनी उन्मनीत शोभा*

काकड आरती म्हणजे काय? असा विचार करत असाल तर काकड आरती म्हणजे देवाला उठवण्यासाठी पहाटेच्या वेळी केलेली आरती होय. ही आरती करण्यासाठी खास काकड्याने म्हणजे एका विशिष्ट ज्योतीने देवाला ओवाळण्यात येते म्हणून तीला काकड आरती असे म्हणतात. यामुळे दिवसभरासाठी अंगात जोश, उत्साह, कार्यक्षमता आणि तरतरी टिकून राहण्यास मदत होते, हे मात्र निश्चित!

**संकलन व शब्दांकन**
**निकोडे कृष्णकुमार गुरूजी.**
**रामनगर, गडचिरोली, 9423714883**

■ ■ ■

# पाण्यातून काळे मीठ प्या... फायदेच फायदे!

काळे मीठ शतकानुशतके अन्नात वापरले जात आहे. काळे मीठा पचनासाठी तसेच त्वचेसाठी देखील खूप फायदेशीर आहे. हे काळे मीठ पाण्यात मिसळून प्यायल्याने आरोग्याशी संबंधित अनेक समस्या दूर होतात.

काळं मीठ केवळ चवच नव्हे तर ते आपल्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे.

नैसर्गिक खनिजांनी समृद्ध असलेले काळे मीठ गुलाबी, गडद तपकिरी किंवा जांभळ्या रंगात आढळते. ज्यामध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम सारखी महत्त्वाची खनिजे आढळतात, त्याच्या सुगंधाबरोबर सौम्य सल्फ्यूरिक सुगंध असतो. हा सामान्य मीठापासून (आरोग्यासाठी काळे मीठ) खास बनवतो.

आपल्या भारतीय पाककृतींमध्ये चाट, रायता, कोशिंबीर आणि अनेक पेयांमध्ये चव वाढवणारा म्हणून याचा वापर केला जातो. आयुर्वेदात पचनक्रिया सुधारण्यासाठी, गॅस आणि ॲसिडिटीपासून मुक्त होण्यासाठी आणि चयापचय वाढविण्यासाठी फायदेशीर मानले जाते. याशिवाय आरोग्यासाठी इतरही अनेक फायदे आहेत,

**पचनक्रिया सुधारते :** काळे मीठ पाणी पाचक एंजाइम सक्रिय करते, ज्यामुळे अन्नाचे पचन चांगले होते.



गॅस, ॲसिडिटी, अपचन यांसारख्या समस्यादूर करण्यासही मदत होते.

**वजन कमी करण्यासाठी उपयुक्त**
काळे मीठ पाणी चयापचय वाढवते, ज्यामुळे कॅलरी जलद बर्न होतात आणि वजन नियंत्रणात राहते. याचे नियमित सेवन केल्याने पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते**
काळ्या मीठात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि मिनरल्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, ज्यामुळे शरीराला इन्फेक्शन आणि आजारांशी लढण्यास मदत होते.

**घसा खवखवण्यापासून आराम**
कोमट पाण्यात अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असलेले काळे मीठ प्यायल्याने घशात आराम मिळतो आणि खोकला कमी होतो.

**हृदयाचे आरोग्य सुधारणे**
काळे मीठ रक्तदाब नियंत्रित करण्यास उपयुक्त आहे, ज्यामुळे हृदयाच्या स्नायूंवरील दबाव कमी होतो. यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होण्यास ही खूप मदत होते.

**त्वचेची चमक :** काळे मीठ पाणी शरीराला डिटॉक्स करते, ज्यामुळे त्वचा सुधारते आणि मुरुम आणि त्वचेचे डाग कमी होण्यास देखील उपयुक्त आहे.

**इलेक्ट्रोलाइट्सचे पुनर्भरण**
काळ्या मीठात सोडियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम सारखी महत्त्वाची खनिजे असतात, जी शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखतात.

**शरीराला डिटॉक्स करा**
काळे मीठ पाणी यकृत आणि मूत्रपिंड स्वच्छ करून डिटॉक्स प्रक्रियेस प्रोत्साहित करते. त्यामुळे रात्रीच्या जेवणानंतर तुम्ही त्याचा आपल्या आहारात ही समावेश करू शकता.

**थकवा आणि अशक्तपणा दूर**
काळ्या मिठात आढळणारे मिनरल्स शरीराचे पोषण करतात, ज्यामुळे थकवा आणि अशक्तपणा कमी होतो आणि शरीरात ऊर्जा राहते. मग वापरता ना आहारात?

●●●

## अशोकायन

**एक है तो ...!**

**एक है तबतक सेफ है**
**हे सर्वांनाच पटते**
**पण राजकीय स्वार्थासाठी**
**अतृप्त आत्मे**
**वेगळी चुल मांडते ...!**

**कुटूंब असो की देश**
**अंतर्गत कलहाने**
**अखंडतेला जाती तडे**
**याचा गैरफायदा -**
**विदेशी शक्ति घेती गडे ..!**

**फुटीरवादी प्रवृत्तीला**
**मतदारांनो देऊ नका थारा**
**सर्वांप्रती समभाव जपणारा**
**एकमेव 'भारत' है हमारा !**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा जिल्ह्याचा निकाल रखडला

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ११ :** मुख्यमंत्री-माझी शाळा सुंदर शाळा अभियानात ४८ शाळांची निवड झाली. या प्रत्येक तालुक्यातून एकूण ४२ आणि जिल्हास्तरावर एकूण ६ शाळांचा समावेश आहे. ऑक्टोबर महिन्यात राज्यस्तरावरील निकालही जाहीर झाला. मात्र जिल्हास्तरावरील निकाल जाहीर झालेला नाही. निवडणुकीची प्रक्रिया सोमवार २५ नोव्हेंबरला संपणार असून, त्यानंतर अधिकृतपणे घोषणा व पुढील प्रक्रिया होणार आहे.



विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि आवश्यक कौशल्यांची तोंडओळख करून देण्याच्या उद्देशाने, राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान राबवण्यात आले. शाळा स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता, आरोग्य, अर्थिक साक्षरता, कौशल्य विकास इत्यादी महत्वपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून एकमेकांशी स्पर्धा करतील व त्यासाठी गुणांकन देऊन, त्या त्या स्तरावरील विजेत्या शाळांना रकमेच्या स्वरूपात पारितोषिक देण्यात येणार आहे. या स्पर्धात्मक अभियानात सहभागी झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन त्यांना समाजोपयोगी कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळेल, असे शासनाचे म्हणणे आहे. दरम्यान जिल्ह्यातही अभियान राबवण्यात आले. सरकारी व खासगी शाळांनी यात सहभाग नोंदवला. आता तालुका, जिल्हास्तरावरील प्रत्येकी तीन शाळांची निवड झाली आहे. त्यानंतर विभागीयस्तरावरही निवड झाली.

आता राज्यस्तरावरील निकाल जाहीर होण्याची प्रतिक्षा आहे. तालुकास्तरावरील शाळा जिल्हा, जिल्हास्तरावरील शाळा विभागीय व विभागीयस्तरावरील शाळांपैकी काही शाळा राज्यस्तरावर बाजी मारणार असल्याने तालुका ते विभागीयस्तरावरील शाळा स्पर्धेत पुढे-पुढे जातील. त्यामुळे राज्यस्तरावरील निकालानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे.

**राज्यस्तरावरील निकालानंतर जिल्ह्याकडे लक्ष**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा-२ अंतर्गत झालेल्या स्पर्धेचा निकाल निवडणूक आचार संहिता जाहीर होण्याच्या एक दिवस पूर्वी अर्थात १४ जाहीर करण्यात आला होता. , राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये शासनाच्या सर्व निकषांची यशस्वी पूर्तता करणाऱ्या प्रभात किड्स स्कूलने प्रथम क्रमांकाचे ५१ लाखाचे पारितोषिक प्राप्त केले होते. पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत प्रदान करण्यात आला होता. प्रभात अकोल्याची असल्याने आता जिल्ह्यातून अन्य नंबरवरील शाळा पुढे-पुढे सरकल्या आहेत. त्यामुळे अधिकृत घोषणेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या काही शाळांमधील शैक्षणिक दर्जा कॉन्व्हेंटच्या तुलनेने सुमार आहे. परिणामी शाळांमधील पटसंख्या कमी होत आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही शाळांमध्येही दर्जेदार शिक्षण मिळत आहे, हे मुख्यमंत्री-माझी शाळा-सुंदर शाळा अभियानानिमित्ताने दिसले आहे. या अभियानही जि.प.च्या काही शाळांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**अशी आहे संख्या**

अकोला, अकोट, तेल्हारा, बाळापूर, पातूर, बार्शीटाकळी, मूर्तिजापूर या प्रत्येक तालुकास्तरावर तीन सरकार व तीन खासगी अशा शाळांची निवड झाली आहे. अशाच पद्धतीने जिल्हास्तरावरही तीन सरकारी व तीन खासगी अशा सहा शाळांची निवड झालेली आहे.

## पैनगंगा कारखान्यात आता २५०० मे.टन गाळप

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. ११ :** तालुक्यातील भाईजी नगर, वरुड-धाड येथील पैनगंगा साखर कारखान्याचा वर्ष २०२४-२५-मधील चौथ्या गाळित हंगामाचा बॉयलरच अग्नी प्र दीपन नुकतेच पार पडला. यावेळी शेतकऱ्यांच्या वारंवार मागणीच्या आधारे पैनगंगा साखर कारखान्याची गाळप क्षमता ही ८०० मे. टनपासून २५०० मॅट्रीक टन करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेमुळे परिसरातील शेकडो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास पैनगंगा साखर कारखान्याचे चेअरमन समाधान डोईफोडे यांनी सार्थकी लावत आपली यशस्वी घोडदौड चालू ठेवली आहे. बुलडाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी नेहमीच धाड परिसरातील शेतकऱ्यांच्या संपूर्ण विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन त्यांचे हित साधले आहे. यावर्षी पावसाळा मुबलक झाल्यामुळे उसाच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. हंगाम सुरु होण्याच्या पार्श्वभूमीवर कारखान्यात नोव्हेंबर रोजी पैनगंगा साखर कारखान्याचे चेअरमन समाधान डोईफोडे व त्यांच्या पत्नी संचालिका स्वप्ना डोईफोडे यांनी विधिवत पूजन करुन कारखान्याचे चौथे बॉयलरचे अग्नी प्रदिपन केले. यावेळी कारखान्याचे संचालक अनिल गुंजाळ यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी मागील अनेक वर्षांपासून या कारखान्याची गाळप क्षमता वाढवण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने केली जात होती. कारखान्याची गाळप क्षमता ही ८०० मेट्रिक टन अशी होती, शेतकऱ्यांची मागणी पाहता आता ती पर्यंत वाढवण्यात आली आहे. याचा सकारात्मक परिणाम ऊस गाळप हंगामांवर नक्कीच होईल असा विश्वास यावेळी चेअरमन डोईफोडे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी बोलताना संचालक अनिल गुंजाळ यांनी सांगितले की, यापुढे शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी कमी वेळेत बेणे उपलब्ध व्हावे याकरिता पैनगंगा साखर कारखान्याची परिसरातच ऊस नर्सरी सुरू केली आहे. यामुळे या परिसरातील बेरोजगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. या कार्यक्रमाला संचालक मंडळ, कारखान्याचे जनरल मॅनेजर बहिर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## मतदान केंद्राध्यक्ष, अधिकाऱ्यांना कार्य विषयक दोन दिवसीय प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी,

**खामगाव, दि. ११ :** खामगाव येथे १५१२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये मतदान अधिकारी यांना कोल्हटकर स्मारक येथे पीपीटी चे प्रशिक्षण देण्यात आले. तर केला हिंदी माध्यमिक विद्यालय येथे मतदान यंत्र ईव्हीएम हाताळणी(हँडसऑन) प्रशिक्षण देण्यात आले. २६-खामगाव विधानसभा मतदारसंघात ३२२ मतदार केंद्र आहेत.

या प्रशिक्षणा करिता निवडणूक निरीक्षक खामगाव विधानसभा मतदारसंघ सीमा सरकार (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील बुलडाणा, उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी खामगाव विधानसभा मतदारसंघ डॉ. रामेश्वर पुरी, खामगाव सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सुनील पाटील शेगाव सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार दीपक बाजड , खामगाव सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद डॉ. प्रशांत शेळके, नोडल अधिकारी बी. जी. व्यवहारे, नोडल अधिकारी विजय पाटील, नोडल अधिकारी सोनाली भाजीभाकरे यांच्यासहित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जलाशयांवर विविध विदेशी पक्ष्यांचे आगमन पक्षीप्रेमींमध्ये उत्साह







■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ११ :** दरवर्षी नोव्हेंबरमध्ये थंडीत वाढ होताच जिल्ह्यातील तलाव , जलायशांवर विदेशी पक्ष्यांचे आगमन होते . परंतु, यंदा वातावरणातील सततच्या बदलांमुळे विदेशी पक्ष्यांचे आगमन काहीसे उशिराने झाले आहे. दोन दिवसांपूर्वी जलाशयांवर स्थलांतरित विदेशी पक्ष्यांचे दर्शन होण्यास सुरवात झाली. त्यामुळे पक्षी प्रेमी, पक्षी निरीक्षकांत उत्साह संचारला. जलाशयांवर मोरकंठी लिटकुरी (व्हेर्डीटर फ्लायकॅचर), स्वर्गीय नर्तक (एशियन पॅराडाइज फ्लायकॅचर),मुनिया (ट्राय कलर मुनिया),पेन्टेड स्टॉर्क (रंगीत करकोचे), उघड्या चोचेचा करकोचा(ओपनबिल स्टॉर्क ), शेकाट्या (ब्लॅक विंग्ड्स्टिल्ट),हळदी कुंकु बदक (स्पॉटबिल डक),चक्रवाक (रुडी शेलडक किंवा ब्राम्हणी डक), चतुरंग बदक (मलार्ड), नीळ्या गालाचा वेडा राघू (ब्लू-चीक बी-इटर)आदी पक्षांचे दोन दिवसांपासून आगमनास सुरवात झाली . जिल्ह्यातील कापशी, कुंभारी, सिसामासा, विझोरा, दगडपारवा, मच्छी तलाव, दुधाळा, आगर, पोपटखेड, काटेपूर्णा जलाशयांवर हिवाळयाच्या सुरवातीस विदेशी पक्ष्यांचे आगमन होण्यास सुरवात होते . यंदा थंडी उशिरा पडल्याने त्यांचे आगमनही उशिरानेच झाले आहे. हवामानातील बदलांवर अवलंबून असते आगमन-जिल्ह्याहिवाळ्यात पाहुणे पक्षी विविध जलाशयांवर हजेरी लावतात. त्यांच्या हजेरीची वेळ हवामानातील बदलांवर अवलंबून असते. त्यांच्या भागात थंडीचे प्रमाण वाढून त्यांना अन्न, निवारा मिळेनासा झाला की, ते देशातील जलाशयांकडे धाव घेतात. जिल्ह्यातील तलावांवर स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन घडत आहे, असे पक्षीमित्र अमोल सावंत यांनी सांगितले.

**निसर्गचक्रात बदलाने पक्ष्यांचे आगमन लांबले-**

पाच महिने परदेशी पाहुणे पक्षी जिल्ह्यात राहतात. त्यानंतर मार्चमध्ये हे पक्षी परतीचा प्रवास करतात . यंदा परतीचा पाऊस लांबला. त्यामुळे निसर्गचक्रात बदल झाल्याने यंदा पक्ष्यांचे आगमन लांबले, असे वन्यजीव अभ्यासक देवेंद्र तेलकर यांनी सांगितले.

## गोआधारित विज्ञानाचा शेतीसाठी वापर नव्या युगाची गरज : उद्धव नेरकर

■ महासागर प्रतिनिधी,

**मूर्तिजापूर , दि.११ :** भारतीय गोवंश हा देशातील अनेक समस्या सोडवू शकतो, असे स्पष्ट झाल्यावर अनेक शेतकऱ्यांनी गोआधारित शेतीचा मार्ग पत्करला आहे. त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. गो विज्ञानाचा गोआधारित शेतीसाठी वापर ही नव्या युगाची गरज असल्याचे मत महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर यांनी गोपाष्टमीनिमित्त पुंडलिक महाराज गोरक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना केले.



याप्रसंगी उद्योजक कैलासचंद्र अग्रवाल, व अजाबराव वहिले महाराज, श्यामसुंदर सोमाणी मंचावर उपस्थित होते. गेल्या सत्तर वर्षांत म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर देशात रासायनिक खतांचा वापर वाढला. त्याने उत्पादनात वाढ झाली. पण रासायनिक खतांमुळे सारे पीक विषाचा अंश असणारे निर्माण झाले. त्याचा परिणाम म्हणजे सध्या या देशात दहा लाख कोटींचे रासायनिक खतही वापरले जात आहे. त्यातून येणाऱ्या आजारपणांसाठी दहा लाख कोटी रुपयांची औषधेही वापरली जात आहेत.

रासायनिक खताने शेती खराब आणि कमी उत्पन्न देणारी झाली आहेत. त्यासाठी अन्न सेंद्रिय पद्धतीने उत्पादित करण्याची मोहीम राबवल्या गेली पाहिजे. या गोविज्ञान यज्ञात फक्त ग्रामीण भागातील लोकांनीच नव्हे, तर शहरातील लोकांनीही सहभागी होण्याची आवश्यकता आहे. असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंदन अग्रवाल यांनी केले. आभार प्रदर्शन अनुप अग्रवाल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्यामसुंदर सोमाणी, रवी महाजन, मनोहर निमोदिया, विवेक तांबे, अशोक भावनांनी बंटी बुंदानींसह पुंडलिक महाराज गोरक्षण संस्थेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## जगातील सर्वोच्च संपत्ती ही आईकडून प्राप्त संस्कार:श्रीराम महाराज चिखलीकर

**मानोरा :** काही प्रसंग असे असतात की त्यावेळी व्यक्तीजवळ पैसा, घर, गाडी, बंगला कितीही मोठे असले तरी ती संपत्ती संकटाच्या वेळी कामाला येत नाही परंतू त्यावेळी आईने दिलेल्या संस्काराची शिदोरी नक्कीच कामाला येते, असे प्रतिपादन ह.भ.प. श्रीराम महाराज, चिखलीकर यांनी वाईगौळ येथिल चतुर्दशी कार्यक्रमात केले. गेंदीबाई यांचे वार्धक्याने २७ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या चतुर्दश दिवसाचा कार्यक्रम आज तपस्वी काशीनाथ बाबा यांच्या समाधी मंदिरासमोरील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सकाळी वाजेपासून बंजारा भजनाचा कार्यक्रम झाला त्यानंतर श्रीराम महाराज, चिखलीकर यांचे गुरुमाता गेंदीबाई यांच्या प्रवचन झाले. त्यांनी गेंदीबाई यांच्या त्यागमय आणि करुणामयी जीवनावर आधारीत काही प्रसंगावर प्रकाश टाकला. त्यावेळी बऱ्याच उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू आले. तद्नंतर जगदीश महाराज महाराज, ब्रम्हनाथ यांचे श्रद्धांजलीपर संवेदना व्यक्त केल्या आणि सामूहिक श्रद्धांजली व्यक्त केली. अन्नदानाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी अनेकांनी आपली उपस्थिती लावून राठोड कुटुंबीयांप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

## मतदान यंत्र हाताळण्याच्या प्रक्रियेत पक्षांचा सहभाग घ्या -जिल्हाधिकारी



■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. ११:** निवडणूक कामांचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया. - येत्या २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी तयारीचा आढावा घेतला. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हाताळताना, यंत्र मतदानासाठी तयार करताना राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचा सहभाग घ्या. संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ चित्रिकरण करा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. मतदान केंद्रांवर सर्व आवश्यक सुविधा सज्ज ठेवण्याचेही त्यांनी सूचित केले. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवडणूक उपजिल्हाधिकारी श्रीकांत उंबरकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, सर्व जिल्हास्तरीय नोडल अधिकारी व जिल्ह्यातील सर्व सातही विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. आचारसंहिता कालावधीत कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास आचारसंहितेचा भंग होईल, असे कृत्य करता येत नाही, असे आढळल्यास संबंधितांनावर कारवाई करा. मतदानाचा दिवस जवळ येत आहे. त्यामुळे मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा जसे मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालय, वीज व्यवस्था, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प व आवश्यक सुविधा, आरोग्य व्यवस्था यादी तयारी करुन ठेवावी. ज्या ठिकाणी ४ किंवा अधिक मतदान केंद्र आहे, त्या ठिकाणी चांगले व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. नागरिकांना मतदान केंद्रावर पोहोचण्यापूर्वीच त्यांनी नावे कोणत्या यादीत आहेत आणि त्यांचा क्रमांक काय आहे, हे कळल्यास त्यांना मतदान केंद्र व यादीत नाव शोधताना अडचण होणार नाही. त्यामुळे मतदान दिवसाच्या पूर्वीच सर्व मतदारांना वोटर स्लीपचे वाटप होणे आवश्यक आहे. शहरी भागात स्लीपचे वाटप व्यवस्थित होत असल्याची खात्री निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्वत: करावी. काही ठिकाणी मी स्वत: अचानक भेटी देऊन पडताळणी करणार असल्याचेही जिल्हाधिका-यांनी अधिका-यांनसांगितले.

## उभ्या ट्रकवर कंटेनर धडकून एक जागीच ठार



**चिखली :** डोणगाव पोलिस स्टेशन अंतर्गत ग्राम बेलगाव येथे उभ्या ट्रकवर कंटेनर धडकून भीषण अपघात झाल्याची घटना रविवारी दुपारी वाजेच्या सुमारास घडली. यात १ ठार २ जखमी झाल्याची घटना घडली आहे. डोणगाव येथून जवळच असलेल्या बेलगाव शिवारात समृद्धी महामार्गावर नागपूर कडून मुंबई कडे कोळशाची वाहतूक करणारा एम एच २८ बीबी ६५६५ हा ट्रक पंक्चर झाल्याने रस्त्याच्या कडेला उभा करून ड्रायव्हर टायर बदली करत असताना अचानक मागून येणारा पी बी ११ बी आर १७४२ हा कंटेनर उभ्या असलेल्या ट्रकवर आदळल्याने टायर बदलत असलेल्या समाधान अभिमान असोले (वय ३५) रा. आसोला ता. सिंदखेडराजा यांचा जागीच मृत्यू झाला यात त्यांच्यासोबत असलेले यादव साहेबराव टेकाळे रा. मलकापूर पांग्रा हे जखमी झाले. धडक देणारा कंटेनर मधील चालक प्रकाश सुखदेव पोहरीकर राहणार सांगोला ता. सांगली जखमी झाला असता महामार्गावरील अपघाताचा आवाज ऐकून शेजारी शेतात काम करणारे शेतकरी शेतमजुरांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना बाहेर काढले.

## बडनेरा रेल्वे स्टेशनवर तिकीटआरक्षण कक्षाचे निर्माण सुरू

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि.११:** बडनेरा रेल्वे स्टेशनचा हळूहळू कायापालट होत आहे. रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर आधी खड्डे होते. तेथे आता सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता तयार होत आहे. त्याचप्रमाणे अमृत दोन योजनेंतर्गत बडनेरा स्टेशनवर आता तिकीट आरक्षण कक्षाचे निर्माण कार्य सुरू झाले असून, ते पूर्ण झाल्यानंतर येथून रेल्वे तिकीट आरक्षित करता येणार आहे. हे आरक्षण केंद्र अद्ययावत राहणार आहे.सध्या बडनेरा रेल्वे स्टेशनच्या बाहेर काम सुरू आहे. वाहनांच्या पार्किंगसाठी शेडचे निर्माण केल्यानंतर जयहिंद व चांदणी चौकाकडून रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या दोन प्रवेशद्वारांचीही निर्मिती झाली आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD RAFIQ.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD RAFIQUE MOHAMMAD YUSUF.**
**ADD :** PLOT NO 11, NEW NAGPUR HOUSING SOCIETY ,BABA FARID NAGAR , MANKAPUR NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **SAVITA KUMARI.** NOW MY NEW NAME IS **SAVITA SIDDHESH CHOUDHARY.**
**ADD :** 23 HINGNA ROAD, RADKE LAYOUT NAGPUR 440016

MY OLD NAME WAS **JINAT AFROZ.** NOW MY NEW NAME IS **ZEENAT AFROZ.**
**ADD :** EKTA NAGAR NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **ASIK ALI ANSARI / ASHIQUE ALI.** NOW MY NEW NAME IS **ASHIK ALI.**
**ADD :** EKTA NAGAR NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **SALMA BEGAM.** NOW MY NEW NAME IS **SALMA PARVEEN MUZAFFAR KHAN.**
**ADD :** PLOT NO.87/A, SANJAY BAGH COLONY, RAZA CHOWK, DR.AMBEDKAR MARG, NAGPUR 440017 MS

MY OLD NAME WAS **KHAN AHMAD RAJA MUJAFFAR.** NOW MY NEW NAME IS **AHMAD KHAN MUZAFFAR KHAN.**
**ADD :** PLOT NO.87/A, SANJAY BAGH COLONY, RAZA CHOWK, DR. AMBEDKAR MARG, NAGPUR 440017 MS

**जोडपत्र ४७**
**प्रपत्रे क-१ ते सी ८ आणि क/सीएअ**
**प्रपत्र क-१**

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

**उमेदवाराचे नाव व पत्ता :** **गणेश ईश्वरजी हरकंडे**

**राजकीय पक्षाचे नाव :** **वंचित बहुजन आघाडी**

**(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे)**

**निवडणुकीचे नाव :** **५४, पुर्व नागपुर विधानसभा, महाराष्ट्र.**

**मतदारसंघाचे नाच :** **५४, पुर्व नागपुर विधानसभा**

**मी गणेश ईश्वरजी हरकंडे** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | मुख्य न्याय दडाधिकारी नागपुर | RCC No. 3082/17 01-09-2017 | २९४, ३३२, ३५३, १८६, ३४ भा.द.वि. १३५, मु.पो.कायदा |
| - | - | - | - |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| - | - | - | - |
| - | - | - | - |
| - | - | - | - |

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११/११/२०२४**

**सही/-**
**गणेश ईश्वरजी हरकंडे**

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# जोश

### शेर की जुबानी

तारों में अकेले चांद जगमगाता है,
मुश्कील में अकेला इंसान डगमगाता है,
कांटो से मत घबराना मेरे दोस्त,
क्योंकी कांटों में भी गुलाब मुस्कुराता है।

प्यारी सी सुबह बोली उठ के देख क्या नजारा है,
मैंने कहा रुक पहले मेसेज तो भेजने दे उसे,
जो इस सुबह से भी प्यारा है।

जिसे दिल की कलम और मोहब्बत की इंक कहते हैं, जिसे लम्हों की किताब और यादों का कव्हर कहते हैं, यही वो सबजेक्ट है जिसे, फ्रेंडशीप कहते है.।


### स्मार्ट टिप्स

## झटपट डिलिट करा मेल्स

दोस्तांनो, जी मेलवर असंख्य मेल्स येऊन पडत असतात. जाहिरातींच्या किंवा अन्य अनावश्यक मेल्समुळे इनबॉक्स भरून जातो आणि या मेल्स डिलिट करताना नाकी नऊ येतात. या मेल्स ऑटोमॅटिक डिलिट होऊ शकतात. यासाठी जी मेल ओपन करा. मग सर्च बारमधल्या फिल्टर आयकॉनवर क्लिक करा. इथे फिल्टर आयकॉन दिसला नाही तर सेटिंग्जमध्ये फिल्टर अँड ब्लॉक अॅड्रेसमध्ये क्रिएट न न्यू फिल्टरवर क्लिक करा. इथे तुम्हाला फ्रॉम हा पर्याय दिसेल. इथे नकोसे ई मेल अॅड्रेस नोंदवा. यानंतर क्रिएट फिल्टरवर क्लिक करून डिलिट इट वर टॅप करा. यानंतर पुन्हा क्रिएट फिल्टरवर क्लिक करा. यानंतर संबंधित ई मेल अॅड्रेसवरून येणाऱ्या सगळ्या मेल्स आपोआप डिलिट होतील आणि तुमचा त्रास वाचेल.

### स्मार्ट ट्रिक्स

## वापरा जी मेल शॉर्टकट्स



जीमेलचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. जीमेलमध्ये असंख्य शॉर्ट कट्स असतात. मेल पाठवण्यापासून कंपोझ करेपर्यंत विविध कामांसाठी या शॉर्टकटचा वापर करता येतो. हे शॉर्टकट्स ॲक्टिवेट करण्यासाठी सर्वात आधी जी मेल सेटिंग्जमध्ये जा. गियर आयकॉनमध्ये हा ऑप्शन असेल. यानंतर सेटिंग्जवर क्लिक करा. स्क्रॉल डाउन केल्यावर तुम्हाला की बोर्ड शॉर्टकटचा ऑप्शन दिसेल. हा ऑप्शन ऑन करा. यानंतर सेव्ह चेंजेस वर क्लिक करा. यानंतर तुम्ही विविध शॉर्टकट्सचा वापर करू शकता.

### सोशल मीडिया

## गूगल फाईंड माय डिव्हाईस ॲप

फोनची चोरी टाळणं आपल्या हातात नसलं तरी तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण हरवलेला किंवा चोरी झालेला स्मार्टफोन परत मिळवू शकतो. यासाठी गूगल फाईंड माय डिव्हाईस हे ॲप उपयोगी पडू शकेल. फोन चोरीला गेल्यानंतर सर्वात आधी दुसऱ्या एखाद्या स्मार्टफोनमध्ये फाईंड माय डिव्हाईस ॲप डाउनलोड करून घ्या. ॲपमध्ये हरवलेल्या फोनमधलं जीमेल अकाउंट या ॲपमध्ये ओपन करा. यामुळे तुम्हाला चोरलेल्या फोनचा ठावठिकाणा कळू शकेल. या ॲपमधल्या तीन पर्यायांचा वापर तुम्ही करू शकता. प्ले साउंड, सिक्युर डिव्हाईस आणि इरेज डिव्हाईस हे ते तीन पर्याय आहेत. प्ले साउंड या पर्यायाचा वापर करून तुम्ही फोन रिंगिंगवर आणू शकता. सिक्युर डिव्हाईसच्या माध्यमातून चोराला मेसेज पाठवू शकता. तसंच इरेज डिव्हाईस या पर्यायाचा वापर करून फोनमधली महत्त्वाची कागदपत्रं डिलिट करू शकता.

### बी अलर्ट

## या बगपासून सावध रहा...

स्मार्टफोन आपल्या आयुष्याचं अविभाज्य अंग बनून गेला आहे. बरेच आर्थिक व्यवहार स्मार्टफोनच्या माध्यमातून केले जातात. याच कारणामुळे हॅकर्स स्मार्टफोनला लक्ष्य करतात. एका बगमुळे स्मार्टफोन युजर्सची माहिती लीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. 'स्ट्रँडहॉग' नावाचा हा बग तुमची महत्त्वाची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचवू शकतो. काही ॲप्सच्या माध्यमातून हा बग स्मार्टफोनमध्ये प्रवेश करतो आणि हॅकर्स आपला कार्यभाग साधून मोकळे होतात.




त्यामुळे प्रत्येकाने जागरूक रहाणं गरजेचं आहे.

**आपल्या देशात गरजूंची कमतरता नाही. कोणाला अन्न मिळत नाही तर कोणी शिक्षणाच्या सुविधांपासून वंचित रहातं. काही गावांमध्ये रोगराई पसरलेली असते. आपल्याला अगदी किरकोळ वाटणारे प्रश्नही खूप महत्त्वाचे असू शकतात. विनिल रेड्डीने गरजूंच्या गरजा ओळखल्या. त्याच्या अंगी लहानपणापासूनच परोपकारी वृत्ती भिनलेली होती. आज त्याची सेवाभावी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून तो लाखो लोकांना मदत करतो आहे.**






## सेवाभाव जपणारा विनिल

इतरांना मदतीचा हात देताना बरेच जण दहा वेळा विचार करतात. मात्र परोपकारी वृत्ती असेल तर सगळं काही जुळून येऊ शकतं. यासाठी विनिल रेड्डीचं उदाहरण देता येईल. विनिल हा २५ वर्षांचा तरुण. पेशाने इंजिनिअर आहे. त्याच्याकडे उत्तम नोकरी आहे. पण फक्त मी आणि माझं एवढाच विचार तो करत नाही. त्याला इतरांना मदत करायला खूप आवडतं. म्हणूनच १४ वर्षांचा विनिल कॅन्सरग्रस्त मुलाच्या मदतीसाठी धावत सुटला होता. विनिल आणि त्याचे काही सहकारी या मुलाशी गप्पा मारायचे. खेळायचे. या मुलाचा मृत्यू होईपर्यंत हे सगळं सुरूच राहिलं. यात विनिलला भाऊ सुनिलची साथ लाभली. हे या दोघांचं परोपकाराच्या दिशेने टाकलेलं पहिलं पाऊल होतं. विनिलला पुढे मानवतेचा दूत व्हायचं होतं. विनिलने 'अभिस्ती वेल्फेअर सोसायटी' ही झीरो फंड सेवाभावी संस्था सुरू केली. आज या संस्थेचे ३५ हजारांपेक्षा जास्त कार्यकर्ते आहेत. या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून विनिल लोकांना मदत करतो. या संस्थेच्या देशभरात ५६ शाखा आहेत. अन्नदान, शेतकऱ्यांना मदत, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं दान, गाव दत्तक घेणं अशी बरीच कामं या संस्थेच्या माध्यमातून सुरू आहेत.

विनिलने २०१५ मध्ये ही संस्था सुरू केली. दहावीत असताना विनिलने शाळेत स्माईलीज कॅन्सर फाउंडेशन हा उपक्रम राबवला होता. या अंतर्गत वर्गातल्या प्रत्येक मुलाला दिवसाला एक रुपया दान करायचा होता. म्हणजे महिन्याला ३० रुपये दान करावे लागणार होते. या पैशातून विनिल कपडे, धान्य, खाण्याचं साहित्य औषधं, किराणा सामान

### अचिव्हर

विकत घेऊन कॅन्सरग्रस्तांच्या नातेवाईकांना देत असे. पदवी मिळवल्यानंतर विनिलने समाजसेवेचा आवाका वाढवायचं ठरवलं आणि अभिष्टी या संस्थेची स्थापना झाली. गेल्या चार वर्षांत अभिष्टीच्या माध्यमातून असंख्य उपक्रम राबवण्यात आले आहेत आणि ते सुद्धा बाहेरची मदत न घेता.

स्वत:ला आलेल्या अनुभवांनंतर विनिलने लोकांना मदत करायचं ठरवलं. मध्यंतरी मध्यरात्री बसने प्रवास करत असताना विनिलला खूप भूक लागली. पण एवढ्या रात्री त्याला काहीच खायला मिळालं नाही. यामुळे दररोज ये-जा करणाऱ्या प्रवाशांची व्यथा त्याच्या लक्षात आली. अनेक गरीब लोकांना कामानिमित्ताने एवढा लांबचा प्रवास करावा लागतो. या लोकांना रात्री खायला मिळावं म्हणून विनिल आणि संस्थेचे कार्यकर्ते हॉटेलच्या मालकांना भेटले. त्या मालकांनी हॉटेलमधलं राहिलेलं अन्न वाटण्याची परवानगी दिली. काही काळानंतर लोकांना मदत म्हणून ही हॉटेल्स स्वत:हून अन्नदान करू लागली. या संस्थेने एक गावही दत्तक घेतलं आहे. तरुणांना करिअरबाबत मार्गदर्शन केलं आहे. महिलांना रोजगार दिले आहेत. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून दिलं आहे. विनिल आपली नोकरी सांभाळून हे सगळं करतो. तर अशा या विनिलच्या सेवाभावी वृत्तीला सलाम करायलाच हवा.

## लेदर जॅकेटचे फंडे

**थंडीत एखादं लेदर जॅकेट घेण्याचा मोह होतोच. लेदर जॅकेट चांगलंच महाग असतं. त्यामुळे ते घेताना मनात धाकधूक असते. आपलं जॅकेट टिकेल ना, हा प्रश्नही पडतो. म्हणूनच या टिप्स फॉलो करा आणि बिनधास्त लेदर जॅकेट विकत घ्या.**



1. लेदर जॅकेट घातल्यावर फुगीर होता कामा नये. तुमच्या शरीरावर जॅकेट छान शोभून दिसायला हवं. त्यामुळे थोडं छोट्या साईझ चं जॅकेट घ्या. लेदरच्या प्रकारानुसार साईझ ठरवा. लेदर जॅकेटचं फिटिंग महत्त्वाचं असतं. योग्य फिटिंगवालं जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं.
2. लेदर जॅकेट वारंवार घातलं जाणार असल्यामुळे रंगाची निवड योग्य असायला हवी. जॅकेटचा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारा असावा. टॅन लेदर जॅकेट्स योग्य वाटत नसतील तर हे रंग घेऊ नका. त्याऐवजी काळं किंवा कॉफी ब्राउन रंगाचं जॅकेट घ्या. गडद रंग आवडत असतील लाल रंगाचं जॅकेट खरेदी करायला हरकत नाही.
3. लेदर जॅकेटचे विविध प्रकार असतात. तुम्ही लेदर जॅकेट कुठे वापरणार आहात हे ठरवा. फॉर्मल आणि कॅज्युअल यापैकी एका जॅकेटची निवड तुम्हाला करायची आहे. बॉम्बर जॅकेट, बायकर जॅकेट, रेसर जॅकेट

### फॅशन पॅशन

हे प्रकार बाजारात मिळतात. बायकर जॅकेटला बऱ्याच ठिकाणी चेन लावलेली असते. आकर्षक बटणंही असतात. नावाप्रमाणेच हे जॅकेट बायकर्ससाठी असतं. त्यामुळे बाईकस्वार हे जॅकेट निवडू शकतात. बॉम्बर जॅकेटमुळे तुम्हाला स्पोर्टी लूक मिळतो. हे जॅकेट कोणीही कॅरी करू शकतं. रेसर जॅकेटवर फारसं डिझाइन नसतं. साधं पण आकर्षक असं हे जॅकेट आहे. या जॅकेटमुळे तुम्ही स्टायलिश दिसू शकता.

4. जॅकेटच्या स्लीव्हज मनगटापर्यंत असाव्यात. मोटरसायकल जॅकेट्सच्या बाह्यांची लांबी यापेक्षा अधिक असू शकते. पण सर्वसाधारण लेदर जॅकेट घेणार असाल तर बाह्यांकडे नक्की लक्ष द्या.
5. लेदर जॅकेटची लांबी कंबरेपर्यंत असावी, त्यापेक्षा अधिक लांबीचं जॅकेट घेऊ नका. तसंच हे जॅकेट खांद्यांलगतही नीट बसायला हवं.



## गरमागरम रोटी नूडल्स

### झटपट रेसिपी

पोळ्या उरल्यावर चांगलीच पंचाइत होते. या पोळ्या टाकून द्याव्या लागतात किंवा फोडणीची पोळी करावी लागते. पण आता या पोळ्यांपासून तुम्ही चविष्ट नूडल्स बनवू शकता. रोटी नूडल्सची ही रेसिपी जाणून घेऊ.

**साहित्य** : पोळ्या, जीरं, एक कांदा, दोन टोमॅटो, एक गाजर, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा सोया सॉस, लाल तिखट आणि धडेपूड प्रत्येकी एक चमचा, अर्धा चमचा हळद, गरम मसाला, मीठ, तेल आणि कोथिंबिर,

**कृती** :सर्व भाज्या चिरून घ्या. आता कढईत तेल गरम करा. त्यात जीरं घाला. थोडं परतून घ्या. पोळ्यांचे लांब तुकडे करून घ्या. तेलात कांदा घालून परता. मग हिरवी मिरची घाला. मग गाजर आणि टोमॅटो घालून थोडं शिजवून घ्या. भाज्या शिजल्यावर त्यात सर्व मसाले आणि मीठ घाला. दोन मिनिटं परता. मग सोया सॉस घाला. शेवटी पोळ्यांचे तुकडे घालून मिक्स करा. त्यावर कोथिंबिर घाला आणि गरमागरम रोटी नूडल्स खा.

## वजन कमी करायचं?



### फिटनेस

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी नेमकं काय करायचं, असा प्रश्न वजन कमी करणाऱ्या प्रत्येकालाच पडलेला असतो. विविध प्रकारची डाएट्स, व्यायामप्रकार, वजन कमी करणाऱ्या पावडर्स यापैकी नेमकं काय निवडायचं याबाबत गोंधळ उडलेला असतो. पण काही उपायांमुळे तुमचं वजन कमी होऊ शकतं. हे उपाय प्रभावी असल्याचं वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालं आहे. अगदी सहज सोपे हे उपाय तुम्हीही करून बघू शकता.

- वजन कमी करण्यासाठी शरीरातला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. यासाठी पुरेसं पाणी प्यायला हवं. पाणी प्यायल्यानंतर पुढच्या एक ते सव्वा तासात चयापयच क्रियेचा वेग २४ ते ३० टक्क्यांनी वाढतो. यामुळे अधिक कॅलरी खर्च होतात. जेवणाच्या अर्धा तास आधी अर्धा लीटर पाणी प्यायल्यामुळे तुलनेने कमी अन्न खाल्लं जातं, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. अशा पद्धतीने पाणी पिणाऱ्यांचं वजन पाणी न पिणाऱ्यांच्या तुलनेत झपाट्याने कमी झाल्याचं दिसून आलं.
- व्यायामाआधी ब्लॅक कॉफी पिणं चांगलं असतं असं म्हटलं जातं. कॅफेनमुळे चयापचय क्रियेचा वेग वाढत असल्याचं सप्रमाण सिद्ध झालं आहे. यामुळे कॅलरीही लवकर खर्च होतात. या कॉफीत साखर किंवा अधिक कॅलरीयुक्त घटक मिसळू नये.
- साखरेमुळे वजन वाढतं. त्यामुळे साखर असणारे पदार्थ खाऊ नका. आहारातलं साखरेचं प्रमाण कमी करा.
- काही मसाल्यांमुळे चयापचय क्रियेला गती मिळते. त्यामुळे आहारात मसाल्यांचा समावेश करता येईल.
- अंडी खाण्याचे बरेच लाभ आहेत. न्याहरीला अंडी खाल्ल्यानंतर पुढचे ३६ तास कमी भूक लागते. यामुळे या काळात शरीरात जाणाऱ्या कॅलरींचं प्रमाण ३५ टक्क्यांनी घटतं. त्यामुळे आहारात अंड्यांचा समावेश करावा. शाकाहारींनी आहारात प्रथिनयुक्त पदार्थांचं प्रमाण वाढवावं.





## एनआयएफटीतल्या प्रवेशासाठी...

### स्पर्धा-परीक्षा

नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी म्हणजे एनआयएफटी. या संस्थेतर्फे दरवर्षी प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं जातं. दरवर्षी जवळपास २२ हजार विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यापैकी एक तृतीयांश म्हणजे ७७०० विद्यार्थी उत्तीर्ण होत असले तरी गुणांनुसार फक्त २४०० विद्यार्थ्यांना संस्थेत प्रवेश दिला जातो. फॅशनविश्वात करिअर करण्याची इच्छा असणाऱ्या अनेकांना या नामवंत संस्थेत प्रवेश घ्यायचा असतो. या संस्थेतल्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ही प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेची तयारी कशी करायची? जाणून घेऊ.

या प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती आणि कल्पकता तपासली जाते. त्यामुळे या परीक्षेत विद्यार्थ्यांची सर्वसाधारण समज, निरिक्षणशक्ती आणि सादरीकरणाची पद्धत जाणून घेण्यासाठी प्रश्न तयार केले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली कौशल्यं वाढवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.

क्रिएटिव्ह ॲबिलिटी टेस्ट म्हणजे (कॅट) परीक्षा दिल्यानंतर विद्यार्थी बॅचलर ऑफ डिझाइन अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात तर जनरल ॲबिलिटी टेस्ट म्हणजे गॅट परीक्षा दिल्यानंतर तुम्ही बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकता. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी सराव तसंच जुन्या प्रश्नपत्रिका सोडवण्याचा प्रयत्न करा. सरावामुळे तुम्हाला परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा अंदाज येईल.

अंगी सगळी कौशल्यं असली तरी पेपर वेळेत सोडवणं गरजेचं असतं. यासाठी भरपूर मेहनत करणं गरजेचं आहे. गती वाढवली तरच ही परीक्षा उत्तीर्ण होता येते हे लक्षात घ्या.

## बहिणीशी बोलणं आवडत नाही...

गेल्या चार वर्षांपासून माझं एका मुलीवर प्रेम आहे. या मुलीला धाकटी बहीण आहे. मला वाटतं माझ्या प्रेयसीला तिच्याच धाकट्या बहिणीची असूया वाटते. मी तिच्या बहिणीशी बोललेलं तिला आवडत नाही. मलाही एक धाकटा भाऊ आहे आणि तिची बहिण त्याच्या वर्गात आहे. मी माझ्या भावाशी जसं वागतो तसंच तुझ्या बहिणीशी वागत असल्याचं मी तिला अनेकदा सांगितलं आहे. पण तिला हे पटत नाही. यामुळे आमच्यात वाद होतात. मी काय करू?

**उत्तर** : भावंडांचं नातं अनोखं असतं. खरंतर दोन बहिणी एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी असतात. पण या दोघींच्या नात्यात काही कारणांमुळे दुरावा आला आहे का हे जाणून घे. दुसरं म्हणजे तिला तुझ्या कोणत्या गोष्टी खटकतात हे समजून घेण्याचा प्रयत्न कर. तिचे तिच्या बहिणीशी काही वाद असू शकतील. मागील काही घटनांमुळे ती असं वागत असेल. हे नातं टिकवून ठेवण्यासाठी ती असं करत असेल. त्यामुळे नेमकं काय आणि कुठे चुकतंय हे तू जाणून घ्यायला हवं. पालक आपल्या मुलांची तुलना करतात. तुझ्या प्रेयसीची तिच्या बहिणीशी तुलना होत असेल. लहानपणी घडलेल्या काही घटना तिच्या अशा वागण्याला कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे नेमकी कारणं जाणून मग पुढचा निर्णय घे. तुझ्या प्रेयसीशी मोकळेपणाने बोल. तिला काय खटकतं, हे जाणून घे. यामुळे तुला या नात्याची दिशा ठरवता येईल. मुख्य म्हणजे वादाचे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न कर.

### मॅच मेकिंग



## इंट्रो तर झालाच पाहिजे!

**मित्रांनो, इंट्रो तर झालाच पाहिजे, हा संवाद चांगलाच गाजला. तुम्हीही हा संवाद ऐकला असेल. मध्यंतरी बाला हा चित्रपट आला होता. यात तरुण वयात टक्कल पडल्यानंतर पुरुषांना सामोरं जाव्या लागणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. पुरुषांचेही केस गळतात. अवघ्या तिशीतच केस गळण्याची ही समस्या तीव्र स्वरूप धारण करते. केस गळणं ही समस्या वाटते तितकी साधी नाही. यामागे बरीच कारणं असू शकतात. अर्थात एका क्षणात सर्व काही सुरळीत होणार नाही. पण केस गळण्याची ही प्रक्रिया पुढे ढकलण्यासाठी तुम्ही प्रयत्न करू शकता.**

### लाईफस्टाईल

- काही घरगुती उपायांनी केस गळण्याचं प्रमाण कमी करता येईल. बीटमध्ये बरेच पोषक घटक असतात. बीटचा रस प्यायल्यामुळे बरेच लाभ होऊ शकतात. बीट फक्त केसांसाठीच नाही तर तुमच्या सर्वांगिण आरोग्यासाठी चांगला असतो. आठवड्यातून तीन वेळा बीटचा रस प्या.
- केसांचा मसाज करणं गरजेचं आहे. तुम्ही नियमित मसाज करून घ्या. मसाजमुळे केसांची मुळं बळकट होतात. इतकंच नाही तर केस दाटही होतात.
- भृंगराज ही अत्यंत प्रभावी अशी औषधी वनस्पती आहे. भृंगराजमुळे केसांना बळकटी मिळते. त्यामुळे भृंगराजयुक्त केश तेलाचा वापर करा. या तेलाने मसाज करा. यामुळे केसांची चांगली वाढ होईल.
- अंडी हा सल्फरचा प्रभावी स्रोत आहे. केसांचा दर्जा सुधारण्यासाठी दोन अंडी फेटून त्यात चमचाभर



दही घाला. हे मिश्रण केसांना लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.

- मुलं रोज केस धुतात. पण हा मोह टाळा. केस गळत असतील तर आठवड्यातून दोन वेळा केस धुवा. सौम्य शँपूचा वापर करा. तुमचा शँपू तसंच कंडिशनरमध्ये पॅराबेन आणि सल्फेट असे घटक असणार नाहीत याची खात्री करा.




# काँग्रेस पक्ष पहिल्यांदाच इतका कठोर
# झटक्यात २८ जणांचे निलंबन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
अनेकदा मिळमिळीत आणि सौम्य भूमिका घेणारा, बंडखोरांना कालांतराने पक्षात सामावून घेणारा काँग्रेस पक्ष यावेळी विधानसभा निवडणुकीत प्रथमच कठोर झाल्याचे दिसून येत आहे . पक्षविरोधी कारवाया आणि बंडखोरी करणाऱ्या तब्बल २८ जणांना काँग्रेसने पक्षातून निलंबीत केले आहे.



महाविकास आघाडीतील नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही रामटेक, कसबा, शिवाजीनगर आणि पर्वती विधानसभा मतदारसंघात बंडखोरी करणाऱ्या काँग्रेसच्या उमेदवारांना काँग्रेसकडून नोटीस बजाविण्यात आली होती.

बंडाची तलवार म्यान करून महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांना पाठिंबा जाहीर करावा. तसे न केल्यास निलंबनाची कारवाई करण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला होता. त्यानंतरही अर्ज माघार न घेतलेल्या आणि बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांना ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिली होती.

त्यानंतर सोमवारी पुन्हा २८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार तसेच काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी केलेल्या विविध मतदारसंघातील एकूण २८ जणांना काँग्रेस पक्षातून ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या निर्देशाने ही कारवाई करण्यात आली आहे.

प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी ही माहिती दिली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाच गॅरंटी आम्ही काल जाहीर केल्या आहेत.

भारताचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी या गॅरंटी महत्त्वाच्या आहेत. १३, १६ आणि १७ नोव्हेंबरला प्रियंका गांधी महाराष्ट्रात येत आहेत. मल्लिकार्जुन खरगे पाच दिवस महाराष्ट्रात प्रचार करणार आहेत.

सुरुवातीला सहा पदाधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले होते. यात रामटेक विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री राजेंद्र मुळक, काटोलमधून काँग्रेसचे दिवंगत नेते श्रीकांत जिचकार यांचे सुपुत्र याज्ञवल्क्य जिचकार, पर्वती विधानसभा मतदारसंघातून आबा बागुल, सांगली विधानसभेसाठी काँग्रेसने पृथ्वीराज पाटील यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराज झालेल्या जयश्री पाटील आणि कसबा विधानसभा मतदारसंघातून कमल व्यवहारे यांना ६ वर्षासाठी निलंबित करण्यात आले आहे.

विविध मतदारसंघातील आनंदराव गेडाम, शिलु चिमूरकर, सोनल कोवे, भरत येरमे, अभिलाषा गावतूरे, राजू झोडे, प्रेमसागर गणवीर, अजय लांजेवार, विलास रघुनाथ पाटील, आसमा जव्वाद चिखलेकर, हंसकुमार पांडे, कमल व्यवहारे, मोहनराव दांडेकर, मंगल विलास भूजबळ, मनोज शिंदे, सुरेश पाटीलखेडे, विजय खडसे, शबीर खान, अविनाश लाड यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे .

## 'बटेंगे तो कटेंगे' ला मलिकांचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



'बटेंगे ते कटेंगे' ही घोषणा उत्तर प्रदेश आणि झारखंडमध्ये चालेल, पण महाराष्ट्रात ती चालणार नाही. मी त्याचे समर्थन करत नाही. आमचा नारा आहे - सबका साथ सबका विकास, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या नाऱ्याला विरोध केला आहे. यानंतर नवाब मलिक यांनी देखील याचा विरोध केल्याचे समोर आले आहे.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि मानखुर्द शिवाजी नगर येथील उमेदवार नवाब मलिक यांनी देखील अजित पवारांप्रमाणे बाजू मांडली आहे. नवाब मलिक म्हणाले, म्हणतात, बटेंगे तो कटेंगे' सारखी विधाने चुकीची, घृणास्पद आहेत. यातून कोणताही फायदा होऊ शकत नाही.

अशा प्रकारच्या राजकारणामुळे उत्तर प्रदेशचे खूप नुकसान झाले आहे. अगदी मंदिराच्या उभारणीत उत्तर प्रदेशात भाजपचा दारुण पराभव झाला. त्यामुळे अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांवर राजकारण केले पाहिजे. लोकांच्या विकासाची चर्चा व्हायला हवी. हिंदू-मुस्लिमच्या नावावर कोणीही देशाचे विभाजन करू नये, असे स्पष्ट मत नवाब मलिक यांनी व्यक्त केले आहे.

महायुतीच्या विशेषतः भाजपच्या उमेदवारांच्या प्रचार सभांमध्ये योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे ते कटेंगे' असे नारे दिले होते तसेच भाजपच्या नेत्यांनी देखील याला दुजोरा दिलेला असताना अजित पवारांनी मात्र याचा विरोध केला आहे.

अजित पवार म्हणाले, भाजपच्या इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी काय बोलावे ते ठरवावे. महाराष्ट्राबाहेरचे लोक येऊन अशा गोष्टी सांगतात. आम्ही महायुतीमध्ये एकत्र काम करत आहोत, पण आमच्या पक्षांच्या विचारधारा वेगळ्या आहेत. इतर राज्यात हे चालेल, पण महाराष्ट्रात ते चालणार नाही.

दरम्यान, भाजपचा विरोध असताना देखील अजित पवारांनी नवाब मलिक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नवाब मलिक यांचे दाऊदसोबत संबंध असल्याचे आरोप भाजपने ठेवले होते तसेच त्यांना अटक देखील करण्यात आली होती. असे असून देखील महायुतीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीत नवाब मलिक यांनी प्रवेश केला.

एवढेच नव्हे तर अजित पवारांनी नवाब मलिक यांना उमेदवारी देखील जाहीर केली आहे. त्यामुळे महायुतीमध्ये अजित पवारांचे राष्ट्रवादी व भाजपमध्ये मतभेद असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपा अजित पवार यांचेशी सख्य कायम राखणार की युती तोडणार? यासंदर्भातही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

## अजूनही वेळ गेली नाही
### नांदगावकरांची उद्धव ठाकरेंना साद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :



आम्ही नाती जपली, पण राज ठाकरेंनी रक्ताचे नाते जपले, असे म्हणत मनसे नेते व शिवडीचे उमेदवार बाळा नांदगावकर यांनी उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा साद घातली आहे.

आदित्य ठाकरे वरळीमधून उभे होते तेव्हा आपल्या घरातील व्यक्ती उभा आहे असे समजून राज ठाकरेंनी उमेदवार दिला नव्हता. पण अजूनही वेळ गेली नाही, असे बाळा नांदगावकर म्हणाले आहेत.

माहीमची उमेदवारी आधी आम्ही जाहीर केली, नंतर उद्धव ठाकरेंनी जाहीर केली. उद्धव ठाकरेंनी अमित ठाकरेंसमोर उमेदवार द्यायला नको होते. उद्धव ठाकरे यांनी उमेदवार दिलाच पण शिंदे यांनी देखील दिला आहे. मात्र अजूनही वेळ गेली नाही. शेवटी जे काही वैभव, मान-सन्मान आम्हाला मिळाला आहे ते याच ठाकरे कुटुंबामुळे मिळाला आहे. ते जपणे आवश्यक होते. याबाबत विचार व्हायला हवा होता, असे ते म्हणाले.

अमित ठाकरे मनातून फार हळवे आहेत. अगदी बाळासाहेबांप्रमाणे ते आहेत. सगळे ठाकरे असेच आहेत. अमित ठाकरे निवडणूक लढवतील याबाबत खरेच कल्पना नव्हती, असेही ते म्हणाले.

## ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डावर भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचा आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
एकीकडे मराठी मुस्लिम सेवा संघ तसेच ऑल इंडिया उलेमा बोडार्सारख्या संघटना मुस्लिम व्होट जिहादसाठी फतवे काढीत असताना आता भाजपा अल्पसंख्यक मोचार्ने त्या विरोधात उडी घेतली आहे.

मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी यांनी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोडार्चे अध्यक्ष खालिद सैफुल्लाह रहमान यांना बोर्डाच्या नावातून ऑल इंडिया' आणि बोर्ड शब्द न लावण्याविषयी पत्र लिहिल्याने नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे आहेत.

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड या नावामुळे सर्वसामान्य मुस्लिम नागरिकांची दिशाभूल होत असून त्यांच्यात गैरसमज पसरण्याची शक्यता आहे. ऑल इंडिया' आणि बोर्ड' हे शब्द वापरण्याचा अधिकार फक्त सरकारी संस्थेला आहे. तुमची संस्था गैरसरकारी असतानाही नावावरून ती सरकारी असल्याचा गैरसमज होतो. यास्तव नावातून‍ऑल इंडिया' आणि बोर्ड' शब्द वगळावे असे सिद्दिकी यांनी लिहिले आहे.

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देशातील समस्त मुस्लिम समाजाचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करते. वास्तवात असे काहीही नाही. देशात ८०% पसमांदा मुस्लिम समाज आहे. त्यांच्या प्रश्नांना ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने कधीही वाचा फोडली नाही, असा आरोप सिद्दिकी यांनी केला आहे.




## राऊतांनी माफी मागावी
### प्रविण दरेकरांची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अमित शहा यांच्याविरोधात वक्तव्य करताना व्यापारी असा उल्लेख केला होता. त्यांच्या या विधानाला भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे.

व्यापारी आणि दुकानदार कष्ट करतात, ग्राहकांना सेवा देण्याचा प्रयत्न करतात. तोही एक कष्टकरी वर्ग आहे. राऊत यांनी कष्टकरी वर्गाचा अपमान केला असून त्यांनी दुकानदार, व्यापाऱ्यांची माफी मागावी. अन्यथा हे दुकानदार पुड्या बांधता बांधता निवडणुकीत तुमचा कडेलोट केल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशाराच दरेकर यांनी दिला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर यांनी राज्यातील विविध राजकीय विषयांवर भाष्य करत विरोधकांवरही टिकेची झोड उठवली. संजय राऊत यांनी सर्व्हेबाबत केलेल्या विधानांवर दरेकर म्हणाले की, सर्व्हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात, सर्व्हे महायुतीच्या बाजूने असल्याने आमचा उत्साह द्विगुणित होईल. संजय राऊत खोटं बोलण्यात विश्वविक्रम करू शकतात.

## उमेदवाराच्या ओल्या पार्टीत एकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ११ :
वरोरा मतदार संघात काँग्रेस उमेदवार प्रवीण काकडे यांच्या प्रचारार्थ आयोजित मांसाहार पार्टीत दोन मद्यधुंद कार्यकर्ते विहिरीत पडले. त्यातील एकाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

विधानसभा निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना उमेदवार मतदारांना मांसाहारी व शाकाहारी पार्टी, दारू पार्टीचे प्रलोभन देत आहेत. ग्रामीण व शहरी भागात अशा पार्टी दररोज आयोजित केल्या जात आहेत.

जेवणावळीची धूमधाम सुरू असताना कार्यकर्ते दारूच्या नशेत झिंगून पडत असल्याची घटना समोर आली आहे. वरोरा मतदार संघात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेस उमेदवार प्रवीण काकडे यांच्यासाठी त्यांचे समर्थक प्रमोद मगरे यांनी रविवारी मटण-चिकन पार्टीचे आयोजन केले होते.

फतेहपूरच्या गिट्टी क्रशर कॉम्प्लेक्समध्ये मटण पार्टीच आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये दारूचीही व्यवस्था करण्यात आली होती. पार्टीदरम्यान मद्यधुंद अवस्थेत असलेल्या दोन कार्यकर्त्यांचा तोल गेला आणि ते जवळच्या विहिरीत पडले.

अरुण महाले या एका कामगाराची वेळीच सुखरूप सुटका करण्यात आली. रात्रीचा अंधार असल्याने त्यांना विहिरीतून बाहेर काढता आले नव्हते. सोमवारी त्यांचा मृतदेह गवसल्याची माहिती आहे.

## हलबा समाज एकवटला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
विद्यमान आमदाराला डावलून दुसऱ्याला तिकीट दिल्याने मध्य नागपूर मतदार संघातील हलबा समाजाचे नागरिक कमालीचे रूष्ट आहेत. तिकडे, काँग्रेसनेही आश्वासन देवून या समाजाला उमेदवारी दिली नाही.

परिणामी, मध्य नागपूरमध्ये समाजाने रमेश पुणेकर यांना रिंगणात आणले असून, संपूर्ण हलबा समाज त्यांच्यामागे एकवटल्याचे चित्र आहे. येथे विकास कुंभारे हे भाजपाचे आमदार असतानाही पक्षाने प्रविण दटके यांना तिकीट दिले. ॲड. नंदा पराते यांना आश्वासन देवून काँग्रेसने उमेदवारी नाकारली. परिणामी, हलबा समाज या दोन्ही पक्षावर कमालीचा संतापल्याचे दिसून येत आहे.

## 30 टन फाटक्या नोटा जळून खाक

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ११ :
हैदराबादवरून मुझफ्फरनगर येथे चलनात नसलेल्या फाटक्या नोटा घेऊन जाम-नागपूर मार्गाने जाणाऱ्या कंटेनरला शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत कंटेनरमधील ३० टन नोटा जळून खाक झाल्या. ही घटना वर्धा जिल्ह्याच्या सीमेजवळील आणि नागपूर जिल्ह्यातील बरबडी गावाजवळ मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

भारतीय चलनात नसलेल्या नोटा यूपी १२ सीटी ५३२७ या क्रमांकाचा चौदाचाकी कंटेनर हैदराबाद येथून मुझफ्फरनगर येथे जात होता. आरबीआयने चलनात नसलेल्या नोटांचा लिलाव केला असता भंगार नोटा मुझफ्फरनगर येथील स्क्रॅप व्यावसायिकाने खरेदी केल्या होत्या.

हैदराबादवरून जाम-नागपूर मार्गाने कंटेनर जात असताना वर्धा व नागपूर जिल्ह्याच्या सीमेवरील कोंढाळी बरबडी या गावाजवळ कंटेनर येताच शॉर्टसर्किटमुळे कंटेनरला भीषण आग लागली. वाहनचालक जसवंतसिंग त्रिलोकसिंग (रा. मेरठ, उत्तर प्रदेश) व वाहक भोपाळ दाताराम या दोघांच्या लक्षात हा प्रकार येताच त्यांनी कंटेनर रस्त्याच्या कडेला उभा करून जाम वाहतूक पोलिसांना माहिती दिली. अथक परिश्रम घेऊनही आग आटोक्यात आली नाही. यात कंटेनरमधील सर्व नोटांच्या स्क्रॅपची राख व कंटेनर जळून खाक झाला.



आरबीआयच्या लिलावात भंगार व्यावसायिकाकडून खरेदी

## अहेरी मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोरांना अभय!

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ११ :
विधानसभा निवडणुकीत गडचिरोली जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षात प्रचंड बंडखोरी झाली आहे. जिल्ह्यातील काँग्रेस नेते हतबल झाले असतांना अहेरी विधानसभा मतदार संघामधील बंडखोर उमेदवारावर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने महाविकास आघाडी मध्ये धुसपूस सुरु झाली आहे. काँग्रेसने अहेरीत बंडखोरांना अभय दिल्याची चर्चा आहे.

अहेरी मतदार संघात चुरशीची निवडणूक होत आहे. काँग्रेसचे माजी आमदार पेंटा रामा तलांडी यांच्या कन्या तथा जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष निता तलांडी यांना पक्षाने उमेदवारी दिली नाही. परिणामी, बंडखोरी करीत त्या रिंगणात उतरल्या असून, प्रहार पक्षाकडून निवडणूक लढत आहेत. काँग्रेसने त्यांच्यावर अद्याप कारवाई केली नाही.

काँग्रेस पक्षाचे हनुमंतू मडावी हे आदिवासी आघाडीचे जिल्हाध्यक्ष आहेत. त्यांनी मागील महिन्यात अहेरी मतदार संघात काँग्रेस पक्षाचा मोठा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला काँग्रेस पक्षाचे नेते तथा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते अजय कंकडलवारसह अहेरी मतदार संघातील काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी विजय वडेट्टीवार यांनी हनुमंतू मडावी हे काँग्रेसचे अधिकृत उमेदवार आणि आमदार असतील असे सूचित केले होते. परंतु अहेरी येथील जागा महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार गटाला गेल्याने काँग्रेसच्या आशेवर पाणी फिरले. येथे निता पेंटा तलांडी आणि हनुमंतू मडावी या दोघांनीही बंडखोरी करीत विधानसभा निवडणूक लढवत आहेत.

महायुतीत ही जागा अजित पवार राष्ट्रवादीला गेली असून, धर्मरावबाबा आत्राम उमेदवार आहेत तर त्यांची कन्या भाग्यश्री धर्मराव आत्राम या मविआत शरद पवार गटाकडून रिंगणात आहेत.

काँग्रेस पक्षाने निता तलांडी किंवा हनुमंतू मडावी यांच्यावर कारवाई न केल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. मडावी यांना काँग्रेस मधील नेत्याची फूस आहे काय? असा प्रश्न विचारला जात आहे.

### चार बंडखोरांचे निलंबन

गडचिरोली जिल्ह्यातील माजी आमदार आनंदराव गेडाम, डॉ. शिलू चिमुरकर, डॉ. सोनल कोवे, भरत येरमे यांना काँग्रेस पक्षातून निलंबीत करण्यात आले आहे. आनंदराव गेडाम आणि डॉ. शिलू चिमुरकर हे आरमोरी मतदार संघातून, तर डॉ. सोनल कोवे आणि भरत येरमे हे गडचिरोली मतदार संघात निवडणूक रिंगणात आहेत.



# महासागर वृत्तसागर

नागपूर

मंगळवार, दि. १२, नोव्हेंबर २०२४


# पत्नी, साळी व सासऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला

## झिंगाबाई टाकळी परिसरातील थरार, आरोपी पती अटकेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

कौटुंबिक वादातून पतीने पत्नीसह साळी आणि सासऱ्यावर कुऱ्हाडीने वार करीत गंभीर जखमी केले. ही थरारक घटना मानकापूर ठाण्यांतर्गत घडली. घटनेनंतर फरार पतीला गुन्हे शाखा युनिट 2च्या पथकाने अटक केली.

विवेक इशूलाल तांडेकर (26) रा. झिंगाबाई टाकळी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. जखमींमध्ये विवेकची पत्नी मलिका विवेक तांडेकर (24), साळी प्रतीक्षा मूलचंद वासनिक (25) आणि सासरा मूलचंद रतिराम वासनिक (52) चा समावेश आहे.
आरोपी विवेक हा डेकोरेशनचा व्यवसाय करतो.

परिसरातच राहणाऱ्या मलिकाशी तिचे प्रेमसंबंध होते. कुटुंबीयांची परवानगी नसतानाही 5 वर्षांपूर्वी दोघांनीही प्रेम विवाह केला. त्यांना 3 वर्षांचा एक मुलगाही आहे. विवेकचे कुटुंबीय मलिकाचा स्विकार करण्यास तयार नव्हते.

यावरून नेहमी मलिका आणि विवेक यांच्यात वाद होत होते. जवळपास महिनाभरापूर्वी मलिका विवेकचे घर सोडून माहेरी रहायला आली. विवेक तिला परत येण्यासाठी मनधरणी करीत होता. मात्र ती परत येण्यास नकार देत होती. त्यामुळे सासरचेच तिला परत येण्यापासून मज्जाव करीत असल्याचा समज विवेकचा झाला होता.

रविवारी रात्री तो मलिकाला परत आणण्यासाठी सासरी गेला. तेथे घरगुती कारणातून विवेकचा मूलचंद आणि मलिकाशी वाद झाला. मूलचंदने त्याच्याविरुद्ध पोलिसात तक्रार करण्याचा इशारा दिला.

दोघांमध्ये हाणामारीही झाली. प्रचंड रागात विवेक घरी परतला. कुऱ्हाड घेऊन परत सासरी गेला. महाजन कॉम्प्लेक्ससमोर त्याने मलिका, मूलचंद आणि प्रतीक्षावर कुऱ्हाडीने सपासप वार करून रक्तबंबाळ केले आणि पळून गेला. तिघांनाही गंभीर जखमी अवस्थेत उपचारार्थ खासगी रुग्णालयात भरती करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच मानकापूर पोलिस घटनास्थळी पोहोचले.

पोलिसांनी विवेक विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला. गुन्हे शाखा युनिट 2 च्या पथकानेही विवेकचा शोध सुरू केला. सोमवारी दुपारी तो गुन्हे शाखेच्या हाती लागला. त्याला अटक करून पुढील कार्यवाहीसाठी मानकापूर पोलिसांच्या स्वाधिन केले. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# हिंगणा परिसराच्या विकासासाठी महायुतीला कौल द्या : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

पूर्वी हिंगणा तालुका नागपूरपासून वेगळा समजला जायचा. या भागातील रस्ते चांगले नव्हते. पायाभूत सोयीसुविधांची वाणवा होती. मात्र गेल्या दहा वर्षांमध्ये हिंगण्याचा विकास झाला आहे. नागपूर शहराशी कनेक्टिव्हिटी वाढली आहे.

आता नागपूरची सॅटेलाईट सिटी म्हणून हिंगण्याची ओळख निर्माण झाली आहे. ती अधिक ठळक करून खरा विकास साधण्यासाठी महायुतीला निवडून द्या, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

हिंगणा विधानसभा मतदारसंघातील श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय रायपूर येथे भाजप-महायुतीचे उमेदवार समीर मेघे यांच्या प्रचारार्थ नितीन गडकरी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. ते




म्हणाले, ह्यलवकरच हिंगण्यामध्ये रिंगरोडवरून ट्रॉली बस पोहोचणार आहे. दोन वर्षांच्या आत हिंगण्यामध्ये मेट्रो दाखल होणार आहे. मिहान प्रकल्पात आतापर्यंत ८८ हजार तरुणांना रोजगार मिळाला आहे. पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येऊ द्या; पुढच्या काळात दोन लाख तरुणांना रोजगार मिळेल, असा विश्वास देतो.

देशाचा विकास करण्यासाठी कृषी आणि उद्योग या दोन क्षेत्रांचा विकास महत्त्वाचा आहे, असे त्यांनी नमूद केले.

ज्याठिकाणी पायाभूत सुविधा म्हणजेच पाणी, वीज, दळणवळण आणि संपर्क विकसित होतात त्याच ठिकाणी उद्योग वाढतो. ज्या ठिकाणी पाणी, उत्तम बीज-कलमा, योग्य भाव आणि कृषी आधारित प्रक्रिया उद्योग निर्माण होतात. तेथे शेतीचा आणि पयार्याने गावांचा विकास होतो. पण काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर रशियाचे आर्थिक मॉडेल भारतात उतरवले. उत्तम रस्ते, शेतीला सिंचनाची सोय, उत्तम शाळा, सुसज्ज आरोग्य यंत्रणा गावांमध्ये पोहोचली असती तर लाखो लोकांना गाव सोडून शहरांमध्ये जाण्याची गरज पडली नसती, असे ते म्हणाले.

काँग्रेसच्या काळात चांगले रस्ते झाले नाहीत. प्यायला शुद्ध पाणी मिळाले नाही. आरोग्य यंत्रणा कोलमडली होती. गावांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले होते.

गावांमधून ३० ते ३५ टक्के लोक गाव सोडून शहरात गेले. शहरातील झोपडपट्टया वाढल्या. पण गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने मोठ्या प्रमाणात काम केले. प्रत्येक क्षेत्रात गुंतवणूक केली. आज देशाचे चित्र बदलले आहे.

काँग्रेसच्या धोरणांनी जातीयवादाचे विष पेरले. पण या समाजातील अस्पृश्यता समूळ नष्ट करून सामाजिक आणि आर्थिक समतेच्या आधारावर समाजाची रचना झाली पाहिजे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रवाद, सुसाशन आणि अंत्योदय या तीन तत्वांचे आमच्यावर संस्कार झाले आहेत. आम्ही आमदार-मंत्री बनण्यासाठी राजकारणात आलेलो नाही. आमच्यासाठी राजकारण हा पैसे कमावण्याचा धंदा नाही, असेही नितीन गडकरी म्हणाले.

## दारू विक्रेत्यांवर धाड

**नागपूर :** तहसील पोलिसांनी वेगवेगळ्या कारवाईमध्ये दोन दारू विक्रेत्यांवर धाड टाकून मोहाची दारू जप्त केली. टिमकीच्या तीन खंबा परिसरात राहणाऱ्या माया लिलाधर होले (53) या महिलेवर करण्यात आली.

झडतीमध्ये 7 लीटर मोहाची दारू मिळाली. दिनेश नारायण चिंचघरे (48) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याजवळून 11 लीटर मोहाची दारू जप्त केली. आरोपींवर दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# देवेंद्र फडणवीस यांना हरवण्यासाठी प्रचारात कॉंग्रेसकडून चौपट खर्च

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार सभांना सुरुवात केली आहे. तसेच या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणात पैसा देखील खर्च केला जात असल्याचे दिसत आहे. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघात भाजप महायुतीकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उभे असून त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीच्या उमेदवाराने फडणवीसांच्या तुलनेत चार पट खर्च केला असल्याचे समोर आले आहे.

नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांनी प्रचारासाठी आत्तापर्यंत 2 लाख 99 हजार 581 रुपये खर्च केले असल्याची माहिती निवडणूक आयोगाला देण्यात आली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारासाठी 64 हजार 136 रुपये खर्च करण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या तुलनेत प्रफुल्ल गुडधे यांचे चार पटीपेक्षा जास्त खर्च असल्याचे दिसत आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात कॉंग्रेस व महाविकास आघाडीने जोरदार प्रचार करण्यास सुरुवात केली असल्याचे दिसत आहे.

दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेस उमेदवार गिरीश पांडव हे प्रचार खर्चाच्या बाबतीत आघाडीवर आहेत.पांडव यांनी प्राचारावर आत्तापर्यंत 6 लाख 56 हजार 675 रुपये खर्च केले आहेत. उत्तर नागपूरमधील भाजपचे उमेदवार डॉ. मिलिंद माने यांनी 4 लाख 17 हजार 617, तर मध्य नागपूर येथील प्रवीण दटके यांनी 3 लाख 56 हजार 98 रुपये खर्च केले आहेत.

दरम्यान, नागपूर शहरातील सहा मतदारसंघातून सर्वात कमी करच नागपूरमधील कॉंग्रेस उमेदवार बंटी शेळके यांनी सर्वात कमी म्हणजे 44 हजार 243 रुपये खर्च केला आहे.

एकीकडे उमेदवार प्रचारासाठी खर्च करत असून दुसरीकडे मात्र राजकारणही तापत असल्याचे दिसत आहे. पश्चिम नागपूरमधून भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे हे निवडणूक लढवत आहेत. मात्र त्यांना बाहेरचा उमेदवार असल्याचे म्हणत कॉंग्रेसकडून टीका होत आहे.

तसेच पश्चिम नागपूरमधील विद्यमान आमदार आणि कॉंग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे हे देखील दक्षिण नागपूरमध्ये राहतात आणि पश्चिम नागपूरमध्ये निवडणूक लढवतात, असे असताना मला बाहेरचे उमेदवार कसे म्हणू शकता? असा सवालही सुधाकर कोहळे यांनी विचारला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

**नागपूर :** भरधाव वाहनाने मोटार सायकलस्वार वृद्धाला जबर धडक दिली आणि पळून गेला. गंभीर जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची ही घटना इमामवाडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. श्रीकांत रामदास सोनी (62) रा. मनीषनगर असे मृत वृद्धाचे नाव आहे. रविवारी रात्री 8.45 वाजताच्या सुमारास श्रीकांत हे एमएच-31/सीटी-5683 क्रमांकाच्या मोटारसायकलने जात होते. मेडिकल चौकातून अशोक चौकाकडे जाताना निरामय रुग्णालयाजवळ भरधाव असलेल्या अज्ञात वाहनाच्या चालकाने श्रीकांत यांच्या मोटारसायकलला जबर धडक दिली आणि पळून गेला. श्रीकांत मोटारसायकलसह खाली पडून गंभीर जखमी झाले. आसपासच्या लोकांनी मदतीसाठी धाव घेत त्यांना उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारा दरम्यान श्रीकांत यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी श्रीकांत यांचे भाऊ प्रदीप सोनी (55) च्या तक्रारीवरून इमामवाडा पोलिसांनी अज्ञात वाहनाच्या चालकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे.

# विकासाच्या संकल्पपूर्तीसाठी महाराष्ट्र महायुतीसोबत : अनिल सोले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

महाराष्ट्राला देशातील पहिल्या क्रमांकाचे विकसित राज्य बनविण्याचा भारतीय जनता पाटीर्चा संकल्प असून राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत पोहोचविण्यासाठी गतिमान विकास हे भाजपाचे ध्येय आहे, असे भाजपाचे माजी आमदार आणि 2024 विधानसभा चुनावी संकल्प समितिचे सदस्य अनिल सोले यांनी स्पष्ट केले.

विधानसभा निवडणुकीनिमित्त भाजपाच्या संकल्पपत्राचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह याच्या हस्ते रविवारी मुंबईत प्रकाशन झाले. पक्षाच्या संकल्प पत्राची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत अनिल सोले बोलत होते.

भारतीय जनता पाटीर्ने दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली असल्याने देशातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भाजपाला पुन्हा



सत्तेचा कौल दिला आहे. केंद्रातील मोदी सरकारच्या संकल्पपूतीर्साठी महायुतीने महाराष्ट्रातही ठोस विश्वासाने वाटचाल सुरु केली महाराष्ट्र हे मजबूत, समृद्ध, सुरक्षित राज्य बनवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जम्मू काश्मीरमध्ये कलम ३७० पुन्हा लागू करण्यासाठी कॉंग्रेस आघाडीतील पक्षांनी कंबर कसली आहे, आणि तेच पक्ष आता महाराष्ट्रात संविधानाच्या नावाने कोरे कागद दाखवून डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करत आहेत. जनतेची अशी फसवणूक करणा?्या राहुल गांधीना, काँग्रेसला आणि त्यांच्या आघाडीला महाराष्ट्रातील मतदार थारा देणार नाहीत असा विश्वास अनिल सोले यांनी यावेळी व्यक्त केला.

कलम ३७० रद्द करून भाजपाने जम्मू काश्मीरला देशाच्या मुख्य प्रवाहात आणले, तीन तलाक पद्धती रद्द करून मुस्लिम समाजातील पीडित महिलांना दिलासा दिला, याशिवाय नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती (सीएए), राम मंदिर उभारणी अशी अनेक आश्वासने भारतीय जनता पार्टीच्या सरकारने पूर्ण केली आहेत, असे सोले म्हणाले.

भाजपा महायुती सरकारने २०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्तेवर आल्यानंतर महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे अनेक निर्णय घेतले. भारतीय जनता पाटीर्ने समाजाच्या सर्व घटकांचा विचार करून तयार केलेले संकल्प पत्र हे राज्याच्या जनतेचे आकांक्षा पत्र आहे, असेही श्री अनिल सोले यांनी नमूद केले. महायुती सरकारच्या काळात पूर्ण झालेल्या निळवंडे, गोसीखुर्द, टेम्भू या सिंचन योजना, कोस्टल रोड, अटल सेतू सारखे रस्ते, पूल, नार पार सारखे नदीजोड प्रकल्प यांचा आढावाही यावेळी घेत अनिल सोले यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. अंतर्विरोधाने भरलेल्या महाविकास आघाडीने सत्तेसाठी तुष्टीकरणाची विचारधारा स्वीकारली आहे, असा आरोप करून ते म्हणाले की, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक या राज्यांत निवडणूक काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात कॉंग्रेसला अपयश आले आहे.

# घराचे स्लॅब अंगावर पडून मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ११ :

घराचे स्लॅब अंगावर कोसळल्याने एका मजुराचा मलब्याखाली दबून मृत्यू झाला. ही दुदैर्वी घटना पाचपावली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. कृष्णकुमार केवट (30) रा. रीवा, मध्यप्रदेश असे मृताचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टेकानाकाच्या चार खंबा चौकात राहणारे नियाजुद्दीन शेख यांचे घर पाडण्याचे काम सुरू आहे. कृष्णकुमार येथे मजुरीचे काम करीत होता. रविवारी सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास इतर मजुरांसह कृष्णकुमारही कामावर आला होता. सर्वजण कामाला सुरूवात करण्याच्या तयारीत होते. कृष्णकुमार अर्धवट पडलेल्या घराच्या स्लॅबखाली उभा होता. दरम्यान अचानक स्लॅब खाली उभ्या कृष्णकुमारच्या अंगावर कोसळला. कृष्णकुमार स्लॅबच्या मलब्याखाली दबल्या गेला. मजुरांमध्ये खळबळ उडाली.

तत्काळ जेसीबीच्या मदतीने कृष्णकुमारला मलब्यातून बाहेर काढत रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत तपास सुरू केला आहे.

# मतदानाच्या दिवशी मुद्रित माध्यमांत

## जाहिरातीसाठी एमसीएमसी पूर्व प्रमाणिकरण अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका २०२४ - मतदान दिवसाअगोदर आणि मतदानाच्या दिवशी मुद्रित (प्रिंट) माध्यमातून कोणत्याही भडकाऊ, दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला अडथळा येईल, अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत, याबाबत मुद्रित माध्यम व सर्व संबंधितांना दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत.

तसेच कोणताही राजकीय पक्ष, निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका, २०२४ मतदानाच्या दिवशी आणि मतदानाच्या एक दिवस आधी मुद्रित माध्यमांत कोणतीही राजकीय जाहिरात, जोपर्यंत राज्य/जिल्हा स्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून पूर्व - प्रमाणित केली जात नाही, तोपर्यंत प्रकाशित करु नये, अशा सूचना दिल्या आहेत. तरी सर्व संबंधितांनी भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शांचे काटेकोरपणे पालन करावे, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र यांनी कळवले आहे.

# १५ नोव्हेंबरनंतर येणार थंडीची लाट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राज्याच्या हवामानात पुन्हा बदल अपेक्षित आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने हे बदल होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. दरम्यान, तापमानात देखील मोठ्या प्रमाणात बदल दिसून येतील. काही ठिकाणी तापमान अधिक तर काही ठिकाणी ते कमी झालेले दिसून येईल.



बंगालच्या उपसागरात येत्या ४८ तासात चक्रीवादळामुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होण्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक शहरात सध्या रात्री ते पहाटेदरम्यान गारवा जाणवत आहे. दुपारी मात्र उकाडा कायम आहे. नागपूर शहरातही रात्रीच्या तापमानासह दिवसाच्या तापमानात हळूहळू घट होत आहे. तर पहाटेच्या सुमारास धुक्यांची हलकी चादर देखील दिसून येत आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र, कोकण, खान्देश, मराठवाड्यातील काही शहरांमध्येही हीच स्थिती आहे. राज्यात दिवाळीनंतर तापमानात हळूहळू का होईना घट होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून थंडीची तीव्रता वाढलेली दिसून येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात लोकांच्या अंगावर गरम कपडे दिसू लागतील. काही ठिकाणी मात्र रात्रीच्या वेळी शेकोट्या पेटलेल्या दिसून येत आहे. मात्र, हिवाळ्यातील थंडीची प्रतीक्षा अजूनही कायम आहे.

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार १५ नोव्हेंबरनंतर थंडी वाढण्याची शक्यता आहे. जळगाव, पुणे, सांगली, नागपूर, नाशिक आदी जिल्ह्यात तापमान घसरले आहे. नोव्हेंबरच्या अखेरच्या आठवड्यात संपूर्ण राज्यात थंडी जाणवेल. दरम्यान, आज तापमानात आणखी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या दिवसाचे तापमान अजूनही ३० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक आहे. राज्यातील तापमानात चढउतार सुरूच राहणार आहे. सध्या बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. तर तामिळनाडू व केरळच्या काही भागात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व राजस्थान भागात किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सियसने घट झाली आहे.

वातावरणात बदल होत असल्याने आरोग्याच्या तक्रारीही वाढू शकतात, त्यामुळे या काळात आरोग्याची विशेष काळजी घेण्यात यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. सध्या कुठे थंडी तर कुठे उष्णता असे वातावरण दिसून येत आहे. एरवी दसऱ्यानंतरच थंडीला सुरुवात होते. यावेळी मात्र थंडीची सुरुवात उशिरा झाली आहे.

# प्रिया फुके ही सरकारची लाडकी बहीण नाही आहे का?

## सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

भारतीय जनता पक्ष हा लाडक्या बहिणींसाठी अनेक योजना राबवत असल्याचा आव आणत आहे. मग एका भाजपा आमदारासह त्यांच्या कुटुंबीयांकडून मानसिक व शारीरिक छळ सहन करणारी सून प्रिया फुके ही भाजपची लाडकी बहीण नाही आहे का?, एका आमदाराचे कुटुंब खुलेआम बलात्कार आणि खून करण्याची धमकी एका विधवा सुनेला देत आहेत, अशा आमदारासह कुटुंबीयांविरुद्ध कारवाई करण्याऐवजी पोलीससुद्धा त्यांच्याच पंगतीला बसत आहेत, असा आरोप माहेर सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्ष अरुणा सबाने यांनी केला आहे. त्या सोमवारी प्रेस क्लबमध्ये आयोजित पत्रपरिषदेत बोलत होत्या.

अरुणा सबाने म्हणाल्या, की शहरातील रमेश फुके आणि त्याचा आमदार मुलगा परिणय फुके यांनी भाऊ संकेत फुकेला गंभीर आजार असल्याचे लपवून प्रियाशी लग्न



लावले. संकेतच्या निधनानंतर फुके कुटुंबियांनी प्रियाला घराबाहेरसुद्धा जाण्यास मनाई केली. त्यांनी प्रियाकडून एटीएम, बँकेचे पासबुक, दागिने जबरदस्तीने काढून घेतले. युनियन बँकेच्या धरमपेठ शाखेच्या खात्यात चार कोटी रुपये होते.

मात्र, त्यातील ३.३० कोटी रुपये बनावट स्वाक्षरी करत रमेश फुके यांच्या खात्यात वळते केले असा आरोप सबाने यांनी केला. याबाबत तक्रार केल्यानंतर आमचे कुटुंब सधन असून आम्ही राजकीय दबावाने काहीही करू शकतो. तू शांत राहिली नाहीस तर तुज्या आई आणि बहिणीवर अत्याचार करण्यात येईल, अशी धमकी प्रियाला सासऱ्यांनी दिली, असा दावा सबाने यांनी केला.

संकेतच्या निधनानंतर प्रियाला रात्री ११ वाजता दोन्ही मुलांसह घरातून बाहेर काढले. फुके कुटुंब बाहेर समाजसेवेचे ढोंग करतात आणि घरातील सुनेशी एवढी क्रूर वागणूक देतात.

प्रिया आता आईच्या पेंशनवर जगत आहे. मुलांचे शैक्षणिक शुल्क भरायलासुद्धा फुके कुटुंब आर्थिक मदत करीत नाहीत. संकेतचे अताशा आशीर्वाद बिल्डर्समध्ये ४० टक्के शेअर्स परस्पर सासू-सासऱ्यांच्या नावाने करून घेतले.

या प्रकरणी अंबाझरी पोलिसांनी आमदार परिणय फुकेसह कुटुंबातील पाच जणांवर गुन्हा दाखल केला होता. मात्र, राजकीय दबावामुळे या प्रकरणाचा तपास पुढे सरकत नाही. अंबाझरीचे ठाणेदार विनायक गोल्हे हे फियार्दी प्रिया यांनाच पुरावे आणि घटनेचे साक्षीदार आणण्यासाठी दबाब टाकत आहेत, असा आरोप अरुणा सबाने यांनी केला. यावेळी माहेर संस्थेच्या सचिव प्रज्वला तट्टे, सदस्या करुणा शिंदे, सुजाता लोखंडे यांच्यासह आमदार फुके यांच्या प्रिया फुके उपस्थित होत्या.

# रामटेक मुख्य बाजार आवारात धान खरेदी-विक्रीचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ११ :

रामटेक तालुक्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांकडून कापणी व मळणी करुन बाजारात विक्रीला जोर धरला. रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीकडून धान खरेदी विक्रीचा शुभारंभ आयोजित करण्यात आला होता.

यानिमित्त समितीकडून येणाऱ्या शेतकरी बांधवांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. काटापूजन कार्यक्रम समितीचे संचालक त्रिलोकचंद मेहर, भीमराव आंबिलडुके, विजय मदनकर, खरेदी विक्रीचे अध्यक्ष अनिल (मिन्नु) गुप्ता, समितीचे सचिव हनुमंता महाजन, समितीचे अडतीया, व्यापारी, हमाल, मापाडी, शेतकरी, कर्मचारी व इतरांच्या उपस्थित पार पडला. तालुक्यातील शेतकऱ्यांनी बाजार समिती आवारात पहिल्याच दिवशी अंदाजे नऊ ते दहा हजार पोते धानाची आवक झाली.

पहिल्याच दिवशी व्यापारी व अडतीयांकडून धानाची सुरुवातीची बोली प्रती खंडी ३७०० ते ३९०० रुपये बोलीची सुरुवात झाली. पुढील काही दिवसांत मोठ्या प्रमाणात धानाची आवक वाढणार असल्याची माहिती बाजार समिती सचिव हनुमंता महाजन यांनी दिली.



# खैरे कुणबी समाजाच्या पाठिंब्याने विजय अधिक सोपा : सुधीर पारवे




■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. ११ :

महायुतीचे भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार सुधीर पारवे यांना खैरे कुणबी समाज संघटनेने सोमवारी आपला पाठिंबा जाहीर केला. या पाठिंब्याने आपला विजय अधिक सोपा झाल्याचा विश्वास व्यक्त करत पारवे यांनी कुणबी बांधवांचे आभार मानले.

महायुतीचे उमेदवार सुधीर पारवे यांचा प्रचाराचा झंजावात सुरू आहे. सुधीर पारवे मतदार संघ पिंजून काढत नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत. दरम्यान सोमवारी उमरेड येथे खैरे कुणबी समाज संघटनेने सुधीर पारवे यांची भेट घेत त्यांना आपला पाठिंबा अधिकृतपणे जाहीर केला. विधानसभा क्षेत्रात सर्व स्तरातून सुधीर पारवे यांना वाढता पाठिंबा मिळत असून खैरे कुणबी समाज संघटनेच्या पाठिंबामुळे आपला विजय अधिक सोपा झाल्याचा विश्वास पारवे यांनी यावेळी बोलून दाखवला. खैरे कुणबी समाजाचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध राहून त्यांनी टाकलेला विश्वास सार्थकी लावेल असा शब्द पारवे यांनी दिला.

यावेळी खैरे कुणबी समाज संघटनेचे सर्वश्री विलास हुडमे, सुधाकर बोरकुटे, राजकुमार कोहपरे, दिलीप कोल्हे, सुजित कुरुडकर, सुरज ठाकरे, चरण डहाके, तुकाराम शिवणकर, रमेश रोहनकर, विनोद गुरपुडे,धनराज सहारे, घनश्याम लव्हे, राऊत, भोजराज चुधरी, गोपाल शिवनकर, मोहनदास गजभिये, केवळराम जुबार, खटूजी सांडगे, मधेश्याम राऊत, रामरतन ब्राह्मणवाडे, रमेश रोहनकर, नरुळे, पुंडलिकराव ठाकरे, मूनेश रिठे, उमेश मारोडे, विकास देशमुख आदींसह भारतीय जनता पक्षासह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने यावेळी पस्थिती होती.

# मंदिरांमध्ये प्रवेश करताना प्रतिदिन टिळा लावण्यास होणार प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मुंबई येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकाला दर्शन घेतल्यानंतर श्रीगणेशाचा आशीर्वाद म्हणून कपाळी टिळा लावण्याचा स्तुत्य निर्णय मंदिर प्रशासनाने नुकताच घेतला आहे. या निर्णयाचे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने अभिनंदन केले आहे.

राज्यातील इतर मंदिरांमध्येही कपाळावर टिळा लावण्याचा निर्णय संबंधित मंदिर विश्वस्त तथा मंदिर प्रशासनाने घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र मंदिर महासंघाने केले आहे.

नागपूर येथील श्री गोपाळकृष्ण व विठ्ठल मंदिर, जरीपटका, राम मंदिर, आदर्श नगर, श्री दुर्गा मंदिर, हिल टॉप, श्री हनुमान शिव मंदिर समिती, गायत्री विहार या ४ मंदिरात टिळा लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच श्री संकटमोचन हनुमान मंदिर, बेल्लोरी येथे आधीपासूनच हा उपक्रम राबविला जात आहे.

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी नागपूरसह इतर जिल्ह्यांमध्येही हा उपक्रम नियमित राबवावा, अशी विनंती विदभार्तील सर्व मंदिर विश्वस्तांना केली आहे.



# ४.७१ लाखांचा गुटखा-तंबाखू जप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

गुन्हे शाखा युनिट 5च्या पथकाने गिट्टीखदान ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून धाड टाकत 4.71 लाख रुपये किंमतीचा प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखा जप्त केला. पोलिसांनी 3 जणांवर गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली. राजेंद्र शिवपूजन शुक्ला (50) रा. आदर्शनगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याचे साथीदार संजय जयस्वाल आणि कुंजबिहारी ठाकूर दोन्ही रा. ओमनगर, कोराडी रोड यांचा शोध पोलिस घेत आहेत.

शनिवारी रात्री युनिट 5 चे पथक गिट्टीखदान ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. दरम्यान शुक्ला हा इतर दोन आरोपींसोबत मिळून प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखाची विक्री करतो. तसेच त्याने आपल्या घरी मोठ्या प्रमाणात माल साठवून ठेवला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी शुक्लाच्या घरी धाड टाकली.

झडतीमध्ये विविध कंपन्यांचा पान मसाला, गुटखा आणि सुगंधित तंबाखू मिळाला. ज्याची एकूण किंमत 4 लाख 71 हजार 989 रुपये आहे. चौकशीत शुक्लाने जयस्वाल आणि ठाकूरसोबत मिळून धंदा करीत असल्याची माहिती दिली.

## तलवारबाजीत मंजिरी तांबेला कांस्यपदक

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची विद्यार्थिनी खेळाडू मंजिरी तांबे हिने जम्मू येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत फाईल या वैयक्तिक गटात कांस्यपदक प्राप्त केले आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धा जम्मू येथे ६ ते १० नोव्हेंबर दरम्यान होती. या स्पर्धेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संलग्नित भंडारा येथील जे. एम. पटेल कॉलेज मधील मंजिरी ही विद्यार्थिनी आहे. भंडारा जिल्ह्यातील इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रात मंजिरी प्रशिक्षण घेत आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तलवारबाजी स्पर्धेत वैयक्तिक गटात फॉईल प्रकारात कांस्यपदक प्राप्त करणाऱ्या मंजिरीचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कलुगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ.राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ प्रभारी संचालक डॉ.विशाखा जोशी यांच्यासह सदस्यांनी अभिनंदन केले.

# सेवा सर्वदा बहुद्देशीय संस्थेतर्फे स्लम महोत्सव संपन्न




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , दि. ११ :

देशातील १ ला स्लममहोत्सव, सिद्धेश्वरी गौंड वस्ती, शेष नगर, मानेवाडा येथे संपन्न झाला. हा कार्यक्रम सेवा सर्वदा बहुउद्देशिय संस्थ्येने घेतला होता. महोत्सवांतर्गत विविध क्रिडा स्पधार्चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये क्रिकेट, फुटबॉल, धावणे व कबड्डी या क्रिडा प्रकाराचा समावेश होता.

यामध्ये ६ स्लम मधील ३५० हून अधिक स्पर्धकांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. वय ६ ते १८ या वयोगटातील मुला-मुलींनी सहभाग घेत, आपले क्रिडा नैपुण्य दाखविले. सांस्कृतिक कार्यक्रम बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला होता.

यामध्ये जेष्ठ संपादक श्रीपाद अपराजित, ई.झेड.खोब्रागडे, प्रविण राजवैद्य, सुकेशिनी तेलगोटे, रोहिनी कुंभार, ॲड. राजेंद्र राठी, संदीप जोटवानी, स्वामीधामचे अध्यक्ष दिनकरराव, नागपूर विद्यापीठातील आंतर विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, बिंझाणी नगर महाविद्यालयाचे उपप्राचार्य संदीप तुंडूरवार, खुशाल ढाक, अनिल शिवणकर, रोशनी, माधुरी सराडकर यांची प्रामुख्याने होती.रंगारंग कार्यक्रमात सहाही वस्ती मधील मुलामुलींनी आपले कौशल्य दाखवित नृत्य, नाटक,गाणे, जादूचे प्रयोग सादर केले. या कार्यक्रमाचे संचालन साहिल व नियोजन भवरी गायकवाड यांनी केलेत. हा स्लम महोत्सव आयोजन करण्यात खुशाल ढाक, नितीन पाटील, संदीप तुंडूरवार, प्रशांत कडू, दिनकरराव कडू यांनी केलेत. पुढील वर्षी होणाऱ्या स्लममहोत्सवात विदभार्तील स्लम होणार आहेत.

## निधन

### शांताबाई ईखनकर

**वाडी :** दत्तवाडी येथील मंगलधाम सोसायटी निवासी नामदेव लॉनच्या



संचालिका शांताबाई नामदेवराव ईखनकर यांचे निधन झाले. त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगी, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर सोमवारी टेकडीवाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.

# १५ ते १७ दरम्यान आदिवासी नृत्य महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. ११ :

भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंती आणि आदिवासी गौरव दिनाच्या स्मरणार्थ उत्सवाचे आयोजन केले जाईल.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 15 ते 17 नोव्हेंबर 2024 या कालावधीत भगवान बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती आणि आदिवासी गौरव दिनानिमित्त साऊथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर, नागपूर कॅम्पसमध्ये दररोज सायंकाळी ६ वाजता आदिवासी नृत्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

या तीन एक दिवस सण मध्ये 6 राज्ये आदिवासी कलाकार आणि स्थानिक आदिवासी कलाकार गटांद्वारे विविध पारंपरिक नृत्यांचे रंगीत सादरीकरण देईल.

भारतामध्ये आदिवासी जमातींची अतिशय समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. या महोत्सवात आदिवासी कलांचे सादरीकरण होणार आहे. आदिवासी कलांचा प्रचार आणि प्रसार करणे आणि आदिवासी कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा महोत्सवाचा उद्देश आहे.

15 ते 17 नोव्हेंबर 2024 पर्यंत दरम्यान, बैगा पारधोनी नृत्य (मध्य प्रदेश), काकसार, गेडी नृत्य (छत्तीसगड), गुसाडी नृत्य (तेलंगणा), कोमू कोया नृत्य (आंध्र प्रदेश), ढोलू कुनीथा नृत्य (कर्नाटक), तरपा नृत्य (महाराष्ट्र) आणि स्थानिक आदिवासींचे गोंडी नृत्य, कलाकारांना मनोरंजक सादरीकरणे दिली जातील.

कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रभारी संचालक, नागपूरच्या गोपालकृष्णन आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबईचे संचालक बिभीषण चावरे.

# अपक्ष उमेदवार डॉ.अमोल देशमुख यांच्या झंझावाती दौरा



■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ११ :

आगामी सावनेर कळमेश्वर विधानसभा निवडणुकीत शहरातील युवा नेतृत्व डॉ.अमोल देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला तेव्हापासून झंजावत दौऱ्याची सुरुवात झाली. सर्वप्रथम त्यांनी आदासा गणपती देवस्थान येथे नारळ फोडून प्रचाराला झंझावत दौऱ्याला सुरुवात केली.

आदासा, सोनपुर, बोरगाव, धापेवाडा, निलगाव, सावनेर शहर, मंगसा, केळवद, खापा, गडेगाव, आजणी, शेरडी, कोदेगाव, कवठा, पाटनसावंगी, वाकोडी, वाकी, बडेगाव व इतर गावात झंजावत दौऱ्याला सुरुवात झाली आहे. सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्रातील ज्याही गावात डॉ.अमोल देशमुख जातात त्या त्या गावांमध्ये त्यांचे जंगी स्वागत होत आहे.

सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यावसायिक क्षेत्रात पाऊल ठेवणारे सावनेर कळमेश्वर विधानसभेतील उदयोन्मुख तरुण डॉ.अमोल देशमुख आगामी विधानसभा निवडणुकीत उतरल्याने चांगली समीकरणे बिघडू लागली आहेत.

ते आपल्या प्रचाराच्या कामात व्यस्त आहेत आणि दररोज प्रत्येक गावात जाऊन मतदारांना स्वतःची ओळख करून देत आहेत आणि ही निवडणूक लढवण्याचे कारण सांगत आहेत.

डॉ.अमोल देशमुख हे माजी आमदार रणजित देशमुख यांचा मुलगा आहे. उच्चशिक्षित असून सुद्धा गोरगरिबांच्या, कामगारांच्या समस्या, जनसामान्य जनतेच्या प्रश्नाला घेऊन लढणारे डॉ.अमोल देशमुख, जनतेत आणि तरुणांमध्ये लोकप्रिय असल्याचा लाभ त्यांना मिळणार आहे.

गावागावात त्यांचे स्वागत व आशीर्वाद मिळत असून या निवडणुकीत आपण निश्चितच विजयी व्हाल असा विश्वास जनतेतून व्यक्त केला जात आहे. येत्या २० नोव्हेंबरला शिटी समोरील बटन दाबुन मला भरघोस मतांनी विजयी कराल ही अपेक्षा बाळगतो.

# नागपुर गुजराती ब्रह्मसमाजात दीपावली स्नेहमिलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

श्री नागपुर गुजराती ब्रह्म समाज तर्फे गांधीबाग स्थित समाज भवनात दीपावली स्नेह मिलना चे कार्यक्रम संपन्न झाले अध्यक्ष समाजअध्यक्ष संजय ठाकर यांची मार्ग दर्शन खाली कार्यक्रमात माता लक्ष्मीचे पूजा करूं दीप प्रज्वलित करणात आले.

याप्रसंगी ट्रस्टी मंडल के अध्यक्ष नरेंद्र जहां ट्रस्टी अशोक द्विवेदी,उपाध्यक्ष निकीलेश ठाकर, राजेंद्र मेहता, कोषाध्यक्ष अशोक झा, मनद मंत्री चेतन जोशी, केयूर व्यास, मंचा वर उपस्थित होते

याप्रसंगी समाजा चे टस्ती मंडल अध्यक्ष नरेंद्र झा नी दीपावलीची शुभेच्छा देताना मनाले समाज सर्व बंधु आणि बंधु आणि बधु भगिनी मिणुन समाज चे उन्नतिचे कार्य करावे.



समाज उन्नति केरल तार अपन उन्नति करूं. याप्रसंगी ट्रस्टी मंडल अध्यक्ष नरेंद्र जहां ट्रस्टी अशोक त्रिवेदी उप प्रमुख निखिलेश ठाकुर, राजेंद्र मेहता, मानद मंत्री चेतन जोशी कोषाध्यक्ष अशोक जहां, जयेश जोशी, अनूप शुक्ला, राजेश जोशी, केयूर व्यास, मुकेश जोशी विनोद जोशी अल्पेश जोशी धर्मेश शुक्ला बटुक जोशी राजेश दवे बालकिशन जोशी चेतन महाराज त्रिवेदी, महिला मंडलचे नीता शुक्ल, पूर्व अध्यक्ष कोकिला जहां नूतन जहां, कविता शुक्ला, कीर्ति जोशी सदस्य जया त्रिवेदी जोशना जोशी,दीप्ति पांडीया, आरती मेहता, अर्चना जोशी, चेतना जोशी, मोनिका भट्ट युवा मंडणाचे प्रमुख हिमांशु शुक्ल, चिराग जोशी नीरव जोशी कारण दवे कौशिक जोशी,पूर्व प्रमुख अमरीश मेहता नीरज व्यास,धर्मेश शुक्ला, हितेश त्रिवेदी कनिष्क मेहता, मोती संख्या समाज बंधु उपस्थित होते. समाज मानद मंत्री चेतन जोशी दीपावलीची शुभेच्छा देताना आगामी कार्यक्रम बदल माहिती दिली.

# डासांना पळवून लावतो एलईडीचा पिवळा प्रकाश

## एमएससी नॅनोसायन्स विद्यार्थ्यांचे संशोधन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील एमएससी नॅनोसायंसच्या विद्यार्थ्यांनी विविध आजारास कारणीभूत ठरणाऱ्या डासांना एलईडीचा पिवळा प्रकाश पळवून लावत असल्याचे समाजपयोगी महत्वपूर्ण संशोधन केले आहे. भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पेटंट प्राप्त झाले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे यांनी एमएससीच्या नॅनोसायंस व नॅनो टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत डासांना एलईडीच्या पिवळ्या प्रकाशामुळे दूर ठेवता येते, यावर उपयुक्त संशोधन करीत एका नवीन उपकरणाच्या आधारे शोधून काढले. यामध्ये नॅनोसायंस व टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मुकेश तुरकाने, सिद्धेश्वर नागपुरे, प्रणाली झाडे व संशोधक विद्यार्थी डॉ. अभिजीत कदम यांच्या सोबत नॅनो टेक्नोमटेरियलवर आधारित एलईडीच्या प्रकाशित होणाऱ्या विभिन्न प्रकाशाच्या सहाय्याने यात लाल, निळा व पिवळ्या रंगाद्वारे असे शोधून काढले आहे की, डास हा पिवळ्या रंगापासून दूर राहतो. डॉ.ढोबळे यांचे संशोधनाचे कार्य एलईडी व त्यांची उपयोगिता यावर आहे.त्यातूनच, पिवळ्या रंगापासून डास दूर पळतात यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. असे समाजाला उपयोगी असणारे संशोधन त्यांनी विद्यार्थ्यांच्या सहाय्याने जनतेसमोर ठेवले आहे.



आज डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया आदी आजाराने सर्व त्रस्त झाले आहेत.डासांच्या संसगार्मुळे प्रत्येक परिवारात काही प्रमाणात त्याचे रुग्ण आढळतात. डासांपासून स्वतःचे रक्षण करण्याकरिता बाजारात वेगवेगळे प्रकारचे उपाय सांगितले जातात व त्यानुसार प्रत्येक व्यक्ती आपली सुरक्षा करतो. हे देखील खरे आहे. आज वनस्पती पासून तर नवीन तंत्रज्ञानापर्यंत चा वापर करून देखील डासांपासून संरक्षण केले जाते. यापूर्वी ओझोला या वनस्पती पासून डासाचे प्रजनन थांबविता येते. याबाबत माहिती प्रत्येक व्यक्तीजवळ पोहोचवण्यास डॉ. ढोबळे यांनी प्रयत्न केले आहे.

घरामध्ये पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे लावून त्यातून डासांना दूर ठेवता येईल असे त्यांनी सिद्ध केले आहे. घराच्या मुख्य दारासमोर व खिडकी समोर, बगीच्यात पिवळ्या रंगाचे विद्युत दिवे किंवा भिंती पिवळ्या रंगानी पेंट केलेल्या असेल तर त्या ठिकाणी डास येणार नाही किंवा कमी येतील. घरातील व्यक्तींची डासांपासून सुरक्षा होऊन ते मलेरिया, डेंग्यू व चिकनगुनिया आदी आजारांपासून दूर राहील असे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

डॉ. ढोबळे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाची समाजाला आज फार आवश्यकता आहे व ते नेहमीच समाजला उपयुक्त असणारे संशोधन करतात हे महत्त्वाचे आहेत. या संशोधनावर कार्य करीत डॉ. ढोबळे यांनी आंतरराष्ट्रीय पेटंट प्रस्तुत केले होते, ते त्यांचे पेटंट मान्य झाले आहे. एमएससी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पेटंट मान्य झाल्याबद्दल डॉ. ढोबळे यांनी स्वतः आनंदी होत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. व पुढे त्यांनी संशोधनाचा मार्ग निवडावा तसेच देशाला वैज्ञानिक दृष्टिकोन द्यावा. अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. उत्तम व समाजपयोगी संशोधन केल्याबद्दल विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# वानाडोंगरी येथील काकड आरतीत हरिनामाचा गजर



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ११ :

वानाडोंगरी परिसरात कार्तिक महिन्यात दररोज पहाटेच्या दिंडीने वातावरण भक्तिमय झाले आहे. मागील तीस वर्षांपासून या गावातील भजन मंडळ घेऊन दररोज पहाटे निघणाऱ्या या काकड आरतीचा समारोप श्री विठ्ठल मंदिरात होतो. गावातील अनेक भाविकांची हजेरी असते.टाळ-मृदंग घेऊन निघालेल्या या दिंडीत सहभागी भाविकांचा स्वागत-सत्कार आज श्रीराम शिवमंदिराचे अध्यक्ष राजेंद्र सांभारे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला राजेंद्र जोशी विष्णू राऊत, शंकर डोंगरे हिरामण राखुंडे, पुष्पा सांबारे, राजस तांदूळकर, सुमन चोरे, वंदना महाकुळकर, गजानन तांदूळकर, हेमराज राणे, राजू सपाटे, केशव वराटे, ईश्वर पातळखंडे, कृष्णा धरमठोक महादेव पारसे, रामराव भूते, पुरुषोत्तम बरवड, प्रमोद लालसरे, मारोती लेनबळे, माला बरडे, जिजा बरडे कुसुम गायकवाड, सुरेश राऊत आदी यावेळी हजर होते.

ईमराता टेभरे रंजना निवारा संगीता तरोते शोभाताई वासुदेव कारवळे रानु टेभरे इंदिरा राऊत उषा शांती सुरेश मचंर्डे मंजु राऊत पुष्पा डोंगरे शिवराम मंदिरात यांचे सत्कार घेण्यात आला.

# मालवाहूच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

हिंगणाच्या देवळी मार्गावर भरधाव मालवाहूने एका मोटार सायकलस्वाराला जबर धडक दिली. या धडकेत गंभीर जखमी मोटार सायकलस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मनोज सत्यवान मानापुरे (40) रा. वंजारी चौक, मानापुरे रोड, वर्धा असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी मनोज यांचा साळा अमोल बाबाराव जयपूरकर (29) रा. मांगली, मोहगाव-हिंगणाच्या तक्रारीवरून आरोपी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. प्रज्वल कवडूजी ठाकरे (24) रा. व्याहाडपेठ, हिंगणा असे आरोपी चालकाचे नाव आहे.

हिंगणाच्या मांगली येथे मनोज यांचे सासर आहे. दिवाळी साजरी करण्यासाठी ते कुटुंबासह मांगली येथे आले होते.

शनिवारी दुपारी 3 वाजताच्या सुमारास कुटुंबाला येथेच सोडून ते एमएच-32/एक्स-0288 क्रमांकाच्या मोटारसायकलने वर्धाला परत निघाले. देवळी मार्गावर नवेगाव फॉरेस्ट नाक्याजवळ मालवाहू क्र. एमएच-40/सीटी-4232 चा चालक प्रज्वल याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून मनोज यांच्या मोटारसायकलला मागून जबर धडक दिली. मनोज वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले.

त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. पोलिसांनी या प्रकरणी त्यांचा साळा अमोलच्या तक्रारीवरून आरोपी वाहन चालक प्रज्वलविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# निवडणूक निरीक्षकांकडून सिमेवरील मतदान केंद्रांची पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ११ :

रामटेक विधानसभा मतदारसंघ ५९ चे निरीक्षक सुनील कुमार यांनी निवडणूक संबंधित मतदान केंद्रांची पाहणी केली. रामटेक विधानसभा मतदार संघाचे निरीक्षकांनी तालुक्याच्या सीमेवरील मतदान केंद्रांना भेट देऊन पाहणी केली तसेच मतदारांशी चचार्ही केली.

रामटेक तालुक्यातील लांब आणि सीमेवर पवनी, झिंझेरिया, मानेगाव टेक तसेच कन्हान, कांद्री, टेकाडी, गोंडेगाव, दहेगाव जोशी, चिंचभुवन, मनसर येथील मतदान केंद्राना निवडणूक निरीक्षक सुनील कुमार यांनी भेटी दिल्या.



मतदान केंद्राची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्यात. सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी सूचना फलक, दिशादर्शक, दिव्यांगासाठी रॅम्पची सुविधा, मतदार सहाय्य केंद्र, पुरेशी व्यवस्था, मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छ स्वच्छतागृहे,प्रतिक्षालय, रांगेतील मतदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच मंडपात असलेल्या मतदान केंद्रानजीक मोबाईल टॉयलेटची व्यवस्था,प्रथमोपचार सुविधा, दिव्यांगासाठी व्हीलचेअर आदी सुविधा करण्याचे निर्देश दिले.

# अपघातात जखमी वृद्धाचा मृत्यू

**नागपूर:** रस्ते अपघातात गंभीर जखमी वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत घडली. शिवाजी महादेव बललान्से (78) रा. महादुला असे मृताचे नाव आहे. गत 3 नोव्हेंबरच्या रात्री 9.30 वाजताच्या सुमारास शिवाजी महादुला टी-पॉइंटजवळून पायदळ रस्ता ओलांडत होते. या दरम्यान दुचाकी वाहन क्र. एमएच-40/झेड-6048 च्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. जखमी शिवाजी यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. शनिवारी रात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी शिवाजी यांचे नातेवाईक अर्जुन श्रीपात्रेच्या तक्रारीवरून आरोपी मोटार सायकलस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# मतदारांपर्यंत बीएलओंनी मतदान चिठ्ठी पोहोचवावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मतदारांपर्यंत बुथ लेव्हल आफिसर यांनी मतदान चिठ्ठी पोहोचविण्याची जबाबदारी जबाबदारीने पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात राजकीय पक्षांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रवीण महिरे, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना यावेळी निवडणूक प्रक्रियेची माहिती देण्यात आली. दुसरे ईव्हीएम मतदान यंत्राचे सरमिसळ ही उद्या दि. 12 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. यासंदभार्तील प्रक्रियेची माहिती राजकीय पक्षांच्या उमेदवारांना देण्यात आली. निवडणूक कालावधीत काय करावे व काय करू नये, स्ट्रॉग रूमच्या सिलिंगच्या वेळी राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींची उपस्थिती, बीएलओ मार्फत मतदारांपर्यंत पोहोचविण्यात येणारी मतदार चिठ्ठी आदी निवडणूक प्रक्रियेविषयीची माहिती यावेळी देण्यात आली.

# फेस्कॉमचे जनसंपर्क अभियान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मतदाराच्या मनात मतदाना प्रति उत्सुकता आणि जागरूकता निर्माण करण्याचे कार्य महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, मुंबई फेस्कॉम पूर्व विदर्भ प्रादेशिक विभाग नागपूरच्या वतीने सुरू आहे. फेस्कॉम अध्यक्ष सुधीर भगत व सचिव डॉ. दीपक शेंडेकर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे सदस्यघरोघरी जाऊन मतदानाचे महत्व समजावून सांगत आहेत.

मतदान आपला हक्क आहे आणि तो आपण बजावला पाहिजे.त्यामुळे लोकशाही बळकट होईल. असा विश्वास फेस्कॉमचे सचिव डॉ. दीपक शेंडेकर यांनी व्यक्त केला. अभियानात उपाध्यक्ष जितेन्द्र भोयर, कोषाध्यक्ष सुधीर सालफळे, सहसचिव प्रदीप डोंगरे, मुरलीधर कुंभलकर, बबनराव वानखडे, उद्धव वाटकर, विजय जुमडे, सुनंदा हरणे, भारती वाटकर आदि सहभागी झाले होते.

# ही फक्त पदयात्रा नाही विश्वास आहे महायुतीवरचा : प्रविण दटके

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मध्य नागपूर विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार प्रवीण दटके यांच्या जनसंवाद यात्रेचा तांडपेठ येथून शुभारंभ झाला.यावेळी या प्रभागातील नागरिकांच्या भेटी घेत आशीर्वाद घेतला.

तसेच प्रभागातील स्थानिक नागरिकांशी संवाद साधत सर्वांची विचारपूस केली,यावेळी नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. या प्रभागात केलेल्या कामा बद्दल नागरिकांनी आभार मनात जागोजागी स्वागत केले.



या पद यात्रेत आमदार प्रवीण दटके, आमदार विकास कुंभारे, गिरीश देशमुख, दीपराज पार्डीकर, राजेंद्र धकाते, नानू धकाते श्रावण खापेकर, सुहास नंदनवार, विजय खेडे, भास्कर पराते, लक्ष्मण पाठारे यश पांडे मनोहर मोहदेकर युवराज निपाणी,कल्पना सोनटक्के, नरेश धापोडकर, शुभम मौंदेकर, विक्की मंडलिक, रवी नंदनवार, सतीश कुंभारे, सुनिता खालगुने, सारिका खंडे, संगीता निमजे तसेच भाजप पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# सुधीर पारवे म्हणजे देवा भाऊची गॅरंटी
## पारवेंना मताधिक्य देण्याचे देवेंद्र फडणविस यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ११ :

उमरेड विधानसभेचा सर्वांगीण विकास होण्यासाठी महायुतीच्यावतीने आम्ही सुधीर पारवे यांच्यासारखा सक्षम उमेदवार दिला आहे. सुधीर पारवे म्हणजे देवा भाऊंची गॅरंटी, गडकरी साहेबांची गॅरंटी असा विश्वास देत सुधीर पारवेंना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले. मांढळ येथील प्रचार सभेत ते बोलत होते.

उमरेड विधानसभेचे महायुतीचे उमेदवार सुधीर पारवे यांच्या प्रचारार्थ देवेंद्र फडणवीस यांनी मांढळ येथे सोमवारी (दि.११) भव्य प्रचार सभा घेतली. आ. परिणय फुके, आ. कृपाल तुमाने, माजी आ. राजु पारवे, यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान फडणवीस यांच्या उपस्थितीत मांढळ सर्कलच्या राष्ट्रवादीच्या जिल्हा परिषद सदस्या मनीषा फेंडर यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

उपस्थितांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सुधीर पारवे यांनी आमदार असताना उमरेड विधानसभेचा मोठ्या प्रमाणात विकास केला आहे. हजारो कोटी रुपये खर्च करून आपण गोसेखुर्द प्रकल्प मार्गी लावला. प्रकल्पग्रस्तांचा पुनर्वसनाचा प्रश्नही सोडवला.




चीचघाटसारखा प्रकल्प कार्यान्वित झाल्यास या विधानसभेचे भाग्य बदलेल.

अंभोरा हे जागतिक पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला येत असून यातून हजारो युवकांच्या हाताला काम मिळणार असल्याचे सांगत कुही तालुक्यात लवकरच एक हजार एकरवर एमआयडीसी येत आहे. आगामी सरकार आपलेच असून येत्या काळात आपण तरुणांना व्यवसायासाठी तब्बल २५ लाख रुपये इतके बिनव्याजी कर्ज देणार आहोत. महिलांसाठी एसटी बसचा प्रवास अर्ध्या तिकीट दराने केला आणि महिला प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली. त्यामुळे एस टी महामंडळ नफ्यात आले असल्याची एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी माहिती दिल्याचे फडणवीस यांनी म्हटले.

यावेळी श्यामबाबु दुबे,आस्तिक सहारे, बाबा तितरमारे, आनंदराव राऊत, डॉ. शिरिष मेश्राम, विनोद ईटकेलवार, संदीप ईटकेलवार, दिलीप सोनटक्के, रमेश खादाडे, शिवाजी सोनसरे, ईस्तारी तळेकर, सुनिल जुवार आनंद खडसे, वामन श्रीरामे, सचिन पुडके, पुंडलिक राऊत, नरेश झुरमुरे, प्रमीलाताई दंडारे, कविताताई साखरवाडे, मनिषाताई फेंडर, अश्विनीताई शिवणकर, सोनुताई निरगुळकर, नरेश चौधरी, राजेश तिवस्कर, प्रमांनद दडारे, स्वप्निल राऊत, धनपाल लोहारे, गणेश देशमुख, विजू दिघोरे, निखिल येळणे, निलेश चव्हाण, वसंता ठाकरे, प्रदिप धनरे, संदिप सुखदेवे, मिथुन माटे, गजानन धांडे, प्रकाश थोटे, तुकाराम शिवणकर, यांच्या सह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते व मतदार बंधू भगिनी उपस्थित होते.

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात शास्त्रभारती व्याख्यानमालेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ११ :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन आणि योग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शास्त्रभारती व्याख्यानमालेचे आयोजन आज दि.१२ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता प्रज्ञाभारती वर्णेकर सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. शास्त्रभारती व्याख्यानमाला ही भारतीय दर्शन विभागातर्फे निरंतर चालणारी व्याख्यानमाला असून, दर्शनशास्त्राच्या विविध विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते.

पतंजली योगपीठ, हरिद्वारचे प्रख्यात योगसाधक व योगप्रचारक स्वामी परमार्थदेव हे मुख्य वक्ते आहेत. स्वामी परमार्थदेव व्यक्तित्व निर्मितीत योग व आहाराची भूमिका या विषयावर व्याख्यानपुष्प गुंफतील.

या व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी भूषविणार आहेत. या व्याख्यान कार्यक्रमाचे निमंत्राक कुलसचिव डॉ. देवानंद शुक्ल असून रामटेक परिसर संचालक प्रो. हरेकृष्ण अगस्ती विशेषत्वाने उपस्थित राहतील.

या कार्यक्रमाच्या संयोजिका प्रो. कलापिनी अगस्ती, अधिष्ठाता, भारतीय धर्म,तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय आणि समन्वयक डॉ. सचिन द्विवेदी व सहसमन्वयक प्रा. अतुल गालेराव आहेत.

# राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त मेहमुदा शिक्षण महिला ग्रामीण विकास बहुद्देशिया संस्थेच्या सेंट्रल इंडिया ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटने मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या राष्ट्र उभारणी, संस्था उभारणी आणि विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या अमिट ठसांचं स्मरण केलं. या सेलिब्रेशनमध्ये डॉ. एस.एम. राजन (संचालक, सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ लॉ), डॉ. सय्यद सजाउद्दीन गुलाब (प्राचार्य सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी), तुषार मेश्राम (प्रकल्प संचालक डीडीयूजीकेवाय), डॉ. मदन कडवे (प्राचार्य सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया) फार्मसी), आरेफा सुलताना (प्राचार्य, फार्मसी संस्था), डॉ. यास्मीन सिद्दीकी (प्राचार्य सेंट्रल इंडिया अध्यापक विद्यालय), डॉ. स्वाती राऊत (प्राचार्य सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ एज्युकेशन) डॉ. सीमा चिखले (प्राचार्य सेंट्रल इंडिया महिला महाविद्यालय) शिक्षण), रजनी वासनिक (उपप्राचार्य, सेंट्रल इंडिया नर्सिंग कॉलेज) यांनी सहभाग घेतला होता. डॉ. एसएमराजन यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री, स्वातंत्र्यसैनिक, विद्वान आणि प्रख्यात शिक्षणतज्ञ मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा केला जातो. मौलाना आझाद हे स्वतंत्र भारतातील शिक्षणाचे प्रमुख शिल्पकार होते याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यांनी टिप्पणी केली की मौलाना आझाद यांना शाळा या प्रयोगशाळा आहेत ज्या देशाचे भावी नागरिक घडवतात. डॉ. सय्यद सजाउद्दीन गुलाब आपल्या भाषणात म्हणाले, मौलाना आझाद यांनी उच्च शिक्षणासाठी आणि तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन आणि शिक्षणाचा पाया घातला जो औद्योगिकीकरण आणि अलीकडेच ज्ञानावर आधारित उद्योगांचा उदय झाला. मौलाना आझाद हे शिक्षणाच्या प्राथमिक हेतूबद्दल स्पष्ट होते. आझाद हे तत्त्वज्ञानाचे होते की कोणत्याही व्यवस्थेचे मुख्य उद्दिष्ट संतुलित विचारांची निर्मिती करणे आहे ज्याची दिशाभूल होऊ शकत नाही." मदन कडवे म्हणाले की, वसाहतवादी व्यवस्थेतून हरवलेल्या राष्ट्रीय भावनेचा विकास करण्यासाठी शिक्षण पद्धतीची संकल्पना करण्याचे आव्हान डॉ. मौलाना आझाद यांच्याकडे होते. त्यांनी शिक्षण अभ्यासक्रमात तर्कशुद्ध दृष्टीकोन आणि चौकशीची भावना विकसित करण्यासाठी एक प्रणाली सुरू केली,"

कार्यक्रमाचे संचालन डॉ.यास्मीन सिद्दीकी यांनी केले तर आभार प्रा.राहिला अंजुम यांनी मानले.

# नागपूर ग्रामीण तालुक्यात रमेशचंद्र बंग यांचा झंझावाती प्रचार दौरा



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ११ :

विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत हिंगणा विधानसभा क्षेत्रातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेशचंद्र बंग यांनी बोरखेडी सर्कलचा प्रचार दौरा करून गावागावात जाऊन ग्रामस्थांशी भेटी घेतल्या व या सर्कलचा खुंटलेला विकास नव्याने सुरू करण्याकरिता मला शेवटची संधी द्या असे आवाहन मतदारांना केले.

बोरखेडी फाटक जिल्हा परिषद सर्कल मधील वारंगा, देवळी(गुजर), कोलार, रुईखैरी, सोनेगाव (बोरी ) किन्हाळमाकडी, रामा दहेली, आष्टा सोनेगाव (लोधी), कवठा (मांगली), दुधा, ब्राह्मणी, आलागोंदी आदी गावांचा झंजावती प्रचार दौरा करून ग्रामस्थांकडून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या संवाद साधत त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आणि मागील दहा वर्षापासून या सर्कलचा विकास झालेला नाही.

या सर्कलला लागून असलेली बुटीबोरी एमआयडीसी येथील बंद पडलेले उद्योग सुरू करून स्थानिक तरुणांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणार त्यासाठी आपण मला होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत शेवटची संधी द्यावी विनंती केली

यावेळी नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती प्रकाश नागपुरे, जिल्हा परिषद सदस्य वृंदा नागपुरे, नागपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती संजय चिकटे, सरपंच स्नेहा थुल, तुषार नागपुरे, तेजराव घायवट , गौतम थूल, कृष्णा वडे, प्रकाश मडावी, नानाजी गिरहे, अनिल वरकडे, अंकुश वरकडे, प्रफुल सोनवणे, सुनील ठाकरे, टीकाराम ठाकरे, राजू तायवडे, संजू भोयर, लीलाधर ठाकरे, अतुल भोयर, पुरुषोत्तम येनुरकर, ईश्वर शेलवते, प्रशांत सोनारकर, बन्सी भोयर, बंडू ठाकरे, असलम शेख, देविदास सोनवणे, वसंतराव कांबळे, देविदास कांगळी, प्रशांत शेंद्रे, सुनील झांबरे, गुलाबराव उईके, अनूप नागपुरे, अजय तुरनकर, किसना धोके, अरविंद धोके, युसुफ भाऊ साबारे, सुरेश कळसरपे, उधराम कळसकर, संजय ढोमने आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## सायटेशन / पब्लिक जाहीर नोटीस

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील एम.जे.सी.क्र. १३/२०२४**
पेशी दिनांक २८-११-२०२४
प्रोसेस क्रं. ११०१/२०२४
दिनांक- २५-१०-२०२४

अर्जदार : १) सौ. कल्याणी आनंद पाटील, वय - ३० वर्षे, राह. नर्मदा कॉलोनी, काटोल रोड, नागपूर, तह. जि. नागपूर. २) सौ. अंजली दिनेश खोब्रागडे, वय २७ वर्षे, राह. नविन अमर नगर, हुडकेश्वर, नागपूर, तह. जि. नागपूर ३) सौ. चंद्रकला गुरुदेव लोणारे, वय ५० वर्षे, राह वरठी, तह, मोहाडी, जि. भंडारा.

---- विरूध्द ---

गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : - जयचंद जागो मेश्राम

सदरहू अर्जदारांनी कायदेशिर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट च्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांनी मयतदार जयचंद जागो मेश्राम, हे मौजा-धानला, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. मयतदार जयचंद जागो मेश्राम यांचा कायदेशिर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. जयचंद जागो मेश्राम यांचा मृत्यु दि.१०.१०.१९८८ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक २८-११-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक / जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधिताना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशिर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.२४.१०.२०२४ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

## जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते

# मतदार जागरूकता प्रचार व्हॅनचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अधिपत्याखालील केंद्रीय संचार ब्युरोने (सीबीसी) आज, 11 नोव्हेंबर 2024 रोजी, नागपूर येथील सिव्हील लाईन्स मधील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात ब्युरोच्या मतदार जागरुकता प्रचार व्हॅनच्या कायार्ला सुरुवात केली.

हा उपक्रम, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 च्या तयारीसाठी, स्वीप अंतर्गत मुख्य निवडणूक कार्यालयाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मतदार जागरुकता कार्यक्रमाचा भाग आहे. केंद्रीय संचार ब्युरो, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक कार्यालय आणि नागपूर जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त सहयोगाने हे अभियान सुरु करण्यात आले आहे.




नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर आणि नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी आज इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या फिरत्या प्रदर्शनविषयक वाहनाला हिरवा झेंडा दाखवून या अभियानाचे उद्घाटन केले. मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशासह ही व्हॅन नागपूर जिल्ह्यातील विविध मतदारसंघांना भेट देणार आहे.

उद्घाटन कार्यक्रमात बोलताना जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर म्हणाले, मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रचार व्हॅन हे अत्यंत उत्तम माध्यम आहे. गेल्या काही निवडणुकांच्या वेळी ज्या ठिकाणी मतदानाचे प्रमाण कमी होते अशा विशिष्ट मतदान केंद्रांना भेट देण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही या व्हॅनचा मार्ग निश्चित केला आहे., राज्यात 20 नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या वेळी सक्रियतेने सहभागी होण्यासाठी मतदारांना प्रोत्साहित करणे हा या दृक-श्राव्य प्रचार सामग्रीने सुसज्ज असलेल्या व्हॅनच्या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. येत्या निवडणुकीत 75% हून अधिक मतदानाचे लक्ष्य साध्य करणे आणि नागपूर जिल्ह्याला या मतदान टक्केवारीच्या बाबतीत उत्तम कामगिरी करण्यात यश मिळवून देणे हा आमच्या या उपक्रमाचा उद्देश आहे.

या उपक्रमाच्या महत्त्वावर अधिक भर देत नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी म्हणाले, मतदारांमध्ये मतदानाविषयी जागरुकता निर्माण करण्याशी संबंधित व्यापक दृक-श्राव्य सामग्रीने सुसज्ज असलेली ही व्हॅन म्हणजे नागरिकांमध्ये मतदानाची संस्कृती जोपासण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. मतदानाचे प्रमाण कमी असलेल्या केंद्रांवर अधिक लक्ष केंद्रित करत ही प्रचार व्हॅन मतदारांवर कायमस्वरूपी प्रभाव टाकण्याचे कार्य करेल आणि मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीयरित्या वाढ घडवून आणेल अशी आशा आहे.ह

या अभियानाची पोहोच आणि प्रभाव वाढवत केंद्रीय संचार ब्युरोच्या नोंदणीकृत गीत आणि नाटक क्षेत्राशी संबंधित कलाकारांनी या उद्घाटन कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मुख्य निवडणूक कार्यालय आणि विविध जिल्हा प्रशासनांच्या पाठबळासह येत्या राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये मतदारांचा विक्रमी प्रमाणातील सहभाग सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेले हे अभियान 20 नोव्हेंबर 2024 पर्यंत सुरु राहील.

## काँग्रेसने ग्रामीण भागाला विकासापासून वंचित ठेवले : गडकरी



■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

काँग्रसने देशात साठ वर्षे सत्ता उपभोगली. पण देशातील ग्रामीण भागाला विकासापासून वंचित ठेवले, अशी टीका केंद्रीय मंत्री नितीन नितीन गडकरी यांनी आज (सोमवार) कळमेश्वर येथे केली. त्याचवेळी अटलजींच्या नेतृत्वातील सरकारने आणि आता नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने ग्रामीण भागाच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

सावनेर विधानसभा मतदारसंघातील कळमेश्वरमध्ये येथील भाजप-महायुतीचे उमेदवार डॉ. आशीष देशमुख यांच्या प्रचारार्थ नितीन गडकरी यांची जाहीर सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. आशीष देशमुख यांना सेवा करण्याची संधी दिली तर कळमेश्वर-सावनेरची बुलेट ट्रेन दुप्पट वेगाने धावेल, असा विश्वासही त्यांनी स्थानिकांना दिला. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, या देशाने साठ वर्षे काँग्रेसला संधी दिली. काँग्रेसनेही लोकांना खूप आश्वासने दिली. पहिले लोकांनी बैलजोडीवर ठप्पे मारले. नंतर गाय-वासरूवर ठप्पे मारले. मग पंज्यावर ठप्पे मारले. पुढे काँग्रेस फुटत गेली.

नितीन गडकरी म्हणाले, १९४७ पासून आजपर्यंत काँग्रेसने खूप घोषणा केल्या. देशाच्या भविष्याचे नुकसान केले. चुकीच्या पद्धतीने राज्य कारभार केला. स्टिलचे कारखाने टाकले, ते डुबले. हॉटेल टाकले, तेही डुबले. विकासाच्या बाबतीत काँग्रेसचे प्राधान्यच चुकले. खऱ्या अथार्ने गाव गरीब मजदूर आणि शेतकऱ्यांच्या विकासाला, सिंचनाला, कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना, पाणी पुरवठा आणि रस्त्यांना प्राधान्य द्यायला हवे होते. मात्र, काँग्रेसने गावांकडे पूर्ण दुर्लक्ष केले. महात्मा गांधींनी रामराज्य आले पाहिजे, असे म्हटले होते. काँग्रेसच्या काळात कुठे होते रामराज्य? त्यांनी फक्त गांधीजींचे नाव घेतले. त्यांच्या विचारांचे अनुकरण केले नाही. आज देशातील परिस्थिती बदलायला सुरुवात झाली आहे.

## चाकूने जखमी करून लुटले

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

ठाण्यांतर्गत एका तरुणाला चाकूने गंभीर जखमी करून लुटणाऱ्या आरोपीच्या काही तासातच लकडगंज पोलिसांनी मुसक्या आवळल्या. सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून पोलिसांना आरोपीचा सुगावा लागला आणि त्याला अटक करण्यात आली. शुभम सेवक पारधी-बैरागी (21) रा. नाईक तलाव, पाचपावली असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फियार्दी सचिन गणेश चंडीमेश्राम (27) रा. आकोली, कामठी हा शुक्रवारी काही कामाने नागपुरात आला होता. सायंकाळी 5 ते 5.30 वाजताच्या दरम्यान सचिन बैरागीपुरातील सिद्धेश्वर मंदिरजवळून पायदळ जात होता. दरम्यान आरोपी शुभमने त्याचा रस्ता अडवला. चाकूचा धाक दाखवून पैशांची मागणी केली.

सचिनने पैसे देण्यास नकार दिला असता शुभमने त्याच्यावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केले. त्यानंतर जबरीने त्याच्या खिशातील 4,400 रुपये हिसकावून पळून गेला. गंभीर जखमी सचिनला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले.

पोलिसांनी सचिनच्या बयानावरून अज्ञात आरोपीवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज आणि घटनास्थळाजवळील लोकांची विचारपूस केली असता शुभमचा सुगावा लागला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल केला. पोलिसांनी त्याच्याकडून रोख 3 हजार आणि चाकू जप्त केला.

ही कारवाई वपोनि हेमंत चंदेवार, पोउपनि सखाराम कांबळे, शिंदे, पोशि पवन सोनभद्रे, नरेंद्र वाघमारे यांनी केली. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## नागपूर मध्यवर्ती कारागृहात ई-पर्सन प्रणाली व प्रादेशिक संगणक लॅबचे उद्घाटन



■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

अपर पोलीस महासंचालक व कारागृह सुधारसेवा महानिरीक्षक प्रशांत बुरडे , पुणे यांचे आदेशान्वये व कारागृह उपहानिरीक्षक स्वाती साठे पूर्व विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली दिं.११.११.२०२४ रोजी ई-पर्सन प्रणाली व (आय सी जे एस) प्रादेशिक संगणक लॅब,कारागृह उपनिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे कार्यालयात सुरू करण्यात आलेली असून सदर लॅबचे उद्घाटन नागपूर मध्यवर्ती कारागृह अधीक्षक वैभव आगे यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. दि. ११ नोव्हे.२०२४ ते १५. नोव्हे.२०२४ या कालावधी करिता पूर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले असून प्रशिक्षणार्थी यांना मास्टर ट्रेनर मार्फत प्रशिक्षण देणे सुरू केलेले आहे. उक्त संगणक प्रणाली प्रशिक्षण कारागृहाच्या पूर्व विभागातील गडचिरोली ते बुलढाणा पर्यंत विदभार्तील 11 कारागृहातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे ई- पर्सन प्रणाली व (आय सी जे एस) प्रणालीचे पुरेपुर वापर करून कारागृहातील बंदी संबंधित कामकाज पेपरलेस होण्यासाठी मदत होईल.

## शस्त्रासह दोघांना अटक

**नागपूर :** तहसील आणि शांतीनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान दोन गुंडांना शस्त्र घेऊन फिरताना अटक केली. मोहम्मद तौफिक अब्दुल रहमान (21) रा. भानखेडा आणि करण प्रकाश जाधव (23) रा. नयापुरा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पहिली कारवाई तहसील पोलिसांनी केली. गांधीबागच्या सूत बाजार परिसरात एक गुंड शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. तौफिक शस्त्राचा धाक दाखवून लोकांना धमकावताना दिसला. घेराबंदी करून त्याला अटक करण्यात आली. दुसरी कारवाई शांतीनगर पोलिसांनी प्रेमनगरच्या झेंडा चौक परिसरात केली. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याजवळ खंजीर मिळाला. खंजीर जप्त करून पोलिसांनी करणला अटक केली. दोन्ही आरोपींवर संबंधित पोलिस ठाण्यांत आर्म्स ॲक्ट आणि मुंबई पोलिस ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १२१ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 51 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे.

सोमवार (11) रोजी शोध पथकाने 121 प्रकरणांची नोंद करून 71,000/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 32 प्रकरणांची नोंद करून 12,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 13 प्रकरणांची नोंद करून 1,300/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 34 प्रकरणांची नोंद करून 36,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली.



चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 2,000 रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरिजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 2,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 27 प्रकरणांची नोंद करून 5,400/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 10 प्रकरणांची नोंद करून 10,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

## अंगावर रंगरंगोटी करून लोकांचे आकर्षण ठरण्याच्या छंदाने अनंता बोरीकर ठरले लक्षवेधी प्रचारक

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. ११ :

मध्यप्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत आमदार विजय चौरे यांच्या प्रचार सभेत डोक्यावर पंजा हे निवडणूक चिन्ह रंगवून पंधरा वर्षांपूर्वी लोकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेले व अनेक वृत्तपत्रे व माध्यमांत प्रसिद्धी मिळाल्याने जर आपण पूर्ण शरीरावर रंगवून घेतले तर प्रसिद्धझोतात येऊ हाच विचार घेऊन मध्यप्रदेशच्या छिंदवाडा जिल्ह्यातील पारडशिंगा या गावातील अनंता श्रीराम बोरीकर यांना संपूर्ण अंगावर रंगरंगोटी करून प्रकाश झोतात येण्याचा छंद जडला व पाहता पाहता ते काँग्रेस पक्षाचे बहुलक्षीत प्रचारक बनले.

पंधरा वर्षांपूर्वी डोक्यावर रंगवलेल्या काँग्रेसच्या पंजाचिन्हाने अनंता बोरिकर यांची ख्याती दूरवर पोहोचली व काँग्रेस पक्षाचे समर्पित प्रचारक म्हणून बोरीकर यांनी आतापर्यंत उज्जैन, भोपाळ, इंदोर नागपूर मध्य प्रदेशातील संसर येथे काँग्रेस पक्षाचा प्रचार केला.

यंदाच्याही विधानसभा निवडणुकीत ते प्रचारक म्हणून उतरले आहेत. यासाठी रोज सात ते रात्री दहा वाजेपर्यंत चालणाऱ्या प्रचारासाठी संपूर्ण अंगावर तिरंग्याचे रंग रंगवून पंजा हे चिन्ह समोरील भागावर रेखाटण्यात आले आहे. तर पाठीवरच्या भागावर महालक्ष्मी योजनेची माहिती व पंजा रेखांकित केला आहे.





रंगरंगोटीसाठी किमान चार ते पाच तास लागत असून त्यासाठी उज्जैन वरून खास पेंटर बनवण्यात आलेला आहे. याशिवाय राहुल गांधी यांच्या भारत जोडो पदयात्रेत सुद्धा काँग्रेस पक्षाच्या प्रचारार्थ शरीरावर रंगरंगोटी करण्यात आली होती. छत्तरपुरा जिल्हा येथे 156 कन्यांच्या लग्नामध्ये हनुमानाची कलाकृती रंगविण्यात आली होती.

गेल्या तीन वर्षांपासून जामसावळी ते रामटेक येथे पाच दिवसांची पदयात्रा काढण्यात येत आहे. या पदयात्रेत अनंता बोरीकर हे हनुमानाचे रूप रंगवून घेतात याशिवाय प्रदीप मिश्रा व धीरेंद्र शास्त्री, दादा गुरु रामचंद्रचार्य यांच्या रामकथा व भागवत सप्ताहात ते सात ते नऊ दिवस हनुमानाचे रूप साकारतात.

बोरीकर यांचे वैशिष्ट्य म्हणजे वैविध्यपूर्ण रंगरंगोटी द्वारे लोकांचे आकर्षण ठरण्याचा त्यांचा हा छंद ते निस्वार्थ भावनेने कोणतेही शुल्क न आकारता साकारतात. कोणी दान स्वरूपात रक्कम अथवा वस्तू दिल्यास त्याचा ते स्वीकार करतात.

## तुळशी विवाहानंतर उडणार लग्नाचा बार



■ महासागर प्रतिनिधी,

नागपूर, दि. ११ :

हिंदू धर्मात विवाह हा १६ संस्कारांपैकी सर्वात महत्त्वाचा मानला जातो. विवाह सोहळ्यासाठी शुभ मुहूतार्ला खूप महत्त्व आहे. सुखी वैवाहिक जीवन सुनिश्चित करण्यासाठी योग्य तारीख आणि वेळ पाळणे महत्त्वाचे आहे अशी मान्यता आहे.

देवूठाणी एकादशीनंतर चातुर्मास संपेल. त्यानंतर शुभ कार्यावरील बंदीही हटवण्यात येईल. देवूठाणी एकादशीपासून मुंडन, शुभविवाह, घरोघरी उमेद, लगन आदी शुभ कार्यासाठी शुभ मुहूर्त दिसतील.

### हे आहेत मुहूर्त

चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा लग्नघाई सुरू होणार आहे. यावर्षी ३० हजारांवर अधिक लग्न होणार, अशी शक्यता वर्तवली जात आहे. तर यासाठी तीन हजार कोटींचा व्यवसायही होणार आहे.

१२ नोव्हेंबरपासून लग्नाच्या मुहूर्तांना सुरुवात होणार आहे. या दिवसात १८ शुभमुहूर्त आहेत असे पंचांगकर्ते यांनी सांगितले आहे. नोव्हेंबर महिन्यात लग्नाचे १० दिवस खूप शुभ असतात. यामध्ये १२, १६, १७, १८, २२, २३, २४, २५, २९ नोव्हेंबरला होणाऱ्या विधींचा समावेश आहे.

ज्योतिषाच्या मते ज्यांचे लग्न या तारखांना होतो डिसेंबरमध्ये लग्नासाठीच्या कमी मुहूर्त आहेत. यामध्ये ०३,०४, ०५, ०९, १० आणि १५ डिसेंबर या तारखा आहेत.

## शहरातील मैदानांच्या सखोल सफाई अभियानाला सुरूवात

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. ११ :

स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी या मोहिमेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे शहरातील दहाही झोनमधील सर्व मैदानांची सखोल स्वच्छता करण्यासाठी विशेष अभियान हाती घेण्यात आले आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार सोमवारी ११ नोव्हेंबर रोजी मैदानांच्या सखोल स्वच्छता अभियानाला सुरूवात झाली. ११ ते १६ नोव्हेंबर दरम्यान नागपूर शहरातील सर्व मैदानांची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे.

अभियानाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (ता.११) दहाही झोनमधील ४२ मैदानांची सखोल स्वच्छता करण्यात आली. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनामध्ये मैदानांच्या स्वच्छतेसाठी झोनल अधिकारी व त्यांच्या नेतृत्वामध्ये स्वास्थ निरीक्षकांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.



सोमवारी (ता.११) सकाळी ६ वाजतापासून ४२ मैदानांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

लक्ष्मीनगर झोनमधील पश्चिम समर्थ नगर, हनुमान मंदिर मैदान उज्ज्वल नगर, इंडियन जिमखाना धंतोली, बास्केटबॉल मैदान बजाजनगर, सीतानगर धवड महाविद्यालय, हनुमान मंदिर पांडे लेआउट, धरमपेठ झोनमधील फुटाळा तलाव मैदान, प्रियदर्शनी कॉलनी सिव्हिल लाईन्स, सदर गांधी चौक तुटाबगीचा, सुळे हायस्कूल मागील मैदान धंतोली, शामला शक्ती पायदानवाला टेकडी रोड, त्रिकोणी पार्क, रामदासपेठ लेंड्रा पार्क, हनुमान नगर झोनमधील योगा भवन महालक्ष्मीनगर, चौकोणी मैदान हनुमान नगर, चक्रधर नगर मैदान, कलोडे महाविद्यालय नासुप्र मैदान, शताब्दी लंगर नासुप्र मैदान, धंतोली झोनमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कुकडे लेआउट, त्रिकोणी मैदान मानवता शाळेजवळ, लक्षवेध मैदान अरविंद सोसायटी नरेंद्रनगर, राजाबाक्षा मैदान मेडिकल चौक, नेहरूनगर झोनमधील स्वराज विहार मैदान, आयुर्वेदिक लेआउट मैदान, सद्भावना नगर मैदान शितला माता मंदिर जवळ, नासुप्र मैदान कामगार नगर, वैभव नगर मैदान दिघोरी, सोनझरी नगर मैदान, न्यू सुभेदार लेआउट मैदान, गांधीबाग झोनमधील नुराण मैदान अंसार नगर, गाडीखाना मैदान, चिटणीस पार्क मैदान, दिघोरीकर मैदान धावडे मोहल्ला बगडगंज, सतरंजीपुरा झोनमधील आदिवासी कॉलनी मैदान, पंचवटी मैदान, लकडगंज झोनमधील नेताजी नगर, कच्छी विसा मैदान, शास्त्री नगर नासुप्र मैदान, भास्कर व्यास योगा मैदान वर्धमान नगर, आरटीओ मैदान डिप्टी सिग्नल, आशीनगर झोनमधील सहयोग नगर फुटबॉल मैदान, मंगळवारी झोनमधील सिंधू बालोद्यान जरीपटका, बेझनबाग मैदान या सर्व ४२ मैदानांमध्ये मनपाच्या सफाई कर्मचा-यांद्वारे सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त श्री. विजय देशमुख व संचालक डॉ. गजेंद्र महल्ले यांनी या अभियानामध्ये सहभागी होउन वेगवेगळ्या मैदानांमध्ये भेट देउन सखोल स्वच्छता अभियानाची पाहणी केली. मैदानांची सखोल स्वच्छता अभियानांतर्गत इतर ४० मैदानांची स्वच्छता करण्यात येणार आहे. मनपाच्या सर्व सहा. आयुक्त, झोनल स्वच्छता अधिकारी यांनी या अभियानात सहभाग घेतला.